
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ७५०७



# “[illegible]-स्मरणें”

REFBK-0012412

આપ્પા પટવર્ધન

परंधाम प्रकाशन, पवनार

चरित्र

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ........................ वि: ........................

क्रमांक ........................ नों: दि: ................

३५७५५०
११·१२·६७

चरित्र
१५०१



# पुण्य-स्मरणें

REFBK-0012412

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 92892

परंधाम प्रकाशन, पवनार



# पुण्य-स्मरणें

REFBK 0012412
REFBK-0012412

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८९२

परंधाम प्रकाशन, पवनार

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
**ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम प्रकाशन,**
**पो. पवनार जि. वर्धा**

आवृत्ति पहिली
ता. १५ ऑगस्ट १९६२
प्रति : १०००

**किंमत एक रुपया**

मुद्रक :
**भाऊ पानसे**
परंधाम मुद्रणालय, पवनार
पो. पवनार

# लेखकाचें निवेदन

१९३३ सालीं रत्नागिरिच्या तुरुंगांत असतांना मी माझ्या आई, आजी, आते, दिवंगत बहिणी इत्यादीं विषयींचीं पुण्य-स्मरणें लिहून काढलीं होतीं. १९४२ च्या चळवळींत तुरुंगांत स्थानबद्ध असतांना मी माझ्या आईच्या शुश्रूषेसाठीं परोलवर बाहेर येऊन तेरा महिने तिची शुश्रूषा केली व तिच्या मृत्यूनंतर १९४४ च्या प्रारंभीं लगेच परत तुरुंगांत गेलों तेथें तिचीं आणखी स्मरणें लिहून काढलीं. हें लेखन माझ्या भावनांना मोकळी वाट करून देऊन मनाचा भार हलका करण्यासाठीं केलें. पण त्या लिखाणांतील कांहीं भाग साधनाकारांनीं आपल्या सुप्रसिद्ध साप्ताहिकांत प्रसिद्ध केला तो वाचून कांहीं वाचकांनीं माझें अभिनंदन केलें व तसलेंच आणखी लिखाण प्रसिद्ध करण्याची विनंति केली.

त्यानंतर माझे मित्र व सहकारी श्री. मोरोपंत जोशी यांनीं माझें चरित्र लिहिण्याचें योजलें त्याऐवजीं मीच माझें आत्मचरित्र त्यांच्या बलवंत साप्ताहिकासाठीं क्रमशः लिहून देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें पूर्ववयाचा पहिला खंड प्रसिद्ध झाला. तो वाचून पुढील भाग हि लिहिण्या-बद्दल अनेक मित्रांचा आग्रह चालू आहे, माझी हि लिहिण्याची इच्छा आहे, पण तो लिहिण्यापूर्वीं हीं पूर्वलिखित पुण्य-स्मरणें प्रसिद्ध व्हावीं अशी माझी इच्छा होती. आचार्य भागवत यांनीं त्यांच्या प्रकाशनाची व्यवस्था अंगावर घेऊन मला विशेषच उत्तेजन दिलें, म्हणून मी तीं आतां प्रसिद्धीला देत आहे.* माझे मामा व लहान भाऊ शंकर यांचीं स्मरणें नव्यानें लिहून जोडलीं आहेत.

---

* आचार्य भागवतच प्रकाशनाची व्यवस्था करणार होते पण परंधाम प्रकाशनानेंच प्रकाशन अंगिकारल्यानें आचार्यांना तसदी देण्याचें कारण राहिलें नाहीं.

ज्या वडील वा लहान मंडळींविषयीं मी लिहिलें आहे तीं सामान्य माणसेंच होतीं. लेखक सामान्य माणूस आहे आणि सामान्य स्मरणेंच येथें लिहिलीं आहेत. तरीहि, किंवा म्हणूनच, सामान्य वाचकांना तीं आवडतील, त्यांना त्यांत आपापल्या घरच्या किंवा आपापल्या वडील मंडळींच्याच गोष्टींचा प्रत्यय येईल अशा भरंवशानेंच मी हीं स्मरणें प्रसिद्ध करण्याचें धाष्टर्य करीत आहें.

आणखी हि अनेक दिवंगत कुटुंबीयांची, दिवंगत मित्रांचीं तसेंच जिवंत कुटुंबीयांचीं व मित्रांचीं हि पुण्य-स्मरणें याच प्रसंगानें माझ्या मनांत गर्दी करीत आहेत; मी अनेकांचा अनेक प्रकारें ऋणी आहें, अनेकांकडून अनेक प्रकारच्या शुभ प्रेरणा मला मिळाल्या आहेत. त्या सर्वांबद्दल माझ्या मनांत कृतज्ञता आहे व ती प्रकट होऊं इच्छिते. तरी हि तुर्त संयम करणेंच मला उचित वाटतें.

जवळें,
जि. सोलापूर
२७-५-६१

अप्पा पटवर्धन

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | | पृ.सं. |
| १. बाया | ... | १ |
| २. बायाचीं पुण्य-स्मरणें | . | ६ |
| ३. आनेचीं पुण्य-स्मरणें | ... | ५६ |
| ४. ताईचीं पुण्य-स्मरणें | ... | ६३ |
| ५. बहिणींचीं पुण्य-स्मरणें | ... | ७० |
| ६. चि. शंकरचीं पुण्य-स्मरणें | ... | ७६ |
| ७. मामांची पुण्य-स्मरणें | ... | ८० |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .......... वि: ................
क्रमांक ................ नों: दि: ..........

# बाया

*बायाविषयीं लिहितांना कोठून सुरवात करावी तेंच सुचत नाहीं. बाया म्हणजे मूर्तिमंत मऊपणा, मूर्तिमंत सेवावृत्ति, सहनशीलता, स्वतःच्या शरीराबद्दल अनास्था, बाह्य धार्मिक विधि किंवा चालीरीति यांबद्दल बेपर्वाई; कांहींसा मनाचा दुबळेपणा; थोडासा कुढेपणा हि; उदारता, उधळेपणा व उद्यांबद्दल बेफिकिरी; भोळसरपणा. हे सर्व बरेवाईट गुण वारशानें माझ्यामध्यें आलेले आहेत.

बाया आम्हांला कधीं उपदेशाचे चार शब्द हि बोललेली नाहीं. एकादे वेळीं रागावून बोलली तरी दुसऱ्या क्षणाला दुप्पट नरम पडायची. तिच्याबद्दल धाक तर कधींच कोणाला वाटला नसेल. आम्हां मुलांना तर नाहींच पण तिच्या सुनांना हि नाहीं. प्रत्येक सासवेविरुद्ध सुनांच्या कांहीं तरी तक्रारी असतातच पण आमच्या बायाविरुद्ध आमच्या भावजयींच्या कांहीं तक्रारी असतील असें संभवत नाहीं.

बाबांना लहानपणापासून तों वयाला पन्नास वर्षें होईपर्यंत दमा लागत असे. लहानपणीं रत्नागिरीस आपल्या चुलत्यांकडे इंग्रजी शाळेंत जाण्यासाठीं राहिले परंतु प्रकृतीमुळें शाळा सोडून घरीं बसावें लागलें. असल्या दुबळ्या, अशिक्षित, गरीब मुलाला मुलगी कोण देतो ? त्यांतून आमचे आजोबा कुष्टरोगी होते. अशा घरीं मुलगी कोण देणार ? म्हणून बाबांचें लग्न झालें तें मुलीच्या आईबापांना पैसे भरून. असे पैसे भरावे लागणें किंवा मुलीचे पैसे घेणें आजच्याप्रमाणें त्यावेळीं हि कमीपणाचें मानलें जाई. बायाला ही आठवण बोचत असावी किंवा त्याखेरीज हि बाबांचा कजाग स्वभाव, स्वतःची स्वतंत्र वृत्ति व शुष्क

* १९३३ सालीं लिहिलेलीं स्मरणें. बाया म्हणजे माझी आई.

विधि न मानण्याकडील प्रवृत्ति इत्यादीमुळें पतीला देवासमान मानण्याची जी पातिव्रत्यभावना ती बायामध्यें आम्हांला कधीं विशेष आढळून आलेली नाहीं. दोघांमध्यें नित्य घर्षण चालू असायचेंच. हें नेहमीं सौम्य स्वरूपाचें, म्हणजे शाब्दिकच, असे. पण त्यामुळें आम्हां मुलांना लहानपणीं बाबा किंवा बाया यांपैकीं कोणाबद्दलच आदरबुद्धि वाटत नसे. बाया-बद्दल कांहींसें प्रेम व बाबांबद्दल कांहींसा धाक वाटे, पण आज्ञाधारक-त्वाचे पाठ आम्ही विशेष गिरविलेले नाहीं; कौटुंबिक शिस्त आम्ही विशेष शिकलों नाहीं व त्याचे दुष्परिणाम मला अद्याप जाणवतात.

बायानें एकहि यात्रा केलेली नाहीं, करण्याची तिला उत्सुकता हि नाहीं, उलट कंटाळाच आहे. तिनें विशेष कसलीं व्रतें-वैकल्यें, दानें वगैरे केल्याचें हि माझ्या माहितींत नाहीं. तिचें तुळशीपाणी हि तांत्रिकच असे. देवदर्शनाला जाणें, वडा-पिंपळांना प्रदक्षिणा घालणें असल्या गोष्टींकडे हि तिचा कल नसे. सोवळ्याओवळ्याच्या बाबतींत ती सुधारक नाहीं पण त्याबद्दल तिचा आग्रह नसतो. माझें अस्पृश्यतानिवारण तिला नापसंत नाहीं.

सबंध जन्मांत गुळच्याचे उत्तरेस* रत्नागिरीपलीकडे, दक्षिणेस आडिवऱ्यापलीकडे व पूर्वेस पावसेपलीकडे तिनें प्रवास केलेला नाहीं. रत्नागिरीस हि आयुष्यांत दोनतीनदांच आलेली आहे. अलीकडे तर दृष्टि मंदावल्यामुळें घराच्या आवारापलीकडे जाणें तिला अशक्यच झालेलें आहे. माझ्या आठवणींत तिच्यापाशीं विशेष दागिने नव्हतेच पण असलेले हि अंगावर चढविलेले मीं कधीं पाहिलेले नाहीं. चार-चौघांत जातांना नीटनेटकें दिसण्याच्या दृष्टीनें तिनें वेणीफणी केलेली किंवा लुगडें-चोळी नेसलेली मला आठवत नाहीं. बाबा वारल्यानंतर विधवांच्या तांबड्या लुगड्यांची एकादी जोडीच तिनें वापरली असेल.

* उत्तरेस व दक्षिणेस १०-१० मैल व पूर्वेस दोन मैल.

तिनें लगेच शुभ्र वस्त्रें वापरण्यासच सुरवात केली. १९२२ सालापासून तर शुद्ध खादीचीं सफेत व जाडीभरडीं पातळेंच ती वापरीत आली आहे. खादी वापरायला मीं तिला सुचविलें नाहीं, तिनें आपण होऊनच माझेपाशीं मागणी केली. मीं तिला तलम कोकटी खादीचें ऐक पातळ आणून दिलें होतें त्याचा हि एक तुकडा तिनें गुणीला चोळीसाठीं कापून दिला आणि अशा तऱ्हेनें तें मोटकें करूनच तिनें वापरलें.

आंथरूण, तांब्याभांडें, पेटी किंवा इतर सामानसुमान स्वतःचें म्हणून निराळें ठेवण्याची तिची वहिषाटच नाहीं. सर्वांना पुरवून प्रसंगीं जें उरेल त्यावरच ती चालवून घेत्ये. जेवतांना घड "अन्नशुद्धि" हि—घरांत भरपूर दूधदुभतें असतांना हि—घ्यायची नाहीं. तसेंच शिळेंपाकें नेहमीं स्वतःच्या वाटयालाच राखून ठेवायचें. तिला चहाची सवय लागली ती हि खाण्यापिण्याच्या अनास्थेमुळेंच. तिचें जेवण व्हायला दुपारचे दोन वाजायचे, आणि तोंपर्यंत तिचें खाणें एकदां, दोनदां आणि प्रसंगीं तीनदां हि चहा हेंच असे.

मी तिला विशेष कधीं विटाळशी बसलेली हि पाहिली नाहीं. आम्ही मुलें तिला २॥/३ वर्षांच्या अंतरानें झालों. एक बाळंतपण व पुढील गरभारपण यांच्या दरम्यान मासिक विटाळपणाचा रिकामा अवधि तिच्याबाबतींत रहातच नसावा. शेवटच्या बाळंतपणानंतर २/३ वर्षेंच ती विटाळशी बसली असेल, पण तीं विटाळपणें हि मासिक नसत, दोन-दोन तीन-तीन महिन्यांनीं येत. सात मुलगे व चार मुली अशीं आम्ही तिला अकरा मुलें झालों. तिचीं सर्व बाळंतपणें त्रासाशिवाय सुरळीतपणें झालीं व सर्व मुलें मोठ्या वयापर्यंत वाढलीं. १९१४ सालीं वडील बंधु "भाऊ" बत्तीस वर्षांचे वारले. तोंपर्यंत अपमृत्यु आम्हांला माहीत नाहीं.

लहानपणापासूनच तिचे डोळे अधु होते. औषधपाणी, चष्मा असले कसलेच इलाज न झाल्यामुळें अलीकडे ते विशेषच बिघडले आहेत. हल्लीं तिच्या पापण्यांचे केस बुब्बुळांना टोचतात म्हणून ते ८/१५ दिवशीं उपटून काढावे लागतात. तसेंच डोळ्यांवर सारा येतो व मोतिबिंदु हि जून झाले असावे. पण ऑपरेशनसाठीं घर सोडून दूर जायला ती तयार नाहीं.

*  *  *

बऱ्याच बायकांचें मीं पाहिलें आहे कीं त्यांचा कांहीं स्वतंत्र म्हणून द्रव्यसंग्रह असतो. बायाचें तसें बिलकुल नाहीं. बाबा वारल्यापासून तर घरचा पैसाटक्का तिच्याकडेच असतो, पण तिला पेटी-कुलूप कधीं माहीत नाहीं. सर्व पैसे दुभत्याच्या फडताळांत एकाद्या बुडकुल्यांत व त्याच बुडकुल्यावर झाकणादाखल ठेविलेल्या करवंटींत असतात, आणि ते पैसे काढण्या-ठेवण्याचें काम कोणी हि करावें, त्यांत-आडपडदा वगैरे कांहींच नाहीं. बायाच्या संग्रहीं किड्कमाड्क म्हणण्या-सारखें कांहीं नाहीं. ५/५० रुपयांचें कांहीं असेल तें हि त्या बुड-कुल्याच्या तिजोरींतच असतें. त्या बुडकुल्यांत फार झालें तर शंभर रुपये जमणार, आणि बहुतेक वेळ तो बहुतांशीं रिकामाच असायचा, कारण पैसे येण्यापूर्वींच त्यांच्या खर्चाची सर्व योजना तयार असा-यची. आणि शिल्लक पैसे केव्हां हि आप्तेष्टांपैकीं कोणाला गरज लागली तर देऊन टाकण्याची तयारी असायचीच.

आम्हां भावांमध्यें जीवनपद्धतीबाबत दोन मार्ग पडले आहेत त्यांपैकीं माझ्या मार्गाबद्दल व खुद्द माझ्या बद्दल बायाला अधिक अभिमान वाटतो अशी माझी समजूत आहे. तिचीं एकंदर मतें हि सामा-जिक सुधारणांना अनुकूल आहेत. विधवांचें केशवपन तिला मान्य नाहीं. बालविधवांच्या पुनर्विवाहाला तिचा पाठिंबा आहे. मी गळ्यांत

जानवें हि घालीत नाहीं हें तिला कसेंसेंच वाटतें पण त्यासाठीं--त्याला पुत्र-मोह हि कारण आहे--ती माझा अव्हेर करायला, माझें उष्टें मीच उचलीन म्हटलें तर तसें करूं द्यायला तयार नाहीं.

तिच्या भिडस्त स्वभावाचा--कांहीं अंशीं भित्रेपणाचा हि--एक मासला आठवला तो टिपतों. १९१७/१८ सालची गोष्ट. शेजारचाच एक कुणबी आमच्याकडे गडी असे. बाहेरच्या कोठारांतून त्यानें २/३ भात एके रात्रीं चोरून नेलें. सकाळीं तें कोठार कुलूप काढलेलें आढळलें. शिवाय इतर कुणब्यांना हि त्या चोरीचा सुगावा लागला होता. चोरीचा बभ्रा झाला तरीसुद्धां झडती घेऊन व त्याच्या पदरीं चोरी बांधून भरपाई तरी मागण्याचा धीर बायाला झाला नाहीं. तें वर्ष पहिल्या महायुद्धाचें व कमालीच्या महागाईचें होतें. त्यामुळें निवळ पोटासाठींच ती चोरी झाली होती. चोरी उघडकीला आणून त्या इसमाला तोडणें बायाला पटेना. त्यामुळें ती चोरी जिरून गेली.

ताईप्रमाणें बायाच्या हि मनामध्यें गुरांढोरांविषयीं कुटुंब-भावना वसत आहे. माझ्या लहानपणचा एक प्रसंग आठवतो. आमची एक लहानगी पाडी मरायला टेकली होती. तिला पोथंड्यांनीं शेक चालला होता. आम्ही सभोवती बसलों होतों. अशा स्थितींत पाडीनें एक हंबरडा फोडला व पाय झाडून प्राण सोडला. बाया त्यावेळीं ओक्सा-बोक्शीं रडूं लागली आणि "पुन्हां जन्म घ्यायचा असला तर आमच्याच गोठ्यांत ये हो" असें म्हणून तिनें तिला निरोप दिला. दुसरा नंदी बैलाचा प्रसंग पुढें येईलच.

# *बायाचीं पुण्य-स्मरणें

ती. बायाची स्मृति ताजी आहे तोंपर्यंत च तिचीं पावन स्मरणें लिहून काढण्याचा विचार आहे. आपल्या मातृहृदयाचा अमोल वारसा ती आम्हांला ठेवून गेली आहे. या वारशाचे हिस्से पाडावे लागत नाहींत; प्रत्येक वारसाला हा वारसा सर्वच्या सर्व आत्मसात् करण्याची मुभा आहे. तो आत्मसात् करण्याची कुवत माझ्यांत येईल का ?

## (१) "पोराचां दुखणां माझेवर घाल"

१९०२ सालाची गोष्ट असावी, किंवा १९०३ च्या सुरवातीची. मी ८ वर्षांचा असतां रक्तबाऊनें फार आजारी पडलों. ती. गोदू आते कांहीं दिवस रत्नागिरीस ती. बायोआतेकडे गेली होती. तिला माझ्या आजाराची बातमी कळल्यावर ती लगबगीनें परत आली, व आल्यानंतर "सीतारामाचें दुखणें विकोपाला गेल्याचें समजलें. माझ्या दृष्टीला तरी पडतो कीं नाहीं अशा धास्तीनेंच मी लगेच परत आल्यें" इत्यादि ती माझ्या देखतच बोलली, तेव्हां प्रथम मला समजलें कीं हें जीवावरचें दुखणें आहे.

त्यावेळीं गयाळची गंगाकाकू नाशाकाच्या का पंढरपूरच्या यात्रेला गेली होती. घरांत बायकोमाणूस फक्त सूनच; म्हणून ती. बाया तिला सोबत म्हणून रात्रीं त्यांचेकडे झोपायला जाई. माझें दुखणें बळावलें तेव्हां तिनें जाण्याचें बंद केलें व घरींच रात्रीं माझ्याजवळ जागत बसे. असें तीन आठवडे पर्यंत तिला जागरण करावें लागलें. मला ताप असे व त्या तापांत मी कांहीं तरी जावडत असें, तें ऐकून ती अधिकच घाबरे. मला गुण पडावा म्हणून निरनिराळया देवदेवतांना

---

* जानेवारी "४४ मध्यें लिहिलेलीं.

नवस चालत. त्यांत पांच घरीं जोगवा मागण्याचा एक नवस होता हें मला आठवतें. दुसऱ्यानें एकदां म्हणाली "देवा, या पोराचें दुखणें माझ्यावर घाल, मला मरूं दे आणि याला जगव."

तिच्या शुश्रूषेनें व आशीर्वादानें मला गुण पडला, व तिच्या पुढील कृपेनें मी एवढे दिवस पाहिले. म्हणून तिच्या अखेरच्या दिवसांत आपल्याकडून तिची शुश्रूषा व्हावी अशी माझी लहानपणापासूनची इच्छा होती. २१-४-४२ रोजीं मला अटक झाली तेव्हां मी त्या इच्छेला "जरूर लागेल तर" अशी दुरुस्ती जोडली व श्री. आका शेटचे यांचे द्वारा माझी गैरहजिरी भरून काढली. त्या सोडून गेल्यानंतर मला तुरुंगवासांतून परोलवर जाण्यास मिळालें व तिची १३ महिने शुश्रूषा करावी लागली व करण्यास मिळाली या बद्दल मला समाधान वाटतें.

## (२) माझी चोरी; तिची क्षमा

१९०३-४ सालीं मी कुर्ध्यास आजोळीं राहून तेथील शाळेंत मराठी चौथी यत्ता शिकत असतां ती. बाया माहेरीं आली होती. माहेरच्या मंडळीला आपल्या सासवेच्या, म्हणजे आमच्या आजीच्या, गोष्टी सांगत होती, त्यांत माझ्या कानीं आलें कीं "एकदां सासूबाईंची गोधडी धुवायला नेत होतें तों त्या म्हणतात 'नेऊं नको माझे तींत पैसे आहेत' इत्यादि."

लहानपणीं माझ्यामध्यें भुरट्या चोऱ्या करण्याची प्रवृत्ति होती. मी पुढील प्रसंगाखेरीज आणखी हि २/३ प्रसंगीं अशाच चोऱ्या केलेल्या आहेत. मी वरील शब्द, अर्थात् त्यांतील बातमी, स्वत:पाशीं नोंदून ठेविली व पुन्हां जेव्हां सुटीचा घरीं गेलों तेव्हां चोरून आजीचें आंथरूण उघडून गोधडीची तपासणी केली तों गोधडींत शिवून भर-लेल्या पैशांचा पुंजका हातीं लागला. शिवण फाडून मीं आंतील पैसे

पळवले. सुमारें ८/९ आण्यांचा खुर्दा असावा. या पैशांतून मी माझ्या शाळा-शिक्षकाकडून शाईच्या पुड्या विकत घेतल्या. एवढी घाऊक खरेदी केल्याबद्दल ते माझ्यावर खूष झाले. त्या पुड्यांचें मीं काय केलें तें स्पष्ट स्मरत नाहीं परंतु बहुधा मी त्या शाळेंतील मुलांना वाटून त्यांचा ही धन्यवाद मिळविला असावा. या चोरीचें शल्य मला पुढें अधिकाधिक सलूं लागलें. पुढें मी गांधीजींच्या संपर्कांत आलों. १९२९ मध्यें त्यांच्या आत्मकथेचें मराठी भाषांतर करण्याच्या प्रसंगानें विशेष मनन घडलें. त्यांनीं आपण केलेली चोरी वडिलांना तत्काळ कळवून टाकली, आणि मी इतकीं वर्षें लपवून ठेवली याबद्दल पश्चात्ताप वाटूं लागला. लपवली एवढेंच नव्हे तर त्या चोरीचा आळ आजीनें बायावरच घेतला असावा. आजी तर कधींच मरून गेली होती पण आजीपेक्षां हि बायाचाच द्रोह माझेकडून अधिक घडला असल्यानें तिच्यापाशीं कृतकर्माची कबुली देण्याची आवश्यकता होती. परंतु या विचाराची अंमलबजावणी लांबणीवर पडत होती.

शेवटीं १९३० च्या नोवेंबरचे अखेरीस मी रत्नागिरीच्या तुरुंगांत आरोपी ( अंडर ट्रायल ) म्हणून असतां मला चि० शंकरनें मालवणच्या पत्त्यावर लिहिलेलें पत्र, पत्ता बदलून आलेलें, मिळालें. त्यांत "ती. बाया तापानें फार आजारी आहे, घरीं त्वरेनें निघून यावें" इत्यादि मजकूर होता. चि. श्रीपत त्यावेळीं साबरमती आश्रमांत होता. त्याला हि त्यानें तारेनें कळविलें, त्यावरून तो घरीं आला. मला जाणें शक्य नव्हतें, व त्या दुखण्यांत ती. बायाचा अंत झाला तर तिच्यापाशीं चोरीची कबुली देण्याची संधी हातची जाणार म्हणून मी तुरुंगांतूनच घरीं लिहिलेल्या पत्रांत वरील दुष्कृत्याची समग्र हकीकत लिहिली व ती ती. बायाला सांगा असें लिहिलें. कांहीं दिवसांनीं मी डिस्चार्ज होऊन घरीं ती. बायाला भेटण्यास गेलों. चि० श्रीपतला विचारतां

त्यानें पत्रांतील मजकूर ती. बायाला सांगितला नव्हता. मग मींच तो सांगितला. बाया एवढेंच म्हणाली "बरें, पैसे घेतलेस तर घेतलेस; घरांतलेच घेतलेस; लोकांच्या घरीं कांहीं चोरी केलीस नाहीं. त्याचें काय मोठेंसें ?"

कबूल केलेल्या चोरीबद्दल क्षमा, त्यांतून हि बायाकडून, मिळणारच या बद्दल मला तिळमात्र शंका नव्हती. माझें तें पत्र जेलरनें समग्र वाचलें होतें. त्यामुळें त्याचें ही माझ्याविषयीं चांगलेंच मत झालें.

## (३) बाळू तेखणकरास अपघात

१९०८-९ सालची गोष्ट असावी. वाडीवरील बाळू तेखणकर पहाटेस वायंगण्याला पाणी लावण्यासाठीं "फौजदाराच्या कुर्याठचांत" गेला असतां विहिरींत पडला.

आदल्या रात्रीं ती. बायाला घोण चावली होती. दंशाच्या वेदना रात्रभर चालू होत्या. मी तिच्यापाशीं जागत होतों. पहाटेला बाळू विहिरींत पडला त्याला वर काढण्यासाठीं कुणबी मंडळी पाळणा व राजू मागण्यास आले.

आमचे बाबा भक्तिमार्गी होते. पांडुरंगावर त्यांची सच्ची भक्ति होती. दर वर्षीं आश्विन कार्तिक महिन्यांत स्वखर्चानें नारायणाच्या देवळांत कांकडे आरती करीत. पहाटे ३ वाजतां आम्हांला उठवून काकडे आरतीला घेऊन जात. गांवची इतर मंडळी थोडीच येई. वर्षभर दर रोज पहाटेस आंथरुणांतच भजन करीत. दर एकादशीला देवळांत जाऊन भजन करीत. रोज नेमानें नारायणाच्या दर्शनास (गांवच्या देवळांत) जात. हें सर्व मनोभावानें करीत असत. हस्तलिखित भजनांचा व अभंगांचा त्यांचेपाशीं मोठा संग्रह असे. परंतु

व्यवहारामध्यें मात्र ते फार कर्कश व निष्ठुर असत. आम्हांला त्यांच्याबद्दल जिव्हाळा वाटेल अशी त्यांची घरांतील वर्तणूक नसे. शेजाऱ्यां-पाजाऱ्यांशीं व कुणब्यांशीं हि गोड बोलण्याची त्यांना कधींच संवय नव्हती.

कुणबी पाळणा मागण्यास आले तेव्हां बाबांनीं साफ देत नाहीं म्हणून सांगितलें. असल्या असाधारण अडचणीच्या प्रसंगीं हि त्यांनीं सौजन्य दाखवूं नये याचें आम्हांला हि आश्चर्य वाटलें, परंतु आम्ही गप्प राहिलों.

ती. बाया मात्र गप्प राहिली नाहीं. ती म्हणाली "मी पाळणा देणार. पाळणा कांहीं तुमचा नाहीं आहे, माझ्या माहेरचा आहे" असें म्हणून तिनें पाळणा दिला.

बाबा व बाया यांचेमधील स्वभाव-भेदामुळें त्यांचेमध्यें अशा तऱ्हेचे झगडे वारंवार होत व त्यांचें कारण हि पुष्कळ वेळां शेजाऱ्या-विषयींचा चांगुलपणाच असे.

एकदां कोणत्या तरी कारणानें ती. बाबांनीं गोठणकराला आमचे विहिरीवरून पाणी नेण्यास बंदी केली होती. परंतु त्यांची नजर चुकवून तीं पाणी नेत. एकदां जानकी गोठणकरीण पाण्यासाठीं आलेली बाबांना उमगली. त्यांनीं जाऊन तिची मातीची घागर फोडून टाकली.

बायाला अर्थात्च हें पसंत पडलें नाहीं, परंतु बाबांचा उघड विरोध करणें तिला शक्य नव्हतें म्हणून तिनें घरांतील एक पाण्याची मातीची घागर जानकीला गुपचूप देऊन टाकली.

## (४) पांडू नारकराचें दुखणें

कुणब्यांबद्दल ती. बायाला वाटणाऱ्या कळवळ्याच्या अनेक गोष्टी लिहितां येतील. विशेष चटकदार अशा कांहीं लिहितों.

गोविंद नारकराचा धाकटा मुलगा पांडू क्षयानें आजारी होता. ही बरीच अलीकडची गोष्ट. त्यावेळीं चि. श्रीपत घरचा कारभार पहात होता. पांडूच्या उपचारांप्रीत्यर्थ गोपिकीनें घरांतील भांडीकुंडीं सुद्धां गहाण टाकलीं. त्यांतील कांहीं आमचे घरांतच अल्प मोलानें आलीं. याबद्दल ती. बायाला वारंवार खेद वाटे.

एकदां गोपिकी पांडूच्या औषधासाठीं दोन आण्यांचें तूप मागायला आली. श्रीपतनें विचारलें "पैसे आणलेस का?" ती म्हणाली "आतां नाहींत; हातीं आले म्हणजे देईन." त्यावर श्रीपतनें तूप देण्याचें नाकारलें. परंतु बायाच्यानें राहवलें नाहीं. तिनें गोपिकीला तूप दिलें व त्यानंतर आठ दिवसपर्यंत स्वत: बिलकूल तूप खाल्लें नाहीं व अशा तऱ्हेनें फेड केली.

पांडू नारकराला 'कडकी' होती म्हणून त्याला चहा पिऊं देत नसत. बाया कधीं कधीं कॉफी करून देत असे. एके दिवशीं पांडूची बायको भागीरथी आमचेकडे कांडपाला किंवा अन्य कामाला आली असतां इतर कुळवाडणींपाशीं बोलतांना बायानें ऐकलें :–" 'ते' म्हणतात बायाकडे माझ्यासाठीं कॉफी मागून आण जा. पण सासूबाई रोज रोज फुकटची कॉफी कां देतील? म्हणून मी नाहीं मागितली" इत्यादि. बायानें हें त्यांचें आपापसांतील बोलणें ऐकतांच कॉफी करून तिचेपाशीं दिली व पांडूला नेऊन देण्यास सांगितलें.

कर्मधर्मसंयोगानें दुसरेच दिवशीं पांडू वारला! त्याची अखेरची मागणी आपल्याकडून पुरी झाली याबद्दल बायाला त्यांतल्या त्यांत समाधान वाटलें.

## (५) दानाचें व्यसन

अखेरच्या दिवसांत तर आपलेकडे येणाऱ्या प्रत्येकाला कांहीं ना कांहीं देण्याचें बायाला जणूं व्यसनच लागलें होतें. ती म्हणे : "माझा

सारा जन्म गरिबींत गेला. त्यावेळीं मनांत असलें तरी कोणाला कांहीं देण्याची ऐपतच नसे. आतां—देवदयेनें रामू मोठ्या पगाराला चढला आणि घरचें दारिन्द्य फिटलें. देवानें आम्हांला दिलें आहे तर आपण हि त्यांतलें इतरांना थोडें द्यावें."

शेजारच्या बाबूरावांनीं मला सांगितलेली गोष्ट: एकदां बाया मला म्हणाली "बाबू, माझा जन्म दुसऱ्यांकडून ताक मागून आणण्यांत गेला. परंतु आतां माझे मुलगे मिळवते झाले आहेत, आणि घरांत दुभत्याचा दुष्काळ नाहीं. मुलगे माझ्या हुकमांत हि आहेत. आतां तुला लागेल तेव्हां ताक नेत जा." नेमके हेच शब्द बाया बोलली असेल असें नाहीं, पण भावार्थ हाच असणार.

शेवटीं शेवटीं कोणी हि ब्राह्मण भेटायला आला तर त्याला बाया चार आण्यांचें 'गोप्रदान' द्यायला सांगायचीच. गोळपेचा शंकर लिमये आला होता, तो असेपर्यंत तिला कांहीं सुचलें नाहीं, परंतु तो गेल्यावर त्याच्या मागोमाग श्रीपतकाकांकडे मनुष्य पाठवून त्याला चार आणे दिले. तसेंच रा. विनायक दामोदर एकदां येऊन चार आणे घेऊन गेला त्या नंतर थोड्याच दिवसांनीं पुन्हां आला त्यावेळीं आम्ही त्याला कांहीं दिलें नाहीं. तो गेल्यानंतर "त्याला काय दिलेंत?" म्हणून बायानें विचारलें. कांहीं नाहीं म्हणतांच तिला राग आला. मी लगेच जाऊन श्रीपतकाकांकडे त्याला चार आणे देऊन आलों तेव्हां तिचें समाधान झालें.

## (६) ठकीवरील माया

ठकी गोठणकरीण शेवटच्या आजारांत कांहीं महिने आमचे घरीं रात्रीं निजायला येई व बायाचे पाय चेपणें वगैरे करी. अपरात्रीं ती फारशी उठत नसेच. व वायंगण्याच्या शिपण्याच्या दिवसांत पहाटेस उठून निघून जाई. म्हणजे तिचा विशेष उपयोग होतच नसे, व लागेल तें

करण्यास मी असेंच. तरीहि बाया तिला आग्रहपूर्वक निजण्यास बोलावी. त्यांतील मुख्य हेतु हा असे कीं घरीं त्यांची उपासमारच चालत असे, तरी झोपण्यास आली म्हणजे तिला थोडी घरांतील उरलेली भातभाजी खाण्यास देतां यावी. या आमिषाला वश न होतां ती मधून मधून गैरहजर राही. अशा प्रसंगीं बाया गड्याकरवीं तिच्या घरीं पान पोचवी.

## (७) पोहे व शहाळीं

दिवाळीनंतरच्या महिन्याभऱ्यांत येणाऱ्या कुळवाडी-भंडाऱ्यांना "पोहे पोचले कीं नाहीं, नसल्यास द्या" ही चौकशी करण्याचें स्मरण तिला नेमकें राही.

शेवटल्या दिवाळीचे पोहे खावडकराकडील माणसांनीं नेले होते, परंतु नेतांना बायाला हांक मारली नसल्यानें तिला कळलें नव्हतें. कांहीं दिवसांनीं त्यांना पोहे दिलेत का असें तिनें विचारलें. आम्ही दिल्याचें सांगितलें, तरी हि आतां हांक मारून पुन्हां देण्यास तिनें सांगितलें. त्यावेळीं तीं कामाला बाहेर गेलेलीं असणार म्हणून आम्ही म्हटलें "संध्याकाळीं पाणी न्यायला विहिरीवर येतील तेव्हांच देऊं म्हणजे झालें." संध्याकाळीं पाण्याला आलेलीं आढळलीं नाहीं, त्यामुळें पोहे देण्याचें राहिलें. तिनीसांजांना ती. बायानें पुन्हां चौकशी केली. दिलेले नाहीं असें सांगतांच ती रागावली व चि. शंकरला आतांचे आतां जाऊन त्यांचे घरीं पोहे पोचविण्यास सांगितलें. शंकरनें त्याप्रमाणें केलें.

याचप्रमाणें मी एकदां किरांच्या घरीं तांदूळ व बाजरीची देणगी पोचविण्यास गेलों होतों. आणखी एकदां अशाच तऱ्हेनें कोणा कुळवाड्याला अन्न पोचविण्यास रात्रीच्या वेळीं मला पाठवितांना बाया म्हणाली "अरे, लोकांच्या व्यवहारांत हें गैर दिसत असलें तरी देवाच्या नजरेला तें गैर नाहीं हो."

गावडेगुळयांतील आमच्या बांधावरील माडांचे नारळ आमचे हातीं लागतचना म्हणून आम्ही शहाळींच पाडून आणीत असूं. अशीं एकदम २५-३० शहाळीं आणलीं म्हणजे प्रत्येक येणारा जाणाराला (कुणब्यांना नव्हे, घरीं येणाऱ्या पाहुण्यांना व जानकीकाकूंसारख्या शेजाऱ्यांना) शहाळें देण्याचा हुकूम बायाकडून बिनचूक निघायचाच.

## (८) नारायण भटजींचें सर्टिफिकेट

एकदां नारायण भटजी भेटायला आले असतां लगेच बायानें त्यांना दूध द्या, शहाळें द्या, केळीं द्या, इत्यादि भडिमार सुरू केला, तेव्हां नारायण भटजी आपल्या वक्तृत्वपूर्ण पद्धतीनें म्हणाले "येणाऱ्या प्रत्येकाला कांहीं तरी खाण्याचा आग्रह इतर गोष्टींच्या आधीं करण्याचा ताईचा स्वभाव होता तो बायांत विशेषेंकरून उतरला आहे. इतर मंडळी हि देत नाहींत असें नव्हे, पण बायाला जसें त्या गोष्टीचें व्यसन च आहे तितकें इतरांना नाहीं."

## (९) मृत्यूचा आदला दिवस

रविवारीं (ता० २-१-४४ पौष शु. ७ शके १८६५) सकाळीं तिचा देहांत झाला त्याच्या आदल्या दिवशीं तर तिनें आम्हां सर्वांना थक्कच केलें. अगोदर ४–६ दिवस अशक्तता वाढली होती व बोले तें समजण्यास अडचण पडत असे. शुक्रवारीं रात्रीं श्री. वामनराव आमच्याकडे दूध नेण्यास आले होते. त्यांची म्हैस संध्याकाळीं देतनाशी झाली होती. त्यांनीं बायाला हांक मारली परंतु त्यांचेशीं बोलण्याचा तिला आवांका नव्हता. घरीं दूध नाहीं म्हणून आमचे कडून नेण्यास आले एवढें मी तिला सांगितलें होतें.

दुसरे दिवशीं ती. वंनी ताक करूं लागली तों बाया म्हणते "ताक उरण्यासारखें असेल तर श्रीपतकाकांकडे पोचतें करा. त्यांच्या-

कडे पाव्हणी मंडळी आलेली आहे." (त्यांची मुलगी चंद्री आपल्या मुलांसह आलेली होती) चि. बचीनें ताक पोंचविलें तों रमावैनी म्हणाली "आज घरांत नव्हतेंच, पाहिजेच होतें." त्यांना ताक देण्याचें आम्हां कोणाला न सुचतां बायाला मात्र नेमकें सुचलें याचें सर्वांनाच कौतुक वाटलें.

जानकीकाकूचें एक इन्शुअर्ड रत्नागिरी पोष्टांत आलेलें घेण्यासाठीं तिला अधिकारपत्र पाठवायचें होतें त्यासाठीं ती शनिवारीं रात्रीं आमचे-कडे यावयाची होती. चि. शंकरनें ती येणार आहे म्हणून बायाला सांगितलें. दिवे लागल्यानंतर मी बायाला एक केळें खाऊं घालीत होतों तेव्हां बाया म्हणते "जानकीकाकू येणार आहे तिच्यासाठीं केळीं ठेवा." (ती रात्रीची जेवीत नाहीं म्हणून.)

संध्याकाळीं आमच्या आजारी गाईला पहाण्यास ढोबळचा लाड आला होता. त्याबद्दल आम्ही त्याला दोन आणे दिले हि होते. त्या-नंतर त्यानें बायाला हाक मारली, त्यावर बाया म्हणते "त्याला कांहीं तरी द्या रे, काय बरें द्याल ? चार पैसे द्या." आम्ही म्हटलें "गाय पहाण्याबद्दल आम्ही त्याला दोन आणे दिले आहेत." त्यावर म्हणते "तरी सुद्धां माझे म्हणून चार पैसे द्या." दिले.

मला भेटण्यासाठीं मित्रमंडळी येई त्यांचे पैकीं बहुतेकांना ती. बाया चार आणे ते रुपया खाऊला देई. श्री. सामंत गुरुजींना तर एकदां कुणबी-छात्रालयासाठीं ५ रु. दिले.

## (१०) नंदी बैल परत आला

आमच्या गोठ्यांत लहानाचा मोठा झालेला नंदी नांवाचा एक बैल धिप्पाड व मजबूत होता. ती. बाबा वारल्यानंतर घरीं जोत ठेवणें सोईचें नव्हतें, म्हणून ती. बायानें नंदी बैलाला कुर्ध्याच्या गुरवाला गाडीला बांधण्यासाठीं विकला.

नंदी बैल एरवीं अगदीं गरीब होता, परंतु तितकाच हट्टी हि होता. दिसण्यांत हि उग्र दिसे. गुरवानें त्याला गाडीला बांधण्याचा प्रयत्न केला परंतु तो त्याला वधे ना. त्यानें त्याला खूप मारून हि पाहिलें परंतु व्यर्थ; नंदी गाडीचें जोखड मानेवर धरण्यास कबूल होईना. शेवटीं एकदां गुरवाच्या हातून नंदी जो निसटला तो थेट आमचे घरीं येऊन थडकला.

बाया अंगणाचा केर काढीत होती. नंदी आला तो थेट बाया-जवळ येऊन त्यानें आपली मान तिच्या खांद्यावर टाकली. बायाची नजर प्रथम पासूनच अधू व आतां उतार वयांत विशेषच कमी झाली होती. तिनें नंदीच्या अंगावरून हात फिरवला तों तिच्या हाताला नंदीच्या अंगावरील माराचे वळ लागले. ते पाहून नवीन धन्यानें नंदीला खूप मारलें हें बायाच्या लक्ष्यांत आलें व तिला रडें कोसळलें. "मी कशी चांडाळीण! तुला घरच्या नंदीला पैशांच्या लोभानें विकला. जळोत ते पैसे. तुझी घेतलेली किंमत मी देऊन टाकतें आणि अत:पर तुला नाहीं विकणार."

नंदी अखेरपर्यंत आमचे घरीं च राहिला. त्याचा मृत्यु मात्र ऐन जवानीत एकाएकीं म्हणजे १–२ दिवसांच्या दुखण्यानंतरच झाला.

## (११) बाळंतपणांतील अनास्था

ती. बायाचीं ११ बाळंतपणें झालीं. पहिलें १५-१६ वें वर्षीच झालें तेथून शेवटलें ४६-४७ चे वयाला झालें असावें. सर्व बाळंतपणें निर्विघ्नपणें झालीं व सर्व मुलें मोठ्या वयापर्यंत वाढलीं जगलीं. तिची सारी हयाद प्रसव व संगोपन यांतच खलास झाली. पहिली तिची कणखर प्रकृति, परंतु बाळंतपणें, घरकामें व स्वत:च्या शरीराविषयींची अनास्था यांपायींच ती झिजून गेली.

एकेक बाळंतपण पाऊणशेर तुपांत आटपावें लागलें. आम्हां ब्राह्मणांचें मुख्य सात्त्विक खाणें म्हणजे तूप व दूधदूभतें. बायकांना प्रत्यक्ष बाळंत होईपर्यंत म्हणजे गरभार अवस्थेंत पौष्टिक आहार गरिबांमध्यें क्वचित्‌च देतात. परंतु बाळंतिणींना मात्र भरपूर तूप खाऊं घालण्यासाठीं त्याचा अगोदर पासून सांठा करण्यांत येतो. आमच्या गांवचे श्री. अण्णा सोहनी यांची सुद्धां सामान्य म्हणजे गरिबीचीच स्थिति. त्यांची बायको कुष्णूबाया हिचीं तर २२ बाळंतपणें झालीं असें ऐकतों. त्यांपैकीं ८-१० मुलेंच मोठीं झालीं. परंतु तिच्या प्रत्येक बाळंतपणासाठीं १५ शेर ( २८ तोळ्यांचा ) तुपाचें तपेलें भरून ठेवलेलें असे असें ती बायाच सांगे. उलट आमच्या बायाला मात्र एकवीस तोळे तुपांत संबंध बाळंतपण आटपावें लागलेलें आहे. आमची आजी आम्हां नातवंडांशीं फार प्रेमळ असे, पण सुनेशीं कठोर असणें हा सास्वांचा धर्मच मानलेला होता ! एकदां केव्हां तरी बाया व काशीआते यांचीं एकदमच घरीं बाळंतपणें झालीं म्हणे. बाळंतिणीला पिण्याचें पाणी गरम करून देतात व त्या पाण्यांत लोखंड किंवा सोनें तापवितांना टाकतात. त्या धातूंचा अल्पांश पाण्यांत उतरतो व तो प्रकृतीला पोषक असतो अशी कल्पना. तदनुसार आजी बायाच्या पाण्यांत लोखंडाचे खिळे टाकी, परंतु त्याचवेळीं काशीआतेच्या पाण्यांत मात्र सोन्याचे दागिने टाकी. (हें मला कळलें बायाकडूनच, अर्थात् एकतर्फी पुराव्यावरूनच मीं हें लिहिलें आहे.)

बाळंत होण्याच्या घटकेपर्यंत घरांतला सर्व वावर नित्यवत् करण्याखेरीज गत्यंतरच नसे. लहानपणीं आम्हांला बाया कधीं गरभार आहे वगैरे माहीतच नसे. कधीं सकाळीं झोपेंतून उठावें किंवा शाळेंतून घरीं यावें तों नवीन भावंड जन्मल्याची वार्ता आम्हांला समजे. एकदां बाया पाण्याचा रहाट ओढीत होती व मी जवळच रिकामा बागडत होतों. तेव्हां आमची गोदूआते मला म्हणाली "जा, तिला मदत करायला जा;

नंदी बैल एरवीं अगदीं गरीब होता, परंतु तितकाच हट्टी हि होता. दिसण्यांत हि उग्र दिसे. गुरवानें त्याला गाडीला बांधण्याचा प्रयत्न केला परंतु तो त्याला बधे ना. त्यानें त्याला खूप मारून हि पाहिलें परंतु व्यर्थ; नंदी गाडीचें जोखड मानेवर धरण्यास कबूल होईना. शेवटीं एकदां गुरवाच्या हातून नंदी जो निसटला तो थेट आमचे घरीं येऊन थडकला.

बाया अंगणाचा केर काढीत होती. नंदी आला तो थेट बाया-जवळ येऊन त्यानें आपली मान तिच्या खांद्यावर टाकली. बायाची नजर प्रथम पासूनच अधू व आतां उतार वयांत विशेषच कमी झाली होती. तिनें नंदीच्या अंगावरून हात फिरवला तों तिच्या हाताला नंदीच्या अंगावरील माराचे वळ लागले. ते पाहून नवीन धन्यानें नंदीला खूप मारलें हें बायाच्या लक्ष्यांत आलें व तिला रडें कोसळलें. "मी कशी चांडाळीण! तुला घरच्या नंदीला पैशांच्या लोभानें विकला. जळोत ते पैसे. तुझी घेतलेली किंमत मी देऊन टाकतें आणि अतःपर तुला नाहीं विकणार."

नंदी अखेरपर्यंत आमचे घरीं च राहिला. त्याचा मृत्यु मात्र ऐन जवानीत एकाएकीं म्हणजे १–२ दिवसांच्या दुखण्यानंतरच झाला.

## (११) बाळंतपणांतील अनास्था

ती. बायाचीं ११ बाळंतपणें झालीं. पहिलें १५-१६ वें वर्षींच झालें तेथून शेवटलें ४६-४७ चे वयाला झालें असावें. सर्व बाळंतपणें निर्विघ्नपणें झालीं व सर्व मुलें मोठ्या वयापर्यंत वाढलीं जगलीं. तिची सारी हयात प्रसव व संगोपन यांतच खलास झाली. पहिली तिची कणखर प्रकृति, परंतु बाळंतपणें, घरकामें व स्वतःच्या शरीराविषयींची अनास्था यांपायींच ती झिजून गेली.

एकेक बाळंतपण पाऊणशेर तुपांत आटपावें लागलें. आम्हां ब्राह्मणांचें मुख्य सात्त्विक खाणें म्हणजे तूप व दूधदूभतें. बायकांनां प्रत्यक्ष बाळंत होईपर्यंत म्हणजे गरभार अवस्थेंत पौष्टिक आहार गरिबांमध्यें क्वचित्‌च देतात. परंतु बाळंतिणींना मात्र भरपूर तूप खाऊं घालण्या-साठीं त्याचा अगोदर पासून सांठा करण्यांत येतो. आमच्या गांवचे श्री. अण्णा सोहनी यांची सुद्धां सामान्य म्हणजे गरिबीचीच स्थिति. त्यांची बायको कुष्णूबाया हिचीं तर २२ बाळंतपणें झालीं असें ऐकतों. त्यांपैकीं ८-१० मुलेंच मोठीं झालीं. परंतु तिच्या प्रत्येक बाळंतपणासाठीं १५ शेर ( २८ तोळ्यांचा ) तुपाचें तपेलें भरून ठेवलेलें असे असें ती बायाच सांगे. उलट आमच्या बायाला मात्र एकवीस तोळे तुपांत संबंध बाळंतपण आटपावें लागलेलें आहे. आमची आजी आम्हां नातवंडांशीं फार प्रेमळ असे, पण सुनेशीं कठोर असणें हा सास्वांचा धर्मच मानलेला होता ! एकदां केव्हां तरी बाया व काशीआते यांचीं एकदमच घरीं बाळंतपणें झालीं म्हणे. बाळंतिणीला पिण्याचें पाणी गरम करून देतात व त्या पाण्यांत लोखंड किंवा सोनें तापवितांना टाकतात. त्या धातूंचा अल्पांश पाण्यांत उतरतो व तो प्रकृतीला पोषक असतो अशी कल्पना. तदनुसार आजी बायाच्या पाण्यांत लोखंडाचे खिळे टाकी, परंतु त्याचवेळीं काशी-आतेच्या पाण्यांत मात्र सोन्याचे दागिने टाकी. (हें मला कळलें बाया-कडूनच, अर्थात् एकतर्फी पुराव्यावरूनच मीं हें लिहिलें आहे.)

बाळंत होण्याच्या घटकेपर्यंत घरांतला सर्व वावर नित्यवत् करण्या-खेरीज गत्यंतरच नसे. लहानपणीं आम्हांला बाया कधीं गरभार आहे वगैरे माहीतच नसे. कधीं सकाळीं झोपेंतून उठावें किंवा शाळेंतून घरीं यावें तों नवीन भावंड जन्मल्याची वार्ता आम्हांला समजे. एकदां बाया पाण्याचा रहाट ओढीत होती व मी जवळच रिकामा बागडत होतों. तेव्हां आमची गोदूआते मला म्हणाली "जा् तिला मदत करायला जा;

नंदी बैल एरवीं अगदीं गरीब होता, परंतु तितकाच हट्टी हि होता. दिसण्यांत हि उग्र दिसे. गुरवानें त्याला गाडीला बांधण्याचा प्रयत्न केला परंतु तो त्याला बधे ना. त्यानें त्याला खूप मारून हि पाहिलें परंतु व्यर्थ; नंदी गाडीचें जोखड मानेवर धरण्यास कबूल होईना. शेवटीं एकदां गुरवाच्या हातून नंदी जो निसटला तो थेट आमचे घरीं येऊन थडकला.

बाया अंगणाचा केर काढीत होती. नंदी आला तो थेट बाया-जवळ येऊन त्यानें आपली मान तिच्या खांद्यावर टाकली. बायाची नजर प्रथम पासूनच अधू व आतां उतार वयांत विशेषच कमी झाली होती. तिनें नंदीच्या अंगावरून हात फिरवला तों तिच्या हाताला नंदीच्या अंगावरील माराचे वळ लागले. ते पाहून नवीन धन्यानें नंदीला खूप मारलें हें बायाच्या लक्ष्यांत आलें व तिला रडें कोसळलें. "मी कशी चांडाळीण ! तुला घरच्या नंदीला पैशांच्या लोभानें विकला. जळोत ते पैसे. तुझी घेतलेली किंमत मी देऊन टाकतें आणि अत:पर तुला नाहीं विकणार."

नंदी अखेरपर्यंत आमचे घरीं च राहिला. त्याचा मृत्यु मात्र ऐन जवानीत एकाएकीं म्हणजे १–२ दिवसांच्या दुखण्यानंतरच झाला.

## (११) बाळंतपणांतील अनास्था

ती. बायाचीं ११ बाळंतपणें झालीं. पहिलें १५-१६ वें वर्षींच झालें तेथून शेवटलें ४६-४७ चे वयाला झालें असावें. सर्व बाळंतपणें निर्विघ्नपणें झालीं व सर्व मुलें मोठ्या वयापर्यंत वाढलीं जगलीं. तिची सारी हयात प्रसव व संगोपन यांतच खलास झाली. पहिली तिची कणखर प्रकृति, परंतु बाळंतपणें, घरकामें व स्वत:च्या शरीराविषयींची अनास्था यांपायींच ती झिजून गेली.

एकेक बाळंतपण पाऊणशेर तुपांत आटपावें लागलें. आम्हां ब्राह्मणांचें मुख्य सात्त्विक खाणें म्हणजे तूप व दूधदूभतें. बायकांना प्रत्यक्ष बाळंत होईपर्यंत म्हणजे गरभार अवस्थेंत पौष्टिक आहार गरिबांमध्यें क्वचित्च देतात. परंतु बाळंतिणींना मात्र भरपूर तूप खाऊं घालण्यासाठीं त्याचा अगोदर पासून सांठा करण्यांत येतो. आमच्या गांवचे श्री. अण्णा सोहनी यांची सुद्धां सामान्य म्हणजे गरिबीचीच स्थिति. त्यांची बायको कृष्णूबाया हिचीं तर २२ बाळंतपणें झालीं असें ऐकतों. त्यांपैकीं ८-१० मुलेंच मोठीं झालीं. परंतु तिच्या प्रत्येक बाळंतपणासाठीं १५ शेर ( २८ तोळ्यांचा ) तुपाचें तपेलें भरून ठेवलेलें असे असें ती बायाच सांगे. उलट आमच्या बायाला मात्र एकवीस तोळे तुपांत संबंध बाळंतपण आटपावें लागलेलें आहे. आमची आजी आम्हां नातवंडांशीं फार प्रेमळ असे, पण सुनेशीं कठोर असणें हा सास्वांचा धर्मच मानलेला होता ! एकदां केव्हां तरी बाया व काशीआते यांचीं एकदमच घरीं बाळंतपणें झालीं म्हणे. बाळंतिणीला पिण्याचें पाणी गरम करून देतात व त्या पाण्यांत लोखंड किंवा सोनें तापवितांना टाकतात. त्या धातूंचा अल्पांश पाण्यांत उतरतो व तो प्रकृतीला पोषक असतो अशी कल्पना. तदनुसार आजी बायाच्या पाण्यांत लोखंडाचे खिळे टाकी, परंतु त्याचवेळीं काशीआतेच्या पाण्यांत मात्र सोन्याचे दागिने टाकी. (हें मला कळलें बायाकडूनच, अर्थात् एकतर्फी पुराव्यावरूनच मीं हें लिहिलें आहे.)

बाळंत होण्याच्या घटकेपर्यंत घरांतला सर्व वावर नित्यवत् करण्याखेरीज गत्यंतरच नसे. लहानपणीं आम्हांला बाया कधीं गरभार आहे वगैरे माहीतच नसे. कधीं सकाळीं झोपेंतून उठावें किंवा शाळेंतून घरीं यावें तों नवीन भावंड जन्मल्याची वार्ता आम्हांला समजे. एकदां बाया पाण्याचा रहाट ओढीत होती व मी जवळच रिकामा बागडत होतों. तेव्हां आमची गोदूआते मला म्हणाली "जा तिला मदत करायला जा;

ती नऊ महिन्यांची गरभार पाणी लाटःये आणि तुम्ही नुसतीं बघत बसतां हें शोभतें का ?" तेव्हां मी तिच्या मदतीला तिच्या शेजारीं जाऊन बसलों; परंतु तोंपर्यंत ती गरभार आहे, किंवा नऊ महिन्यांची आहे, यापैकीं कशाचीच मला खबर नव्हती.

चि० शंकरच्या बाळंतपणाच्याच वेळीं थोरल्या वैनीचें हि बाळंतपण झालें. तिच्या बाळंतपणासाठीं ती. भाऊंकडून निराळे पैसे आलेले होते. बायाची तरतूद भाऊ घरखर्चासाठीं पाठवीत त्यांतून व्हावयाची ती जेमतेमच होणार. म्हणून, व बायानें स्वतःच्या प्रकृतीची कधींच काळजी घेतलेली नाहीं म्हणून हि, बाया स्वतःचे भातावर तेल घेत असे व वैनीचे भातावर तूप घालीत असे. परिणामीं १-१॥ महिन्यांत बाया कमरदुखीनें फार आजारी झाली. घरीं शुश्रूषा होणें अवघड म्हणून ती. ताईनें तिला कुर्ध्यास नेली. तेथें १-२ महिने राहून उपचार केल्यानंतर साधारण गुण पडला परंतु चि. शंकरला अंगावरील दूध बाळपणीं मिळालें नाहीं. वरदुधामुळें त्याची प्रकृति कायमची ढांसळली व त्यामुळेंच त्याला बालवयांतच दमा सुरू झाला व सारा जन्मभर तो भोंवला.

## (१२) नित्याची हेळसांड

पण केवळ बाळंतपणांतच अनास्था होत होती असें थोडेंच आहे. ती. बायाचा सारा जन्मच स्वतःच्या शरीरावर अत्याचार करण्यांतच गेला. एवढया मोठया कुटुंबाच्या स्वयंपाकांतून रोज कांहीं तरी शिळें हें शिल्लक रहायचेंच. घर म्हणून थोडें शिल्लक ठेवण्याचा प्रयत्न हि असतोच. परंतु बायानें शिळें अन्न इतरांना वाढलेलें नाहीं. शिळें अन्न नेहमीं तिच्या स्वतःच्याच वाटयाला यायचें. दुपारीं आदल्या रात्रीचा शिळा भात व संध्याकाळीं दुपारचा शिळा भात हेंच तिचें नित्याचें जेवण. शिळया भातावर तूप घ्यायचें नसतेंच; म्हणजे अन्नशुद्धीचा हि अभावच.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ..... दि: ............... १९
क्रमांक ..................... नों: दि: ...............



कांडपासाठीं कुळवाडिणी येत परंतु पाखडण्याचें काम बाया स्वतःच करी. त्या कामाला लागल्यानंतर तिची २ वाजेपर्यंत (मुंबई टाईम= हल्लींचें २-३९) आंघोळ हि होत नसे. तोंपर्यंत सकाळपासून केवळ चहाच्या पाण्यावर असायची.

तरुणपणीं पावसाळ्यांत चार कापून आणण्यास जाई तेव्हां पावसांत भिजतच चार कापायची.

बायाला नट्टा पट्टा केलेली मीं जन्मांत हि पाहिलेली आठवत नाहीं.

१। रु. चीं कोष्टाऊ लुगडीं १४ हात लांबीचीं घेऊन बाया नेशीत असे. लांबी अपुरी पडे त्यासाठीं दोन हात लांबीचा खण त्या लुगड्यांना जोडायचा.

## (१३) खादी वापरणें

ती. बाबांच्या मृत्यूनंतर (१९१६) तांबडीं लुगडीं बाया एखादें वर्षच नेसली असेल. त्यानंतर ती शुभ्र वस्त्रेंच वापरीत असे. १९२२ सालीं मला खादी वापरतांना पाहून ती हि म्हणाली "मला नेसायला पण खादीच दे." त्यावेळीं तर खादी फारच जाडीभरडी निघे; तसलीच आम्ही तिला नेसायला देत असूं. ८ वार×३६" शर्टिंगचीं ठाणें तिला पातळें म्हणून देत असूं व ती बिनतक्रार वापरी. जाड खादीची सवय झाल्यामुळें क्वचित् एखादे प्रसंगीं गिरणीचें नेसलीच तर तिला चमत्कारिक वाटे. जाड खादी कमरेला गुंडाळल्यानें कमरेला तिच्या जोर हि वाटे.

शेवटल्या २-३ वर्षांत मात्र तिच्यासाठीं मुद्दाम तलम खादी काढवून पाठवीत असें.

घरांत आल्यागेल्यांस आंथरण्यापांघरण्यासाठीं सुद्धां ती खादीच्याच चादरी घेत असे. एकदां चि० गणू करमरकराला तिनें २-३ चादरी आणण्यास सांगितलें. त्यानें गिरणीच्या आणल्या त्या तिनें परत केल्या

नाहीं पण तिची तशी अपेक्षा नव्हती व तिला तें त्याचें करणें पसंत हि पडलें नाहीं.

तिच्या स्मशानयात्रेसाठीं मी १९४० सालींच एक खादीचें ठाण गुळ्यास आणून ठेवलें होतें. परंतु १९४२ सालीं खादी दुर्मिळ झाली तेव्हां श्री. नाना बर्वे यांस त्या ठाणांतील ४-५ वार खादी दिली व बाकीची मी स्वत:साठीं व बायाच्या उशांना अभ्र्यांसाठीं वापरून संपविली. मृत्यूचे प्रसंगीं नवी खादी थोडीच शिल्लक होती. श्री. श्रीपतानें गिरणीचें कापड स्मशानयात्रेसाठीं आगाऊ आणून ठेवलेलें होतें. परंतु सुमारें ६-७ वार कोरी खादी होती तीच तिरडीवर घालण्यास व नेसविण्यास मिळून पुरवून आम्ही तिची स्मशानयात्रा हि खादींतच काढली.

## (१४) बाया !

बाया, तुझ्या निधनानें माझा मोठा आधार गेला, परंतु "ईश्वर थोर आहे, तो नवीन आधार निर्मील" असें मी अण्णा आपटयांना पत्रांत लिहिलें होतें. त्याचा प्रत्यय मला येथें तुरुंगांत आला. येथें आल्यावर आठवडयानेंच मी आमांशानें आजारी पडलों. रावसाहेब पटवर्धनांनीं मोसबीं खाण्याचा आग्रह करून व पाठवून व याळगीकडून गाईचें दूध व लोणी त्वरेनें मागवून, विडेश कुळकर्णींनीं मोसंबीं व साबूदाणा पाठवून व विशेषत: नाईक मास्तरांनीं ८-१० दिवस अविरत शुश्रूषा करून बायाची जागा अनेकरूपांनीं भरून काढली.

पण त्याहून हि विशेष लक्ष्यांत येण्यासारखी गोष्ट म्हणजे मुख्य जेलरसाहेब श्री. राऊत हे वेळोवेळीं येऊन माझी चौकशी करतात. त्यांनीं व डॉक्टरनी मिळून मला नित्याच्या आहाराखेरीज (मी सी क्लासचेंच अन्न घेतों) ३ रत्तल गाईचें दूध व ४ मोसंबीं चालू ठेविलीं

आहेत. २-३ दिवस जेवणामध्यें मीं भाकरच खाल्ली, पण मला भाकर खातांन पाहून श्री. राऊत म्हणाले "कृपा करून स्वतःसाठीं नाहीं तर आमचेसाठीं तरी कांहीं दिवस म्हणजे चांगलें बरे होईपर्यंत डबल रोटी किंवा भात खातजा." मी म्हटलें "भात चालेल" व त्यांनीं लगेच डॉक्टरला सांगून भात सुरू केला. तो हि बारीक तांदुळाचा व पहिल्या वर्गाच्या भिशींतच ताजा शिजवून घ्यावा असा त्यांचा आग्रह होता, परंतु मी त्याला वश झालों नाहीं.

बाया, जीर्ण शरीरानें आपत्यसेवा करणें तुला अवघड झालें म्हणून तूं तो देह टाकून दिलास, तथापि जेलरच्या देहांत प्रवेश करून तूं अद्याप हि माझी काळजी वहात आहेस !

## (१५) बाया व भाऊ

आमच्या सर्वांत वडील बंधूंचें नांव अनंत, परंतु पहिल्या मुलाचें नांव घेऊं नये असें बायकी शास्त्र आहे म्हणून त्यांना हाक मारण्याचें नांव बायानें त्रिंबक ठेवलें होतें. आम्ही 'भाऊ' म्हणत असू.

भाऊंबद्दल बायाला विशेष अभिमान वाटे. त्यांचीं लहानपणचीं कौतुकें बाया पुष्कळदां मोठ्या प्रेमानें सांगत असे. शेजारचे शिदूकाका बागायतीचे विशेष शोकी होते. "त्यांची बागायत पाहून त्रिंबक झाडांचीं पानें आणून तींच मातींत खोवी व त्यांना पाणी घाली." मुंबईस व्हि. टे. इन्स्टिटच्यूटमध्यें शिकत असतांना सुद्धां स्वतःचा खर्च स्कॉलरशिप व शिकवण्यांवर भागवून काटकसर करून भाऊ बायाला कधीं दोन तर कधीं पांच रुपये देत असत त्याचा बायाला विशेषच अभिमान वाटे. त्यावेळीं तर हे दोन रुपये बायाला दोनशें रुपयांप्रमाणें वाटत. १९०८ सालीं उच्च औद्योगिक शिक्षणासाठीं भाऊ मँचेस्टरला गेले तेव्हां ते सुखरूप परत यावे यासाठीं बाया श्रीलक्ष्मीनारायणाला

५ रु. च्या पेढ्यांचा नवस बोलली होती. भाऊंची पण बायावर फार भक्ति होती. १९१४ च्या जून अखेर जेव्हां भाऊ एकाएकीं वारले तेव्हां तर मला भीति वाटली कीं बायाला हा धक्का सहन न होऊन बाया हि लवकरच परलोक गांठील. परंतु शंकर–पांडू यावेळीं लहानच होते. चि. भिमी हि लहान होती. तसेंच भाऊंच्या नमू चंपू हि लहान होत्या. त्यांच्या संगोपनाच्या जबाबदारीसाठींच बायानें भाऊंच्या मृत्यूचें दुःख सहन केलें.

इतरांच्या पुत्रशोकाविषयीं ती नेहमीं अत्यंत कळवळ्यानें बोलत असे : "आयाई ! पोटचा गोळा डोळ्यांदेखत मरायचा या पलीकडे दुःख कोणतें ? देवा, असला प्रसंग येण्यापूर्वींच माझे डोळे मीट रे !" इत्यादि.

१९१४ च्या एप्रिल-मे मध्येंच साळूताईच्या सासूबाई आमचे घरीं येऊन बायाला "अवांझ–वाण" देऊन लगेच निघून गेल्या. त्यानंतर २-३ महिन्यांतच बायाला पहिला अपत्य-शोकाचा प्रसंग आला. विलक्षण योगायोग खराच. "अवांझ–वाण" जिला भरपूर मुलें होऊन त्यापैकीं कोणी दगावलेलें नाहीं अशा सुवासिनीला देतात. यावेळीं भाऊ ३१-३२ वयाचे होते व सर्वांत धाकटा पांडू ३-४ वर्षांचा होता. अकारा हि मुलें सुखरूप होतीं. बालमृत्यु, अपमृत्यु, नासावणें इत्यादि कांहीं हि बायाच्या संतानांत नव्हतें. अर्थात् अवांझ-वाणाला बायाहून अधिक लायक सुवासिनी मिळणें दुर्घटच होतें.

साळूताईच्या सासूबाई दुपारच्या एक वाजणेचे सुमारास अवचित् आमचेकडे आल्या; बायाची ओटी भरली आणि अवांझ-वाण म्हणजे तांदूळ, खण, नारळ, पैसे व इतर अनेक किरकोळ वस्तु दिल्या व त्याच पावलीं तशाच उन्हांतून परत गेल्या; बहुधा शेजारीं आपल्या नणंदेकडे उतरल्या असाव्या.

## (१६) आका

सुमारें १९२९ पासून आकाचा दत्तू विलायतेंत गेल्यापासून वेडच लागलें तें दहा वर्षांनंतर तिचा अंत होईपर्यंत चालूच राहिलें. आकाच्या मुलांबद्दल बायाला फार जिव्हाळा वाटे. चि. द्वारकीला आपल्या सुनेसह १९४३ च्या फेब्रुवारींत बोलाविली होती. तिला जातांयेतांच्या गाडीखर्चासाठीं पैसे दिले. पुन्हां वैशाखांत ये म्हणून आग्रहानें सांगितलें व तिनें हि जमलें तर येईन असें म्हणून वेळ मारून नेली होती. परंतु पुढें ती किंवा तिची सून आली नाहीं. तेव्हां बाया मला पुन्हां पुन्हां विचारी "ती माझ्यावर रागावली का? मी कांहीं तिला बोलल्यें का?"

बायाच्या शेवटच्या आजाराचे मुदतींत ती. आकाचा मुलगा शंकर आमचेकडे बहुतेक वेळ रहात असे, त्याच्या खाण्यापिण्याची बाया नेहमीं आंथरुणांतून हि अत्यंत आस्थापूर्वक चौकशी करीत असे. 'चि. चंदूला एकदां घेऊन ये' असा तिचा चि. शंकरशीं नेहमीं लकडा असे, परंतु तिच्या मृत्यूपावेतों चंदू येण्याचा योग आला नाहीं.

## (१७) माझ्यावरील प्रेम

माझ्यावर ती. बायाचें सविशेष प्रेम होतें असें मला नेहमींच वाटत आलें आहे. तसें वाटण्याला कारणें काय याचा विचार करतां स्पष्ट कारणें कोणतींच सुचत नाहींत. बहुधा मी लहानपणापासूनचा अशक्त त्यामुळें बायाची माझ्याकडे अधिक ओढ असेल. मी लग्न केलें नाहीं, पैसे मिळवीत नाहीं, माझा म्हशीचें दुभतें खायचें नाहीं हा नियम, मधूनमधून पक्वान्नें खायचीं नाहींत, अध्येंमध्यें खायचें नाहीं यांसारखे अनेक नियम. इत्यादीमुळें तिला माझ्याविषयीं विशेष कळवळा वाटत असावा. चि. शंकर अशक्त व असहाय म्हणून त्याचेबद्दल तिला

पराकाष्ठेचा कळवळा वाटत असे. तसेंच चि. पांडू सर्वांत धाकटा व शिक्षण आटपून नोकरीला लागेपर्यंत त्याला कांहीं अडचणींतून हि जावें लागलें त्यामुळें त्याच्यासाठीं हि बायाचा जीव फार वळवळे.

८-९ वर्षांचा असतां मी रक्तबाऊनें फार आजारी पडलों--त्या-वेळची पवित्र स्मृति वर दिलीच आहे. नंतर लवकरच मराठी चौथी यत्ता शिकण्यासाठीं मी कुध्र्यास आजोळीं राहिलों. तेथें असतांना मला संग्रहणी झाली. शौचाला भसरें, घाईनें व दिवसांतून २-४ दां होई. अशक्तता त्या वयामध्यें जाणवत नसे, पण वाळलों होतों--इतका कीं कुल्ले सपाट होऊन गेले होते. त्यावेळीं माझी मुंज झाली होती व मी लंगोटी नेशीत असें. परंतु करदोटा कमरेवर संभाळणें कठिण होई, पुष्कळदां चालतांना करदोटा लंगोटीसह खालीं घसरून ढोपरांपर्यंत येई व मी नागडा बनें त्याची फार शरम वाटे. दर शनिवारीं मी सुटीचा घरीं येत असें व सोमवारीं सकाळीं एकदम शाळेंतच परत जात असें. इतर दिवशीं उजाडत उठून शौचमुखमार्जन झाल्यावरोबर शाळेला जाण्याची वेळ होई. त्यावेळीं कांहीं खाऊन जात असे कीं शाळा सुटल्या-वर येऊन खात असें तें स्मरत नाहीं. परंतु मी अशक्त झालों तेव्हां बाया माझेसाठीं लाडू करून कुध्र्यास पाठवी व मला शाळेंत जाण्यापूर्वी रोज एकेक खायला सांगे. लाडू बहुधा मूग, बेसन किंवा उडीद यांचे असत. त्या दिवसांत लाडू ही आमच्या शक्तीपलीकडची चैन होती. तरी सुद्धां घरखर्चांतून तूप सांठवून बाया माझेसाठीं लाडू करून देत असे. उडदाचे लाडू तर मला कुपथ्यकारकच होत असावे, परंतु उडीद पौष्टिक, त्यांचे लाडू खाऊन मी धष्टपुष्ट होईन असा लोभ बायाला वाटत होता.

चि. भिमी क्षयानें वारली. अखेरीस अगदीं अस्थिपंजर रहाला होता. मृत्यु होणार हें अगोदरपासून निश्चितच होतें, परंतु बायाला

मात्र आशा वाटे कीं "हाडें शाबूत आहेत तोंपर्यंत यांच्या आश्रयानें रक्तमांस अंगात भरण्याची आशा आहे."

कुर्ध्याच्या शाळेनंतर ३-४ वर्षांनीं मी रत्नागिरीस इंग्रजी ४-५ यत्तांत असतांना लागोपाठ दोन्ही वर्षीं संग्रहणी व कफ यांनीं आजारी पडलों, व ४-४ महिने शाळा सोडून घरीं येऊन राहिलों होतों. त्या सुमारास तर आमच्या घरीं चणचण फारच जाणवत होती. कुटुंब वाढलें होतें, बांधावरील माडांचा वाद हायकोर्टापर्यंत लढून त्यांत अपयश आलें व खर्चापायीं कर्ज मात्र झालें होतें. ती. भाऊ पुढील शिक्षणासाठीं सरकारी शिष्यवृत्ति मिळवून विलायतला गेलेले होते. मला स्वत: इंग्रजी तिसरीनंतर मिळावयाची "हायस्कूल स्कॉलर्शिप" मिळाली नाहीं. त्यामुळें माझ्या शिक्षणखर्चाची हि अडचण होती. ती. बाबा वैतागून दोनदां "फिरस्ता ब्राह्मण" म्हणून भिक्षाटन करण्यास बाहेर पडले होते. गुळचाचे गडी कोणाला तरी डोलींतून रत्नागिरीस पोचविण्यास आले होते. ती. बायोआतेनें मला कफक्षय झाला ठरवून त्याच डोलींतून घरीं पाठवून दिलें. मजुरी सहा आणे ठरविली होती, ती घरीं पोचल्यावर ती. बायालाच द्यावी लागली. तेव्हां बाया म्हणाली "चालत येतास तर या सहा आण्याचें तुलाच शेर भर तूप खायला मिळालें असतें." तशा स्थितींत हि तीनें माझी शक्य ती शुश्रूषा केली.

## (१८) विंचवाचा दंश

मी सुमारे १८-१९ वर्षांचा असतांना मला दिवे लागणीच्या वेळेला विंचू चावला, व तो फार बाधला हि. सुमारें १-२ वाजेपर्यंत मी विव्हळत होतों; मग बायाला मला थोपटायला सांगितलें. तिच्या थोपटण्यानें मला झोप लागली !

## (१९) "तूं लग्नाच्या भरीस पडूं नकोस"

मला समजूं लागलें तेव्हां पासूनच माझा ब्रह्मचर्याकडे ओढा होता. ती. भाऊ, तात्या यांचीं लग्नें लहान वयांतच झालीं. लग्नाचे वेळीं ती. तात्यांना २० वर्षें हि पुरीं झालीं नव्हतीं. माझ्या लग्नाची विचारणा सुरू होण्यास अधिक अवधि लागला. तरी हि २२-२४ वर्षांचें वय म्हणजे लग्नाच्या वयाची पराकाष्ठा असेंच मानलें जात होतें. इंद्रिय-लोलुपते-बाबत किळस हें तर ब्रह्मचर्याच्या विचाराचें प्रमुख कारण होतेंच, परंतु त्याखेरीज लग्न केल्यानें आपण बायापासून दुरावूं म्हणून हि लग्न करूं नये असें वाटे. सासवासुनांचा संबंध अहि-नकुलवत् आहे. ती. बाया सौम्य व सोशिक असली तरी हि सुनांशीं तिची खुली वृत्ति दिसत नसे. तिचा नव्हे पण त्या नात्याचाच तो दोष होता. सुनेच्या निमित्तानें मग मुलगा हि दुरावतो. आमचें कुटुंब मोठें होतें. "मला बहिणी, भाऊ, आते, मावशा, मामा, आजी (दोहीं कडील) इत्यादि प्रेमाचीं इतकीं माणसें असतांना आणखी एका परक्या माणसाशीं प्रेम जोडण्याची आवश्यकता काय ?" असे हि विचार माझ्या मनांत येत. माझी मावसबहीण सोनूताई हिनें एकदां मला "सीताराम तूं लग्न कां करीत नाहींस ?" असें विचारलें तेव्हां तिला मीं वरील कारणेंच सांगितलीं होतीं. तरीपण ब्रह्मचर्याबाबत माझे मनामध्यें आत्मविश्वास नव्हता.

१९१८ च्या अखेरीस मी ब्रह्मचारीच रहायचें असा मनाचा घडा केला. गांधीजींचें "स्वास्थ्य-संरक्षण" हें मराठी भाषांतरित पुस्तक मीं वाचलें होतें. त्यांत विवाहितांनीं हि ब्रह्मचर्य पाळावें अशी शिफारस होती.

त्यावेळीं ती. काशीवैनी नमू-चंपूच्या शाळेसाठीं रत्नागिरीस जाऊन राहिली होती व घरीं बायाजवळ चि. शंकर, पांडू व

भिमी या लहान मुलांखेरीज कोणी नव्हतें. ती. बाबा १९१६ अखेर वारले. बायाची दृष्टि आधींपासूनच अधू होती व गेले १० वर्षांपासून तिची प्रकृति हि अधू झाली होती. तिच्या हाताशीं एकादी सून पाहिजे असें वाटत होतें.

शिवाय त्याच सुमारास मी स्वास्थ्य-संरक्षणांतील उपदेशास अनुसरून गुळच्यास घरीं शेतीभाती करूनच जीवन घालविण्याचा निश्चय केला व न्यू पूना कॉलेजच्या चालकांना मी तहाहयात नोकर होत नाहीं अशी हि नोटीस दिली. घरीं शेती करून घरभारी होऊन रहायचें तर पुढें मागें गृहिणी असणें इष्ट, बायाला हि मदतनीस पाहिजे असें वाटत होतें व चि. वासूनें 'आपण आणखी दोन वर्षें लग्न करूं इच्छीत नाहीं' म्हटलें, तेव्हां १९१९ च्या सुरवातीला मी लग्न करण्याचा विचार केला. त्यावेळीं मी पुण्यास, म्हणजे लग्नाच्या बाजारपेठेंतच, होतों. त्यामुळें मुली एकसारख्या सांगून येतच असत. नंतर मार्चअखेर मी रौलॅट ॲक्ट सत्याग्रहाच्या प्रतिज्ञेवर सही दिली व परिणामीं न्यू पूना कॉलेजमधील जागेचा राजिनामा दिला. कॉलेजला सुटी होऊन मी घरीं आलों तों तिकडे हि मुलींच्या पालकांकडून सांगी येतच होत्या. "मी प्रोफेसरकीचा राजिनामा दिला आहे, शेतकरीच होणार आहें, सत्याग्रहांत सामील झालों आहें व लग्न केलें तरी आजन्म ब्रह्मचारीच रहाण्याचा माझा निर्धार आहे" हा पाढा मी प्रत्येकाजवळ वाचीतच असें. कोणी त्यामुळें माघारे जात तर कोणी माझे हे बेत मनावर न घेतां आपली सांगी कायम ठेवीत. येणाऱ्या मंडळीशीं होणारीं बोलणीं ती. बायाच्या कानीं पडतच असत.

तिनें मला एकदां जवळ बोलावून निक्षून सांगितलें कीं "तूं लग्नाच्या भरीस पडूं नकोस. तूं माझ्यासाठीं लग्न करण्याची जरूर नाहीं. माझें कसें हि चालेल. तूं म्हणतोस आपल्याला वारंवार तुरुंगांत

जावें लागणार. लग्न करून तूं वाट फुटेल तिकडे चालता होशील, आणि मागें माझ्याच गळ्याशीं फांस. त्यापेक्षां तूं लग्नच न केलेलें बरें." मी तरी तिला हाताशीं सून व्हावी म्हणूनच लग्न करणार होतों. तीच नको म्हणाली तेव्हां "खुदा बी रंजिस मिया बी रंजिस असें कशाला ?" म्हणून मीं हि लग्नाचा विचार सोडून दिला. कर्मधर्मसंयोगानें चि. वासूनाना हि लग्न करण्यास तयार झाला. तेव्हां मीच पुढाकार घेऊन त्याच हंगामांत त्याचें लग्न उरकून टाकलें.

ती. बायानें मला वेळींच जागें केल्याबद्दल मी तिचा जन्माचा ऋणी आहें. लग्न करतों तर माझा स्वतःचा ब्रह्मचर्याचा निर्धार टिकता कीं नाहीं याबद्दल आतां मला संशय वाटतो. शिवाय दुसऱ्या पक्षाच्या कुचंबणेचा प्रश्न हि विचारांत घेणें आवश्यक आहे. "ज्याचा ब्रह्मचारी रहाण्याचा बेत आहे त्यानें लग्न करतांच कामा नये." असेंच मी आज मत देईन. परंतु त्यावेळीं माझा ध्येयवाद व आत्मविश्वास अनुभवाच्या अभावीं अवास्तव होता.

अखेरचे तेरा महिने ती. बायाची माझेकडून वाईटवरीच परंतु अखंड व एकाग्र सेवा घडूं शकली हेंच मी माझ्या ब्रह्मचर्याचें सार्थक समजतों. (एकाग्र म्हणजे अन्य व्यवधानांपासून मोकळी एवढेंच; मनाची एकाग्रता मर्यादितच होती.)

## (२०) माझे नियम व बायाच्या कल्पना

१९१८ सालींच "स्वास्थ्यसंरक्षणां"तील शिफारशीवरून मी दूध-दुभतें सोडण्याचे प्रयत्न सुरू केले होते; '२० पर्यंत ते मधूनमधून चालवून अपेश घेऊन कायमचे सोडले. अशा एका प्रयत्नाचे वेळीं प्रथम फक्त ताक चालू ठेवून दुभत्याचे इतर जिन्नस वर्ज्य केले. ती. बायाला

हा संकल्प सांगितला. दुसरे दिवशीं मी जेवायला बसलों तेव्हां बायानें माझ्यापानासमोर ताकाची कथली आणून ठेवली. पहातों तर तें ताक म्हणजे मठ्ठाच नव्हे तर चक्काच होतें! मी फक्त ताकच घेणार म्हणून बायानें साहीच्या घट्ट विरजणाचे पाणी न घालतां ढवळून मला ताक आणून दिलें!

मिष्टान्न न खाण्याचे नियम हि १९१८ सालापासून अनेकदां धरले व अनेकदां ते सुटले अहेत. एकदां असाच गणेशचतुर्थीच्या दिवशीं मी घरीं आलेला असतां बायाला सांगितलें कीं मी मोदक खाणार नाहीं. "गणेशचतुर्थीचा दिवस, तेव्हां नैवेद्याच्या पानावर मोदक पाहिजेत आणि नैवेद्य टाकून कसें चालेल?" असा युक्तिवाद तिनें केला तेव्हां मी म्हटलें बरें "नैवेद्यापुरता एक खाईन."

दुपारीं माझ्या पानावर नैवेद्यापुरता एकच मोदक मांडलेला आढळला. मात्र तो शेराएवढा होता!

## (२१) बायाची फजिती

यावरून माझ्या लहानपणची एक बायाची फजिती आठवली.

सात वर्षांचा असतांना मला कोणीं सांगितलें कीं फणसाच्या (फळाच्या) तळाकडील गऱ्यांच्या आठिळांपासून होणारें रोप विशेष चांगलें असतें, व त्यावर पुढें मोठीं फळें धरतात. मला अशा तळाच्या आठळांचें रोप तयार करण्याची इच्छा झाली, म्हणून मी बायाला माझेसाठीं तळच्या आठळा निराळ्या काढून ठेवण्यास सांगितलें, व तिनें तें मान्य केलें. (आमच्याकडे फणस थोडेच पिकत व ते हि मी शाळेला गेलेला असतांना फोडले जाऊन संपत. आमचा वांटा काढून ठेवीत तो तळचाच असेल असें नाहीं.) मी शाळेंतून घरीं येतांच बायाला "तळच्या आठळा ठेवल्यास का ?" असें विचारीं व ती "विसरल्यें, पुढच्या वेळीं ठेवीन हां" असें उत्तर देई. शेवटीं

एक दिवशीं तिनें मला "होय, ठेवल्या आहेत" असें सांगितलें. मी त्या रुजत घालण्यास उतावळा झालेला असल्यामुळें ती खोलींतून त्या निवडक आठिळा आणण्यास गेली. मी तिच्या मागोमाग गेलों, तें तिच्या लक्ष्यांत आलें नाहीं. भरलेल्या काथोटींतून ती मूठभर आठिळा उचलते तोंच मी मागून ओरडलों "वा, याच का तुझ्या तळच्या आठिळा?"

बाया चपापली व म्हणते "मेल्या, तूं पाठीशीं का आहेस?"

काथोटींतल्या मूठभर आठिळा तळच्या म्हणून माझ्या स्वाधीन करून माझा ससेमिरा चुकविण्याचा तिनें विचार केला होता.

## (२२) गाईच्या तुपासाठीं आटापीट

शेवटलीं पांचसात वर्षे ती घरांतल्या-घरांत कशीबशी फिरे. यापलीकडे स्वत: कांहीं करण्याची ताकद तिला राहिली नव्हती. या असहाय्यतेमुळें तिचा स्वभाव अधिकच उतावळा झाला होता. माझा गाईचेंच दुभतें खाण्याचा नियम आहे. मी घरीं जाण्याचा अंदाजो दिवस आगाऊ कळविलेला असला व घरीं गाईचें दुभतें नसलें कीं ती आगाऊ दोन दिवसांपासून गावांतून गाईचें दुभतें मिळवून त्याचें विरजण तयार ठेवीत असे. मी कधीं पूर्व सूचनेशिवाय आगाऊ पोचलों कीं लगेच कोणाला तरी गांवांत पाठवून माझेसाठीं दूध, दही, ताक, तूप सर्व प्रकार मागून आणवीत असे. मी एका जेवणापुरताच घरीं रहायचा असलों तरी हे सर्व उपलभ्य प्रकार आलेच पाहिजेत. मला मऊ भात आवडतो, दूधपोहे आवडतात इत्यादि माझ्या आवडी तिनें ठरवून ठेवलेल्या होत्या. म्हणून मी घरीं जेवणास उशीरां पोचलों व माझें केवळ भाकरीवर भागण्यासारखें असलें तरी मुद्दाम मऊ भात केला जाई व तोच खाऊन मला समाधान मानावें लागे. परत निघतांना पोहे, साटें व तूप भरून बाटली माझेसाठीं तयार

असे. पोहे घरीं शिल्लक नसले तरी गांवांतून उसनवार आणी. याशिवाय माझ्यासाठीं तुपाची बाटली दर महिना-पंधरा दिवशीं रत्नागिरीस पोचविण्याची तिची धडपड चालत असे. तेथून ती माझेकडे कणकवलीस पोचती होण्याचीं साधनें होतीं. चि. श्रीपतकडून ही व्यवस्था वेळेवर न झाली तर ती ती. गणपति मामांमार्फत तूप पैदा करून बाटली रत्नागिरीस पोचविण्याची व्यवस्था करवून घेई. हें काम योजल्यापासून तें पार पडेपर्यंत तिला धीर किंवा चैन राहीना. कधीं तुपाच्या बाटलीबरोबर मुगाच्या किंवा डिंकाच्या लाडवांचा डबा हि असे. आणि या साऱ्या गोष्टी तिला पडल्या-पडल्या इतरांकडून त्वरेनें करवून घेण्यासाठीं खूप आटापीट करावी लागे.

## (२३) "तुझें कोण रे करील ?"

शेवटल्या दूखण्यामध्यें मी तिची चाकरी करीत असतां बाया पुष्कळदां मला म्हणे:-"माझी तूं चाकरी करतो आहेस पण तुझे जेव्हां हातपाय चालतनासे होतील आणि तूं आंथरुणावर पडशील तेव्हां तुझें कोण रे करील ?" मी सांगत असें "बाया, तुझें करायला तुझीं मुलें तेवढींच, आणि तीं सुद्धां आपापल्या प्रपंचांत अडकलेलीं, पण माझें करायला कितीतरी माणसें आहेत."

## (२४) चि. शंकरबद्दल कळवळा

चि. शंकरबद्दल तर तिला करुणेचें व वात्सल्याचें विशेषच भरतें येई. तो दमेकरी, अशक्त व असहाय. ४-४ महिन्यांनीं किंवा त्याहून हि कमी अवधीनें त्याला दमा, खोकला, ताप येऊन चार सहा दिवस तो आंथरुणाला खिळलेला असे. त्यावेळीं बाया फार चिंतातुर होई व अखेरच्या दिवसांत जेव्हां तिला स्वतःला त्याची शुश्रूषा करणें अशक्य असे तेव्हां ती इतरांकडून करवून घेण्यासाठीं तर ती विशेषच उत्सुक व त्रासिक हि बने.

एक दिवशीं तिनें मला "होय, ठेवल्या आहेत" असें सांगितलें. मी त्या रुजत घालण्यास उतावळा झालेला असल्यामुळें ती खोलींतून त्या निवडक आठिळा आणण्यास गेली. मी तिच्या मागोमाग गेलों, तें तिच्या लक्ष्यांत आलें नाहीं. भरलेल्या काथोटींतून ती मूठभर आठिळा उचलते तोंच मी मागून ओरडलों "वा, याच का तुझ्या तळच्या आठिळा ?"

बाया चपापली व म्हणते "मेल्या, तूं पाठीशीं का आहेस?"

काथोटींतल्या मूठभर आठिळा तळच्या म्हणून माझ्या स्वाधीन करून माझा ससेमिरा चुकविण्याचा तिनें विचार केला होता.

## (२२) गाईच्या तुपासाठीं आटापीट

शेवटलीं पांचसात वर्षें ती घरांतल्या-घरांत कशीबशी फिरे यापलीकडे स्वतः कांहीं करण्याची ताकद तिला राहिली नव्हती. या असहाय्यतेमुळें तिचा स्वभाव अधिकच उतावळा झाला होता. माझा गाईचेंच दुभतें खाण्याचा नियम आहे. मी घरीं जाण्याचा अंदाजी दिवस आगाऊ कळविलेला असला व घरीं गाईचें दुभतें नसलें कीं ती आगाऊ दोन दिवसांपासून गावांतून गाईचें दुभतें मिळवून त्याचें विरजण तयार ठेवीत असे. मी कधीं पूर्व सूचनेखेरीज आगाऊ पोंचलों कीं लगेच कोणाला तरी गांवांत पाठवून माझेसाठीं दूध, दही, ताक, तूप सर्व प्रकार मागून आणवीत असे. मी एका जेवणापुरताच घरीं रहायचा असलों तरी हे सर्व उपलभ्य प्रकार आलेच पाहिजेत. मला मऊ भात आवडतो, दूधपोहे आवडतात इत्यादि माझ्या आवडी तिनें ठरवून ठेवलेल्या होत्या. म्हणून मी घरीं जेवणास उशीरां पोंचलों व माझें केवळ भाकरीवर भागण्यासारखें असलें तरी मुद्दाम मऊ भात केला जाई व तोच खाऊन मला समाधान मानावें लागे. परत निघतांना पोहे, साटें व तूप भरून बाटली माझेसाठीं तयार

असे. पोहे घरीं शिल्लक नसले तरी गांवांतून उसनवार आणी. याशिवाय माझ्यासाठीं तुपाची बाटली दर महिना-पंधरा दिवशीं रत्नागिरीस पोचविण्याची तिची धडपड चालत असे. तेथून ती माझेकडे कणकवलीस पोचती होण्याचीं साधनें होतीं. चि. श्रीपतकडून ही व्यवस्था वेळेवर न झाली तर ती ती. गणपति मामांमार्फत तूप पैदा करून बाटली रत्नागिरीस पोचविण्याची व्यवस्था करवून घेई. हें काम योजल्यापासून तें पार पडेपर्यंत तिला धीर किंवा चैन राहीना. कधीं तुपाच्या बाटलीबरोबर मुगाच्या किंवा डिंकाच्या लाडवांचा डबा हि असे आणि या साऱ्या गोष्टी तिला पडल्या-पडल्या इतरांकडून त्वरेनें करवून घेण्यासाठीं खूप आटापीट करावी लागे.

## (२३) "तुझें कोण रे करील ?"

शेवटल्या दुखण्यामध्यें मी तिची चाकरी करीत असतां बाया पुष्कळदां मला म्हणे:—"माझी तूं चाकरी करतो आहेस पण तुझे जेव्हां हातपाय चालतनासे होतील आणि तूं आंथरुणावर पडशील तेव्हां तुझें कोण रे करील ?" मी सागत असें "बाया, तुझें करायला तुझीं मुलें तेवढींच, आणि तीं सुद्धां आपापल्या प्रपंचांत अडकलेलीं, पण माझें करायला कितीतरी माणसें आहेत."

## (२४) चि. शंकरबद्दल कळवळा

चि. शंकरबद्दल तर तिला करुणेचें व वात्सल्याचें विशेषच भरतें येई. तो दमेकरी, अशक्त व असहाय. ४-४ महिन्यांनीं किंवा त्याहून हि कमी अवधीनें त्याला दमा, खोकला, ताप येऊन चार सहा दिवस तो आंथरुणाला खिळलेला असे. त्यावेळीं बाया फार चिंतातुर होई व अखेरच्या दिवसांत जेव्हां तिला स्वतःला त्याची शुश्रूषा करणें अशक्य असे तेव्हां ती इतरांकडून करवून घेण्यासाठीं तर ती विशेषच उत्सुक व त्रासिक हि बने.

मी रात्रीं तिच्या लगत झोपत असें, पण शंकर आजारी असला म्हणजे ती मला म्हणे "माझ्याजवळ नको कोणी झोपायला. तू शंकरच्या जवळ झोप." (स्वत:ला ५-५ मिनिटांनीं कसली तरी जरूरी पडते याचें तिला भानच रहात नसे ) स्वत: कांहीं खाण्यापूर्वी शंकरनें काय खाल्लें याची चौकशी व्हायचीच. "तो खात नाहीं आणि मी मात्र किती आसतुटी !" असें हि म्हणायची. रात्रीं तिला चहा करून द्यावा लागे, पण शंकरला बरें नसलें म्हणजे ती मुद्दाम चहा मागायची व शंकरला पण दे म्हणायची; शंकरला मिळावा एवढ्यासाठींच आपल्याला पाहिजे म्हणे. शेकायला रुईचीं पानें आणायला सांगे व पानें आणून शेगडी पेटवून शेकण्याची तयारी केली म्हणजे शंकरची छाती शेकायला सांगे. स्वत:साठीं म्हणून रव्याची कांजी करायला सांगे व ती तयार झाल्यावर "आधी शंकरला द्या, त्याला म्हणावें शिल्लक राखायला नको." असें म्हणे. प्रथमपासून शंकरचेंच नांव सांगितलें तर करतील कीं नाहीं कोण जाणे, अशी तिला शंका वाटत असावी. एकदां मला म्हणाली "मी मेल्यें तर कोणाला सुद्धां वाईट वाटायचें नाहीं, एकट्या शंकरला मात्र वाईट वाटेल" आपल्या मागें शंकरचें कसें होईल याची तिला सतत चिंता वाटे. मृत्यूच्या पूर्वी १-२ महिने एकदां जानकीकाकूला बोलावून सांगितलें "मी मेल्यें तरी आमचें घर सोडूं नका हो,- शंकर आहे."

## (२५) बचीवरील माया

चि. भिमीनें आपल्या मृत्यूपूर्वी कांहीं दिवस बायाला विचारलें होतें "बाया मी आतां मेल्यें तर माझ्या बचीला कोण ग ?" बायानें "मी आहे ना ?" असें सांगितलें होतें.

बची बडोद्याला गुणीबरोबर उषाला सांभाळायला उपयोगी पडण्यासाठीं म्हणून गेली, परंतु तेथें शाळेंत जाऊं लागली व एकदम

अनुक्रम .................... वि: ..................
बायाचीं पुण्य-स्मरणें ........ नों: दि: ..............



इंग्रजी तिसऱ्या यत्तेंत बसली, व पांच वर्षांत मॅट्रिक झाली याचा बायाला साहजिकच अभिमान वाटे. शेवटले ८ महिने बची गुळच्यास बायाजवळच होती, त्या मुदतींत बाया तिला क्षणभर विसंबत नसे प्रथम आली तेव्हां तिचें मणगट धरून बायानें "बची फार थकली आहे, अगदीं पाण्याचें पितर बनली आहे" असा आपला अभिप्राय सांगून टाकला. कांहीं महिन्यांनंतर, आतां थोडी सुधारली आहे, असा हि अभिप्राय दिला. दोन्ही अभिप्राय अंशतःच खरे होते. डोळ्यांनीं दिसत नसतां हि बाया तर्कानें किती तरी गोष्टी जाणत असे. याचें एक उदाहरण देतां येण्यासारखें आहे.

## (२६) बायाची तर्क-शक्ति

शेवटच्या आजारांत मी तिच्या शुश्रूषेला असतांनाचीच गोष्ट. कुणबी-सेवा-संघाचे चालक श्री. सामंत गुरुजी मला भेटण्यास आले होते. तेव्हांच ती. गणपतिमामा हि बायाला भेटण्यास आले होते. सामंत आमच्या पंक्तीलाच बसले व ती. वैनीनें त्यांचें उष्टें हि काढलें. बायानें या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतल्या होत्या. मामांना ही सुधारणा आवडणार नाहीं असें हि तिला वाटलें. कांहीं दिवसांनंतर कोणी तरी कुध्र्यास जात असतां तिनें त्याचे बरोबर मामांना निरोप पाठविला कीं "परवां काशीनें उष्टें काढलें तरी ती नंतर लुगडें पालटून मग स्वतः जेवली. कसला हि भ्रष्टाकार तिनें केलेला नाहीं." वैनीनें विचारलें "मीं लुगडें पालटलें हें तुम्हांला कोणीं सांगितलें?" बाया म्हणाली "जेवणें होऊन गेल्यावर उष्टीं काढल्यावर तूं माळावर चढली होतीस आणि त्यानंतर जेवायला बसलीस. माळावर सोवळ्यांत वाळत घातलेलें लुगडें आणायलाच गेलेली असणार."

तर्कातर्कानें ती इतर हि किती तरी ग्रंथ बनवीत असे व ते पुष्कळदां सर्वस्वी निराधार हि असत. उदा० "चि. श्रीपतानें मुलें होऊं नयेत

अशासाठीं पंचवीस रुपयांचीं औषधें खाल्लीं." याला पुरावा म्हणजे चि. श्रीपतला ती. सत्यभामावैनी श्रीपतचें लग्न आटपल्यानंतर मुंबईस जाते वेळीं म्हणाली होती "आम्ही पुढल्या वर्षी येऊं तोंपर्यंत मुलगा झाला पाहिजे." त्यावर श्रीपत "तुम्हांला पाहिजे असें वाटत असेल परंतु मला नको आहे ना" असें म्हणाला होता. त्यानंतर श्रीपत कसलें तरी औषध घेत असे, औषधांची एक बंगी व्ही. पी. नें हि आली होती. एवढ्यावरून बायानें एवढी कथा रचली.

दुसरा एक बायाला संशय म्हणजे श्रीपत आपल्या मृत मेव्हणीच्या मुलाला मनोहरला दत्तक घेणार आहे. केव्हां तरी चि. सौ. पद्मा-बरोबर मनोहर गुळचास आला होता व तेव्हां श्रीपत हि 'मन्याचें' कौतुक करीत असावा. आणखी एक पुरावा म्हणजे मनोहरची अद्याप मुंज झालेली नाहीं. त्यावरून बायानें ठरवलें कीं आपल्या मृत्यूनंतर श्रीपत त्याची मुंज करील व त्याला दत्तक घेईल.

या दोन्ही गोष्टी साफ खोट्या आहेत असें मी व ती. वैनीनें ती. बायाला वारंवार सांगितल्यापासून बाया पुन्हां तें बोलतनाशी झाली, परंतु तिच्या मनांतून हि तें निघून गेलें होतें किंवा नाहीं या-बद्दल शंका आहे. असो, पण आतां परत चि. कालिंदी (बची) कडे वळलें पाहिजे.

## २७ पुन्हां बची

कालिंदी मॅट्रिक पास झाल्याची बातमी आली त्याबरोबरच कल्याच्या अभ्यंकरांनीं तिला आपल्या शाळेंत मास्तरीण म्हणून येण्याचें निमंत्रण पाठविलें. कालिंदीची जाण्याची इच्छा होती व मला हि तें पसंत होतें. परंतु बायानें जोराचा विरोध केल्यावरून तो विचार सोडून देण्यांत आला. बायाचें पहिलें कारण कालिंदी थकली आहे, त्या-साठीं घरींच राहून प्रकृति सुधारूं दे. परंतु दुसरें कारण अधिक

महत्त्वाचें होतें, कीं कालिंदी मोठी वाढलेली व लग्न व्हायचें आहे. अशा स्थितींत परक्या ठिकाणीं राहिली तर लोकांना भलत्याच कंड्या उठविण्यास फावेल व त्यामुळें लग्न जुळविण्यामध्यें हि अडचण उद्भवेल, या गोष्टीचें बायाला फारच भय वाटे. कालिंदी कुठें गेली, कोणाशीं बोलते इत्यादि तिच्या सर्व हालचालींवर बायाची सतत दृष्टि असे. बाहेर कोणी परके पुरुष आलेले असतांना कालिंदी बाहेर जाऊन त्यांच्याशीं बोललेली बायाला खपत नसे. कालिंदीनें रात्रीं माजघरांत तिच्या मामींच्या शेजारींच झोपावें असा दंडक बायानें घालून दिलाच होता.

या काटेकोर शिस्तीचें आणखी हि एक कारण असें होतें कीं कालिंदी आपल्यापासून क्षणभर हि दूर झालेली च बायाला खपत नसे. आपल्या वडिलांकडे दोन दिवस रहाण्यास गेली तरी बाया वैतागानें म्हणायची कीं "आतां आठ दिवस येऊ नको." व उलट रात्रीं मला विचारायची "आतां उजाडतांच बचीला आणण्यासाठीं मनुष्य धाडूं का ?" घरांत बची दळणें, संवयीसाठीं थोडें कांडणें यांसारखीं श्रमाचीं कामें हौसेनें करी, पण त्याचा बायाला राग येई. त्याऐवजीं तिनें निरनिराळे खाद्य पदार्थ तयार करण्याचें शिक्षण घ्यावें असा तिचा आग्रह असे, कारण त्या निमित्तानें रोज नवीन नवीन कसले तरी प्रकार करण्याची बायाची हौस हि सहजीं भागणार होती ! शेवटल्या दुखण्यांत बाया त्रासिक झाली होती, –सर्वच आजारी माणसें होतात–व कधीं कधीं बचीवर रागावत हि असे परंतु राग ओसरल्यानंतर म्हणे "मी किती दुष्ट ? ती पोर चार दिवस घरीं आली तर मी तिला किती राबवतें आणि किती रागा-वतें ? उद्यां लग्न झालें म्हणजे मग आमच्या नजरेला सुद्धां पडणार नाहीं." रात्रीं बायाला आंथरुणासह उचलून इकडून तिकडे फिरवावी लागत असे. अशा प्रसंगीं मला हात लावायला कोणी तरी पाहिजे

असे. परंतु बाया मला बचीला उठवूं देईना. बचीला रागावल्याबद्दल तिची माफी मागण्याची घाई बायाला पुष्कळदां लागे. अशा प्रसंगीं मात्र ऐन मध्यरात्रीं सुद्धां बचीला हांका मारून जागी करून स्वतः-पाशीं बोलावी व "तुला राग का आला मी बोलल्यें त्याचा ?" किंवा "मी तुझे पाय धरत्यें" म्हणून क्षमा मागे.

अशा तऱ्हेनें क्षमा मागण्याचे प्रकार ती. वैनीच्या, चि. सौ. पद्माच्या व क्वचित् इतरांच्या बाबतींत हि घडत असत, फक्त माझी क्षमा तिनें कधींच मागितली नाहीं याबद्दल मला अभिमान वाटतो. त्याचा अर्थ माझ्यावर तिचा हक्कच आहे असें तिला वाटत असे. असो.

बचीला चांगला नवरा मिळावा याबद्दल बायाला अतोनात कळ-कळ वाटून राहिली होती. वारंवार म्हणे "पोरीला चांगलें स्थळ मिळायला हवें. उगीच कसला तरी मारकुटा नवरा मिळून चालणार नाहीं. आमची बची इतरांच्या पोरींसारखी नाहीं. ही भोळी आणि मुखदुर्बळ. तिला चांगलें सासर मिळायला हवें." तें कसें मिळेल याची तिला सारखी चिंता लागून राहिली होती.

## (२८) माझ्यावरील प्रेम—पुरवणी

मागें तिच्या माझ्यावरील प्रेमासंबंधीं लिहितांना लिहिण्याचें राहिलें, कीं मी परोलवर तिच्या शुश्रूषेसाठीं आल्यानंतर लवकरच एकदां ती. गणपतिमामा आले असतां (कित्येक महिने ते आठवड्यां-तून एकदां ती. बायाला भेटण्यास येत) ती. बाया त्यांचेकडे बारीक पोह्यांची चौकशी करीत होती. मामांच्या घरीं हि बारीक भाताचे पोहे तयार नव्हते, पण कांडून पाठवूं म्हणाले. "कोणाला पाठविणार का आहेस ?" मामांनीं विचारलें.

बाया:–पाठवायचे नाहींत. सीताराम आला आहे त्याला दुधांत पोहे घालून खायला आवडतात. आमच्या घरीं जाड पोहे आहेत पण बारीक नाहींत.

मामा:– सीतारामासाठींच ना ? मग बारीक पोह्यांची अगदीं निकडच आहे असें नाहीं. तो काय, जाडे सुद्धां खाईल.

खरोखरी मामांनीं ही माझी स्तुति च केली. सीताराम जिभेचे चोजले करणारा नव्हे, हेंच त्यांना दर्शवायचें होतें परंतु त्यांचे शब्द बायाला झोंबले.

त्यावेळीं तीं. सईमावशी मुंबईहून बायाला भेटण्यासाठीं ८-१५ दिवस आली होती. मामा गेल्यानंतर तिच्यापाशीं बाया म्हणते "गणपति बोलला त्याचें मला भारी वाईट वाटलें. सीतारामला म्हणे कशाला हवेत बारीक पोहे! कां, सीतारामची लायकी जाड्या पोह्यां-पुरतीच का ? तो मिळवता नाहीं म्हणून काय त्याची लायकी नाहींशी झाली ? त्यानें दुनियेचा प्रपंच पत्करला आहे. मी तर म्हणत्यें कीं सीतारामाची सर कोणालाच यायची नाहीं. आमचा सीताराम म्हणजे एक रत्न आहे. ओझेंभर पैसे मिळवले म्हणजेच सगळें झालें असें नाहीं."

याहून मोठें सर्टिफिकेट मला कोठून मिळणार ?

## (२९) आयुष्याचें सिंहावलोकन

लग्न झालें तेव्हां बाया अवघी सहा वर्षांची होती. लग्नांत तिचे पैसे घेण्यांत आलेले होते. तिच्या सोळाव्या वर्षींच तीं. भाऊ झाला. चि. शंकर झाला तेव्हां ती ४३ वर्षांची होती. तेव्हांपासून शेवटलीं ३५ वर्षें तिची प्रकृति यथातथाच होती. दृष्टि प्रथमपासूनच अधु. चष्मा मिळता तर दृष्टि टिकून राहूं शकली असती परंतु त्या दिवसांत

व त्यांतून बायकांना, चष्मा वापरण्यास कोण देणार ? आणि डोळ्यांच्या म्हणजे क्षुल्लकशा वाटणाऱ्या दुखण्यावर औषधें तरी कोण करणार ?

ती. बाबा १९१६ सालीं वारले त्या वेळीं ती. बाया पन्नाशी-पलीकडे होती व अशक्त हि झालेली होती. त्यानंतर आणखी २७ वर्षे काढील अशी कल्पना हि नव्हती. शेवटलीं सुमारें १० वर्षें ती चुलीशीं कांहीं करूं शकत नव्हती तरी हि त्यांपैकीं पहिलीं ५ वर्षें पहाटे उठून चूल पेटविणें व पाणी तापत ठेवणें हें ती करीत असे. शेवटच्या दहा वर्षांमध्यें घराची व्यवस्था, जमाखर्च इत्यादि तिच्या हातीं नव्हतें, चि. श्रीपत व्यवहार पाही.

बायाचा स्वभाव उदारच नव्हे पण उधळ्या होता. तिच्या संग्रहाला कधीं पैसा शिल्लक असायचा नाहीं. १९१७ सालीं ती. तात्यांना नोकरी लागल्यापासून घरीं खर्चाची अडचण पडूं नये इतके पैसे ते नियमितपणें पाठवीत असत व बायाची अधिक पैशांची मागणी हि नव्हती. परंतु येणारे पैसे पुरवून वापरणें बायाला कधींच जमलेलें नाहीं. पैसे येण्यापूर्वीं त्यांचे खर्च ठरलेले असत व पैसे आल्यापासून ४-८ दिवसांत बायाचा पैशांचा बुडकुला रिकामा व्हायचाच. पुन्हां पैसे येई-पर्यंत थोडेंबहुत कर्ज झालेलें हि असायचेंच. ती. बापूअण्णा व यमनू-मावशी हे तिचे हुकमी सावकार होते. प्रसंगीं ती. वैनीकडून हि उसनें घेत असे. ती. बापूअण्णा आपल्या नेहमींच्या चुरचुरीत पद्धतीनें बाया-विषयीं म्हणत असे. "बायाला एक हजार रुपये द्या, आणि तिसऱ्या दिवशीं तिचा बुडकुला तपासा, रिकामा आढळेल."

बायाला कधीं कुलूप-किल्ली पेटी इत्यादि माहीत नाहीं. दुभ-त्याच्या फडताळांत एका बुडकुल्यांत तिचा खजिना असायचा, आणि तो सर्वांच्या हातीं असायचा. संग्रह किंवा कुणगा हा तिला जन्मांत माहीत नाहीं. अल्पस्वल्प किडुकमाडुक होते तें हि गरजेनुसार देऊन किंवा

विकून संपवलें होतें. कांहीं हरवलें किंवा चोरीला हि गेलें. पांच रुपयां-ऐवजीं दहा रुपयांची नोट व पैशाऐवजीं अधेली देणें असले प्रकार हि ती. बायाकडून अनेकदां घडलेले आहेत.

उत्तरेस रत्नागिरी व दक्षिणेस आडिवरें या पलीकडे ती. बायानें जन्मांत प्रवास केलेला नाहीं. रत्नागिरीस उभ्या जन्मांत ३-४ दांच गेली होती. आडिवऱ्यास तरुणपणींच कधीं गेली असेल. ती. आकाच्या लग्नांत सोमेश्वरास गेली. गोळपेला तिचे चुलते गुरुजी होते तेव्हां जात असे. पावसेस वेणूमावशीकडे माझ्या जन्मापूर्वी जात असे. गरभार स्त्रियांनीं दुसऱ्या बाळंतिणीला शिवूं नये असें शास्त्र आहे म्हणे. पण माझ्या वेळीं बाया गरभार असतांनाच ती. भिकूअण्णा झाला त्या-प्रसंगीं वेणूमावशीच्या बाळंतपणाला बाया गेली होती. कुर्ध्यास माहेरीं सुद्धां वैधव्य आल्यानंतर २-३ दांच गेली असावी, व ती हि उभ्या-उभ्याच.

यात्रा, व्रतें, ब्राह्मणांस दानें, सोवळें इत्यादि रूढिगत धर्मावर तिचा विशेष विश्वास नव्हता. ब्राह्मणांना हि तिनें दानधर्म केला परंतु त्यांत हि विद्वान् परंतु श्रीमंत ब्राह्मण शोधण्याऐवजीं गरीब ब्राह्मणाला दान देण्याकडेच तिचा ओढा असे. तिच्या दानांचा मुख्य ओढा गरिबांकडे, अर्थात् कुणबी, भंडारी यांजकडेच असे. साधींसुधीं व्रतें हि तिनें केलीं परंतु तीं बहुधा जनलज्जेस्तव व कांहीं अंशीं देवानें आपल्या मुलांबाळांचें बरें करावें या हेतूनें. यात्रा करण्याची इच्छा मात्र तिनें कधींच केल्याचें माहितींत नाहीं.

देवदेवस्कीवर तिचा विशेष भर नसला तरी भित्र्या भेदरट स्वभावामुळें व मुलांबाळांच्या सुखरूपतेच्या चिंतेमुळें ती देवांचीं व भुतांखेतांचीं देणीं चुकवीत नसे. नवसांवर तर तिचा विशेषच विश्वास होता. एवढ्यातेवढ्या गोष्टींसाठीं ती देवांना व म्हसोबासारख्या राक्षसांना

हि नवस बोलत असे. त्या निमित्तानें तिची दानाची हौस हि भागत असे. ती. भाऊ विलायतेला गेला तेव्हां तो सुखरूप परत आला म्हणजे गांवच्या श्रीलक्ष्मीनारायणाला पांच रुपयांचे पेढे तिनें देऊं केले. त्यावेळच्या आमच्या गरिबीच्या मानानें व गांवाच्या छोटेपणाच्या मानानें हि हा नवस मोठा होता व गांवकऱ्यांना तो मोठा वाटला हि.

अरदेशींपरदेशीं असलेलीं आपलीं मुलेंबाळें सुखरूप रहावीं, त्यांना कोणाची हि वाचा किंवा शाप बाधूं नये यासाठीं तर ती फार जपे. अतिथिअभ्यागत, भिकारी इत्यादि कोणी हि दाराशीं आलेलें कांहीं न देतां परतवून लावण्याचें तिला मोठें भय वाटे.

तिचा स्वभाव भेदरट होता असें वर म्हटलेंच आहे. लोकापवादाच्या भीतीमध्यें तो विशेषच दिसून येई. कोणी आपल्यावर रागावलें तर तें तिच्या मनाला फारच लागून राही; किंवा तें आपल्याकडे फार दिवसांत आलें नाहीं किंवा बोललें नाहीं तर तें आपल्यावर रागावलें तर नसेल अशी टोंचणी तिला लागे व त्या रागाचें निरसन होईपर्यंत तिला चैन नसे.

बाया निरक्षर तर होतीच परंतु प्रवास हि घडलेला नाहीं, अंध व चौकसपणा हि कमी च; त्यामुळें तिला दुनियेची माहिती अगदींच नव्हती म्हटलें तरी चालेल. अशा स्थितीचे मानानें तिची सामाजिक सुधारणेला असलेली अनुकूलता आश्चर्यकारक होती. विधवांचें केशवपन तिला मान्य नव्हतें. घरांत शेणवी, मराठे इत्यादि पाहुणे आमच्या पंक्तीला बसले व घरच्या बायकांनीं त्यांचीं उष्टीं काढलीं तरी त्यांत तिला कांहीं वावगें वाटत नसे. महाराचांभारांची गुळयास किंवा कुध्र्यांस हि वस्तीच नसल्यानें व त्यांचेशीं कधीं संबंधच न आल्यानें त्यांना घरांत घेण्याचा मात्र तिला बाऊ वाटत होता. सोवळें, शिवाशिव

इत्यादींचें तिला महत्त्व वाटत नसे. श्री. आका शेटचे शेवटीं तिच्या शुश्रूषेला होत्या. त्या मांसमच्छर कधींच खात नाहींत एवढें तिला समजल्यानंतर ती त्यांच्याहातचा चहा किंवा जेवण हि घेण्यास तयार झाली. जमीनदार व सावकार यांजकडून कुणब्यांची चाललेली पिळणूक पाहून तिला हळहळ व चीड हि वाटे. ती म्हणायची : "कुणबी हे, हे खुळेच हो. गरज पडली म्हणजे दहा रुपयांचा हांडा ब्राह्मणाकडे दोन रुपयांना गहाण ठेवतील, त्यावर व्याज भरीत रहातील पण ऐन मुद्दल देऊन तो सोडवण्याचें त्यांना कधीं जुळत नाहीं आणि त्यांचीं भांडीं मातीमोलानें सावकाराला जातात." "कुणब्यांना अक्कल नाहीं. त्यांच्या माना वाटेल तशा, वाटेल त्यानें मुरगळाव्या." "मी म्हणतें ब्राह्मणच हरामखोर. मूळची वस्ती कुणब्यांची. ब्राह्मण हे बाहेरून आले. पण कुणब्यांना म्हणतात कसे ? 'तुम्ही कीं नाहीं, आमचीं कुळें हो.' मी म्हणत्यें तेच कुळें कां ? तुम्हीच त्यांचीं कुळें कां नाहीं झालेत ? बरें त्यांना कुळें ठरविलेंत तें ठरविलेंत, पण त्यांच्याशीं न्यायानें तरी वागाल कीं नाहीं ? त्यांच्या जमिनी बळकावून उलट त्यांच्यावर हेच शिरजोर. ब्राह्मणांसारखी लबाड जात नाहीं." वगैरे.

आम्हां मुलांना बायानें कधीं सदुपदेश केला किंवा समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या असें मला आठवत नाहीं. आम्हां भावंडांमधील परस्परांबद्दलची बेफिकीरी व बेपर्वाई पाहून तिला फार वाईट वाटे, तरी हि त्या बद्दल तिनें कोणाला जाब विचारला किंवा त्याची कान-उघाडणी केली असें झालेलें नाहीं; अशा गोष्टी मुकाटचानें व निरुपाया-च्या भावनेनें सोसणें एवढेंच तिला माहीत होतें.

## (३०) शेवटचें दुखणें

'पेटका' हा बायाला शेवटीं ७-८ वर्षें मधून मधून येत असे. उजव्या मांडीच्या आडसंधीशीं व आसपास हा पेटका येई. बिब्याचा

शेक, एनिमा, रेचक इत्यादि उपायांनीं तो बरा होई. परंतु डॉक्टरला दाखवून त्याचें निदान करवून घेणें आमच्याकडून कधीं घडलें नाहीं. पेटका आल्यापासून तो ओसरेपर्यंत बाया अत्यंत विव्हळ होत असे. सोप्यांत जाऊन तेथील मोरीशीं ती एनिमा घेत असे. ही एनिमा घेण्याची पद्धति अगदींच अडाणी असे. त्यामुळें खूप घाण होई व मागाहून धुणेंसारवण करून सफाई करावयाची असे. श्री. बापू सोहोन्यांनीं या पेटक्याचें निदान केलें कीं पोटांत वात धरल्यानें या तीव्र वेदना होतात. त्या विशिष्ट भागांतच कां येतात हें ते सांगू शकले नाहींत.

कमोडच्या पद्धतीच्या खोक्यावर निजून व खालीं तस्त ठेवून सोयीस्कर व स्वच्छ पद्धतीनें एनिमा घेतां यावा म्हणून मीं तिचेसाठीं कणकवलीहून तीन चपटे खोके (मधला खोका कमोड म्हणून उपयोगांत आणावयाचा) व मोठें तस्त नेलें पण त्याचा उपयोग तिला सोयीस्कर वाटेना व मला कधीं प्रत्यक्ष तिला त्याचा उपयोग दाखवून पटवून देणें जुळलें नाहीं.

ती. बायाला कृशतेमुळें थंडी फार लागे. पहाटेस आंथरुणांतून बाहेर पडतांच थंडीनें गारठल्यानें तिचे हात ताठरले व शेक केल्यानतरच त्यांची हालचाल होऊं शकली असें हि कित्येकदां होत असे. म्हणून मी तिचेसाठीं शुभ्र तलम घोंगडीचा एक पायघोळ कोट शिववून आणला. परंतु तिला असलें 'सोंग' आवडलें नाहीं. तिनें तो ती. गणपतिमामांना देऊन टाकला. ही गोष्ट '३७ सालची. '३९ सालीं बाहेर आंघोळीला जाणें हि तिला कठीण होऊं लागलें म्हणून मीं तिचेसाठीं स्नानाचें टब आणलें. एनिम्यासाठीं खोकें वर लिहिलेलें बहुधा '४० किंवा '४१ सालीं आणलें असावें. अशा तऱ्हेनें तिची अशक्तता वाढत होती.

१९४० च्या ऑगस्टमध्यें चि. श्रीपतचें तात्यांना पत्र गेलें त्यावरून त्यांनीं मला लिहिलें कीं "ती. बायाची प्रकृति फार नाजुक झाली असल्याचें समजतें, तूं भेटून यावेंस हें बरें." तेव्हां मी भीतभीतच लगेच गुळच्यास आलों. परंतु प्रकृति क्षीण असली तरी भिण्यासारखी नव्हती. '४१ च्या अखेरीस ती. वैनी बेळगांवास गेली होती तेव्हां ती. बाया आपला अंत जवळ आला अशा कल्पनेनें तिला जाऊं देण्यास खुषी नव्हती. त्यावेळीं मी बायाच्या शुश्रूषेसाठीं म्हणून घरीं येऊन राहिलों परंतु १५-२० दिवस राहिलों तेवढ्यांत हि मधून मधून निकडीच्या कामांसाठीं जावें लागे.

जानेवारी '४२ अखेर मी जैतापुरास असतां बाया अत्यवस्थ असल्याची श्रीपतची तार मिळाली म्हणून रातोरात धडपडत घरीं गेलों परंतु आराम पडूं लागला होता. पुन्हां मार्च अखेर सावंत-वाडीस असतां तार मिळाल्याबरोबर घरीं आलों. मध्यंतरीं १८ मार्च रोजीं उभ्या उभ्या गुळच्यास येऊन गेलों तेव्हां आपल्या शुश्रूषेसाठीं रहाण्याचा बाया आग्रह करीत होती परंतु कामांच्या निकडीमुळें मी त्याच पायीं गेलों त्याचें तिला फार वाईट वाटलेलें दिसलें.

मार्चच्या अखेरपासून तों एप्रिलच्या २० तारखेपर्यंत, मध्यंतरीं ११-१२ तारखेस रत्नागिरीस जावें लागलें तेवढें सोडून, मी तिच्यापाशीं रहालों होतों. हें शेवटचें च दुखणें हें त्यावेळीं स्पष्ट दिसत होतें. आंथरुणांत उठून बसूं शके पण चालवत नव्हतें, हातपाय वळत, रात्रीं झोप पहाटेपर्यंत लागत नसे, दिवसा व विशेषत: रात्रीं चैन पडतनासें होई व इकडे ने तिकडे ने, अशी जिकीर सुरू असे. अजून-पर्यंत मी कधीं घरीं आलों असतां तिच्या पायांना तेल लावतों म्हटलें किंवा तिचें पातळ धुवायला घेऊन गेलों तर असलीं कामें ती मला करूं देत नसे. "पुरुषमाणसाला बायकांचीं चिरगुटें धुणें शोभत नाहीं.

कुळवाडीण वुईल" असें म्हणायची. आतां तो अभिमान गेला होता. पाय व अंग एकसारखें चेपायला कोणी तरी पाहिजे असे. त्रासिकपणा, उतावळेपणा, विसराळूपणा इत्यादि फार वाढलीं होतीं. मनासारखें न झाल्यास राग येई. भूक मुळींच कंठवतनाशी झाली, पांच मिनिटांपूर्वी आपणच काय बोललें त्याचें स्मरण रहात नसे.

२० एप्रिल रोजीं संध्याकाळीं रत्नागिरीस आलों व कांहीं दिवस लांजें-कणकवलीकडे जावून परत गुळच्यास येणार होतों तों ता. २१ ला उजाडतांच मला अटक झाली—ता. ५ मार्चच्या शिरोड्याच्या भाषणाबद्दल. आतां बायाची पुन्हां भेट होत नाही असेंच मला वाटलें. घरच्या मंडळीकडून तिची शुश्रूषा यथासांग होईल असें दिसेना. ज्याला आवड आहे व आस्था आहे त्याचेकडूनच शुश्रूषा घडते. शिवाय बायाचा आजार रेंगाळत जाणार असें हि दिसत होतें.

म्हणून ८-९ मे रोजीं मी स्वतःची जामिनावर मोकळीक करून घेतली. श्री. आका शेटये यांस यापूर्वीं च पत्र लिहून माझ्या गैरहजिरींत ती. बायाच्या शुश्रूषेला रहाल कां ? असें विचारलें. त्यास त्यांनीं "माझी हि तशी इच्छा आहे" असें उत्तर दिलें. जामिनावर सुटतांच त्यांस लगेच येण्यास लिहिलें त्याप्रमाणें त्या ता. १३ ला रत्नागिरीस आल्या. माझी त्या दिवशीं कोर्टापुढें तारीख होती. दुसरे दिवशीं हि होती. मी बायाचा शेवटचा म्हणूनच निरोप घेऊन गुळच्याहून निघालों होतों. निरोप देतांना बाया रडली पण मी माझा गहिंवर दाबूं शकलों.

ता. १४ रोजीं श्री. आका शेटये गुळच्यास गेल्या, म्हणून मी माझा जामीन रद्द करून घेतला. मॅजिस्ट्रेटनें मला दोन वर्षांची शिक्षा दिली. पुढें अपिलांत ती ५॥ महिन्यांची झाली. तथापि मी बाहेर येईपर्यंत बाया हयात राहील अशी आशा वाटत नव्हती. मध्यंतरीं

ऑगस्ट ९,१९४२ पासून काँग्रेसची चळवळ हि जोरानें सुरू झाली. त्यामुळें मुदतीअखेर हि मला सोडतील अशी आशा नव्हती व तसेंच झालें.

परंतु १६-११-४२ रोजीं मी सुटायचा होतों तेव्हां इतर मित्रांबरोबर चि. पांडू हि मला भेटायला आला. त्यानें मला बायाचा निरोप सांगितला कीं "त्या सरकारचे पाय धर आणि त्याला सांग कीं माझी आई हयाद असेपर्यंत तिचे करण्यासाठीं मला सोडा." अगोदर मीं ठरविलें होतें कीं मला सोडलें तर बायाच्या शुश्रूषेला च रहायचें, कायदेभंग करायचा नाहीं, (सप्टेंबरमध्यें आका शेटचे चळवळींत भाग घेण्यासाठीं शुश्रूषेचें काम सोडून गेल्याचें मला कळलें होतें ) परंतु सुटकेच्या पंधरा दिवस पूर्वीं जेव्हां मला स्थानबद्ध करणार असें सांगण्यांत आलें तेव्हां मीं मनाशीं म्हटलें कीं "ठीक झालें, सुटलों तर काय करावें या प्रश्नाचें निवारण परभारें सरकारनेंच केलें. सुटल्यास बायाची शुश्रूषा करणें कर्तव्य वाटतें, परंतु माझ्या सारख्यानें चळवळीपासून अलिप्त राहिल्यानें चळवळीला अपाय पोचणार. परंतु हा पेच सरकानेंच सोडविला."

परंतु चि. पांडूनें जेव्हां बायाचा प्रत्यक्ष निरोप सांगितला तेव्हां मात्र मी विचारांत पडलों. १९३० साल अखेर मालवणच्या सत्याग्रह-शिबिराच्या पत्त्यावर मला चि. शंकरनें गुळयाहून पत्र लिहिलें होतें कीं "बाया फार आजारी आहे, लगेच निघून ये" परंतु मला अटक होऊन मी रत्नागिरीच्या तुरुंगांत होतों तेथें मला तें पत्र पोंचलें. खटल्यांतून सुटून मी गुळयास गेलों तोंपर्यंत चि. श्रीपत हि साबरमतीहून येऊन पोचला होता. मीं बायाला विचारलें कीं "तुझ्या शुश्रूषेसाठीं येथें राहूं का ?" परतु थोडा गुण पडला होता, चि. श्रीपत हि आलेला होता म्हणून म्हणा किंवा '३० सालच्या सत्याग्रहामुळें मला

एकाएकीं आलेलें महत्त्व व मिळालेली प्रसिद्धि तिला आकर्षक वाटली असेल म्हणून म्हणा, किंवा राष्ट्रकार्यांतून मला स्वतःच्या सेवेसाठीं खेंचून घेणें तिला प्रशस्त वाटलें नाहीं म्हणून म्हणा, तिनें म्हटलें "नको, माझें कसें हि होईल. तुला बरें वाटलें आहे तेंच तूं कर"

परंतु आतां बारा वर्षांनंतर तिच्यामध्यें पूर्वीचें त्राण उरलें नव्हतें त्यामुळें अंतकाळच्या शुश्रूषेला मी जवळ असावें असें तिला वाटलें. यानंतर हि कित्येक महिन्यांनीं ऑगस्ट १९४३ च्या अखेरीस बबन डिसोझा नांवाचा मालवण कडील ख्रिश्चन युवक रत्नागिरीस टायफॉयडनें अत्यवस्थ झाला व शुश्रूषेसाठीं कोणीतरी जिव्हाळ्याचें मनुष्य पाहिजे आहे असें श्री. महाडवाले यांचें मला पत्र आलें. ती हकीगत मीं तिला कांहींशी कचरत कचरतच सांगितली, तेव्हां मात्र ती लगेच म्हणाली "तुला त्या मुलाच्या शुश्रूषेसाठीं जावेंसें का वाटतें? जा, लगेच जा, माझी अडचण मानूं नको. अरे, मी तर माझ्या घरांत आहें. माझें कोणी तरी करतील. तूं त्या अनाथ मुलाचें केलेंस तरच विशेष. घरच्या माणसांचें कोणी हि करील." त्याप्रमाणें मी दुसऱ्या दिवशीं सकाळीं रत्नागिरीस गेलों परंतु तोंपर्यंत त्या मुलाचा बाप व राजापूरहून सौ. शांता तेंडुलकर हि शुश्रूषेला आल्यानें मी रात्रीपर्यंत परत हि आलों.

असो. जेव्हां प्रत्यक्ष बायाकडून मला बोलावणेंच आलें तेव्हां मात्र मी विचारांत पडलों हें वर लिहिलें आहे. कांहीं दिवस स्वतःचे मनाशीं विचार केल्यानंतर मी श्री. केशवराव गोखले, पुंडलीकजी, मोरोपंत जोशी, पाध्ये वकील, नानासाहेब पंडित इत्यादि कैदीबंधूंचा व पू. गंगाधरराव देशपांडे यांचा विचार घेतला. त्यांची अनुमति मिळाली. नंतर सरकारकडे परोलसाठीं अर्ज केला तो लवकरच मंजूर होऊन आला, मात्र केवळ १४ दिवसांचीच मुदत देण्यांत आली. मित्रांनीं

"बाहेरून मुदत वाढवून घ्या, मिळूं शकेल" असा सल्ला दिल्यावरून मी दुसरें दिवशीं परोल स्वीकारून आलों.

कलेक्टरनीं पुन्हां दोनदां दोन दोन महिन्यांनीं मुदत वाढवून दिली व नंतर "पुन्हां हुकूम करीपर्यंत" मुदत आपण होऊनच दिली. तरी हि संशयावरून १४-८-४३ रोजीं मला एकाएकीं नव्या कलेक्टरचा हुकूम आला कीं "परोल रद्द, तुरुंगांत लगेच हजर व्हा." दुसरे दिवशीं कलेक्टरला भेटून खुलासा करतां संशय-निवृत्ति झाली व परोलची मुदत पूर्ववत् वाढवून मिळाली.

जाण्याचा हुकूम आला तेव्हां ती. बायाला फारच वाईट वाटलें. त्या रात्रीं तिला किंवा मला मुळींच झोप लागली नाहीं. बाया विव्हळ च होती व मला हि खेद वाटत होता. सरकारला संशयास जागा देणें म्हणजे बायाचा हि द्रोह करणें आहे ही गोष्ट मनाला विशेष खात होती.

दुसरे दिवशीं सकाळीं मी निघालों तेव्हांच गड्याला नाखऱ्यास लक्ष्मी खावडकरणीला बोलावून आणण्यासाठीं पाठविला. त्याप्रमाणें ती आली हि. बायाची तिच्यावर विशेष माया असे व ती हि बायाचें आस्थेनें करीत असे परंतु सासरीं न पटल्यानें अलीकडे ती माहेरीं जाऊन राहिली होती. येथून पुढें ती मधून मधून बायाच्या शुश्रूषेसाठीं आमचेकडे आठ आठ पंधरा पंधरा दिवस येऊन रहात असे.

मी रत्नागिरीस निघून गेल्यानंतर बाया चि. शंकरपाशीं म्हणाली "सीताराम गेला, आतां मी उघडी पडल्यें." परंतु मी दुसऱ्याच दिवशीं संध्याकाळीं परत आलों. कलेक्टरनीं दुसरे दिवशीं फेरहुकूम देण्याचें आश्वासन दिल्यावरून उद्यां येतों असा निरोप आदल्या दिवशीं मीं घरीं पाठविला होता, परंतु बायाला तें खरेंच वाटेना. तरीं हि ती

संध्याकाळपर्यंत वारंवार माझी चौकशी करी व आलों नाहीं असें समजलें म्हणजे "तो येत नाहीं, तुम्ही खोटें सांगता" म्हणे.

याच्या उलट एक गोष्ट हि येथेंच नमूद करणें वाजवी होईल. या शेवटच्या दुखण्यांत बाया बरीच त्रासिक, विसराळू व हट्टी झाली होती. विक्षिप्तपणा हि करी. त्यामुळें मी कधींकधीं तिला रागावत व दबकावीत असें. त्याविषयीं चि० शंकराजवळ एकदां ती म्हणाली "सीतारामाचीं मला खेटरें खावीं लागतात"--चुरचुरीत बोलण्यांत बायाची सरी कोणाला येण्यासारखी नव्हती !

स्वत:विषयीं लिहितांना शेवटच्या दुखण्याचें वर्णन लिहिण्याचें राहिलें तिकडे आतां वळतों.

दुखणें मार्च १९४२ च्या अखेरपासून जानेवारी '४४ च्या सुरवातीपर्यंत म्हणजे पुरे २१ महिने चाललें. या मुदतींत ती उभी राहिलेली नाहीं. अंथरुणांत कांहीं महिनेपर्यंत बसूं शकत असे.

मे पासून सप्टेंबरपर्यंत श्री. आका शेटचे शुश्रूषेला होत्या. रात्रीचे वेळीं ठकी निजायला येत असे. आका गेल्यानतर पावसेच्या देशमुखांपैकीं एक "मामी" म्हणून विधवा बाई शुश्रूषेसाठीं ठेविल्या होत्या. त्या २ महिने राहून गेल्या. मी १०-१२-४२ रोजीं परोलवर आलों त्याच दिवशीं ठकीची मुलगी भाजली, त्यामुळें ती हि वस्तीला येऊं शकली नाहीं. त्यामुळें मी आलों त्याच दिवसापासून रात्रीचें जागणें माझ्याच वाटचाला आलें. यानंतर जानेवारी अखेर दुखणें फार बळावलें. तोंपर्यंत रोज उजाडतांच बायाला पिपांत बसवून स्नान घालीत असूं. परंतु हिवाळा तिला नेहमींच जड जाई, त्याप्रमाणें जानेवारी अखेर उठविणें हि अशक्य झालें. त्यापूर्वीं हि उठवितांना व उचलतांना तिला फार वेदना होतच असत परंतु आतां त्या विशेषच तीव्र झाल्या.

थंडीसाठीं ढोंपरें छातीशीं घेऊन निजण्याची तिला संवय झाली होती. होतां होतां ढोपरें उघडतनाशीं झालीं व कायमचींच छातीशीं राहूं लागलीं. शरीराचें वजन ३५ पौंडांहून अधिक नसावें. बाजेखालीं शेगडींत निखारे घालून ऊब मिळविण्याची तिला जुनी संवय. जाड पांघरूण तिला खपेना, व शेकासाठीं आंथरूण हि पातळच पाहिजे असे. शिवाय जाड आंथरूण तिच्या मनाला हि पटेना. आम्ही कधीं बऱ्याच घोंगड्या चादरी घालून आंथरूण जाड केलें व तें हातांनीं रापतांना तिच्या लक्ष्यांत आलें तर ती तीं आंथरुणें कमी करण्याचा हट्टच धरी, व कमी करीपर्यंत अकांडतांडव करी. तिच्या संवयीच्या गोष्टी किती हि गैरसोयीच्या असल्या तरी त्यांत यत्किंचित् फरक केलेला तिला खपेना. तरी हि कांहीं सुधारणा आम्ही तिच्यावर लादल्याच.

जानेवारी '४३ अखेर प्रकृति विशेष बिघडली तेव्हां चि. वासू तसेंच ती. तात्या, वैनी, शरयू, बाळ अमदाबादहून मुद्दाम येऊन भेटून गेलीं तें फार बरें झालें. "सत्यभामा माझ्यावर रागावली आहे. परत घराचें तोंड पहायचें नाहीं असें तिनें ठरविलें आहे" इत्यादि गैरसमज बायाचे झाले होते व त्यामुळें तिच्या मनाला फार कष्ट वाटत. परंतु ही सर्व मंडळी आली, वैनीनें बायाजवळ बसून गोष्टी केल्या, तिच्या आरोग्यासाठीं बाया बोडणाचा नवस बोलली होती तें बोडण वैनी असतांनाच करण्यांत आलें, वैनीनें जातांना बायाला एक पातळ व धोतर ठेविलें (हीं ती अखेरपर्यंत आंथरीत पांघरीत असे. त्यापैकीं धोतर मात्र कांहीं दिवसांनीं तिनें लख्यासाठीं जानकीला देऊन टाकलें.) ती. तात्यांनीं जातांना "तुला धर्म करायला पैसे पाहिजेत का" असें विचारलें तेव्हां बाया "कांहीं नको" च म्हणाली परंतु पुढें कुणब्यांना रोज रोज धान्य देण्यास सांगे तेव्हां मीच लिहून तात्यांकडून धर्मासाठीं ६० रु. मागविले. त्यांतून पुढील पावसाळ्यांत दोन पोतीं धान्य

कुणब्यांना वाटलें इत्यादि गोष्टींमुळें बायाला अखेरच्या दिवसांत मानसिक समाधान वाटत असे.

ती. तात्या येऊन गेल्यानंतर ती. बायाला परत बरें वाटलें. एप्रिलांत चि. गुणी (व तत्पूर्वीच चि. बची) आली त्यावेळीं बायाला फार जोराचा पेटका आला होता परंतु पुढील उन्हाळयाचे व पावसाळयाच्या सुरवातीचे दिवस प्रमाणांत बरे गेले. पावसाळयाअखेर पुन्हां हालचाल कठिण होऊं लागली व वेदना अधिक तीव्र झाल्या. पूर्वीच्या स्वरूपाचा पेटका पुन्हां आला नाहीं परंतु दंडांत, मांडीत, आडसंधीत पोटऱ्यांत कळा येणें हें वारंवार होऊं लागलें. अन्न हि कमी जाऊं लागलें. अगदीं शेवटच्या आठवड्यांत आवाज बोबडा येऊं लागला. बोले तें समजण्यास फार अडचण पडूं लागली. तरी हि इतक्या वीस महिन्यांच्या अनुभवानें आम्हांला वाटे कीं तिच्या आयुष्याची दोरी फार चिवट आहे. त्यामुळें अखेरीला मृत्यु आला तो अगदीं अनपेक्षितच आला.

बाया मृत्यूची फार आतुरतेनें मार्गप्रतीक्षा करीत असे. "या यातना किती दिवस रे भोगूं ? मृत्यु मला अगदींच विसरला कीं काय ?" लोकी कशा चटचट मरतात ? मलाच मरण कां येईना ? हा जीव आतां कसा संभाळूं ? किती दिवस संभाळूं ?" "मला मरण यायचें नाहीं. आणखी २५ वर्षें सुद्धां मरण येईलसें वाटत नाहीं" असें ती वारंवार म्हणे. शेवटचे कांहीं महिन्यांत "जा रे जीवा, जा रे जीवा" व "जीव चालला, जीव चालला" हे तिचे जपच होऊन बसले होते. मी थट्टेनें म्हणे "तूं 'जीव चालला" म्हणूं लागलीस म्हणजे तुझी प्रकृति नित्यवत् आहे असें आम्ही समजतो " आणखी हि मी तिला सांगें "मृत्यूसाठीं उतावळें होण्याचें कारण नाहीं. मृत्यू कोणाला चुकलेला नाहीं. तूं सुद्धां अमरपट्टा घेऊन आलेली नाहीं. योग्यवेळीं मरण अचूक

१२६१२

येईल. येईल तेव्हां कळणार सुद्धां नाहीं." परंतु असल्या बोलण्यांनीं तिचें समाधान कसें व्हावें ?

जानकीकाकूची सून सीतावैनी तारुण्यांतच एकाएकीं वारली (जानेवारी '४३ त) तेव्हां बाया म्हणे "मला नेऊन सीता मेली त्या जागेवर ठेवा म्हणजे तेथें तरी मृत्यु येईल." दुखण्यामध्यें बायामध्यें त्रासिकपणा येणें साहाजिकच होतें, तरी हि तो त्रासिकपणा तात्पुरता राही, मागाहून ती त्याची भरपाई करीत असे. मला सुद्धां ती कधीं कधीं 'चांभार,' 'काळतोंडा' असलीं शेलकीं संबोधनें लावीत असे, परंतु मी त्याविषयीं कधीं तक्रार केली कीं म्हणायची "अरे तें रागाचें बोलणें, तें कांहीं खरें नव्हे," किंवा मी कांहीं बोलल्यें तरी तें तुम्हांला बाधायचें नाहीं. भाटीचे दांत तिच्या पिलांना लागत नाहींत"—मी अभद्र बोललें तरी तें तुम्हांला बाधायचें नाहीं असें म्हणण्याचा तिचा आशय. इतर कोणाला कांहीं बोलली तरी तें मागून तिच्या मनाला खाऊं लागे, व त्याला बोलावून "मी तुझे पाय धरत्यें" म्हणून क्षमा मागे.

तिला भूक कंठेना. कण्हेरी, चहा इत्यादीला ५-४ मिनिटें उशीर झाला तरी ती कळवळे व त्रासे, व जानकीकाकूकडून किंवा श्रीपतकाकांकडून माझ्यासाठीं कांहीं खायला मागून घेऊन या म्हणे.

विसराळूपणा फारच झाला होता. इतर सामाजिक गोष्टी नीट लक्ष्यांत रहात, परंतु स्वतःच्या देहाचे व्यापार मात्र बिलकुलच लक्ष्यांत रहात ना. आपण जेवल्यें कीं नाहीं, आंघोळ केली कीं नाहीं, शौचाला झालें कीं नाहीं, कांहीं लक्ष्यांत रहायचें नाहीं.

रात्रीं मला म्हणायची "अरे, तुला अजूनपर्यंत मी झोपूं दिलें नाहीं ना ? आतां नाहीं हो मी हांक मारायची. जा, तूं अगदीं बाहेर जाऊन झोप जा. अगदीं ८ वाजेपर्यंत झोप. मी हाक मारणार नाहीं" यानंतर दोन मिनिटांनींच कांहीं तरी कारणानें मला उठावें लागेच.

कधीं कधीं म्हणे "मी आई नव्हे, मी वैरीण आहें. माझ्या पोरांचें रक्त खाण्यासाठीं मी ही इतकी जगत्यें आहें."

एका जागेवर रहाण्याचा तिला कंटाळा येई व ती एकसारखी मला कोठें तरी घेऊन जा म्हणून हट्ट धरी. कधीं सोप्यांत, कधीं पुढल्या रेजांशीं तर कधीं बाळूकाकांच्या घरांत घेऊन जात असूं. दोघांनीं आंथरुण धरून नेतांना तिचे अंग दुखे व छातींत कळा मारत. कधीं विचारी "मी कुठें आहे ?" "बाळूकाकांच्या घरांत" असें आम्ही म्हटलें म्हणजे म्हणे "मला इथें कां आणलीत ? माझें घर ओस पडलें होतें कां ?" परत नेल्यावर कांहीं वेळानें पुन्हां बाळूकाकांच्या घरीं नेण्याचा आग्रह सुरू व्हायचा ! एक-दोनदां नारायणाच्या देवळांत नेण्याचा हट्ट धरला तेव्हां डोळींत निजवून आगरांतूनच हिंडवून परत मांडवांत आणून ठेविली. एकदां कुर्ध्यास, एकदां श्रीपतकाकांकडे, दोनदां जानकीकाकूकडे हि नेली होती.

अहमदाबादेस ती. तात्यांकडे, पुण्यास चि. वासूनानाकडे रत्नागिरीस चि. पांडूकडे इत्यादि ठिकाणीं कायमचें रहाण्यास जाण्याची सुद्धां कधीं कधीं तयारी करी ! इहलोकाची रजा घेण्याच्या आतुरतेचेच हे प्रकार होते.

रात्रीची वेळ विशेपच अस्वस्थतेंत जाई. सारीं माणसें झोपलीं कीं हिच्या चळवळीला सुरवात झाली. मग मला "वरच्या घरीं, खालच्या घरीं घेऊन जा, माझ्याबरोबर कोणी नको, मला नेऊन ठेवा आणि तुम्ही स्वस्थ झोपा," "जानकीकाकूला बोलवा" "आंघोळ घाला," "चहा कर" यासारखे हुकूम सुटत. रात्रीं एकदां, कधीं दोनदां, चहा घोट घोट करून द्यावा लागे. कधी एनिमा देणें, कधीं स्नान घालणें इ. करून रात्र घालवावी लागत असे.

रात्रीं बचीला, वैनीला, श्रीपतला वगैरे मोठ्यामोठ्यांनीं हाका मारी. तें तें माणूस हजर होईपर्यंत तिचा आकांत चाले. रात्रीच्या वेळीं ओरडण्याची तिला उकळीच येई. "ओरडावेंसें वाटतें आहे. कोणाच्या नांवानें ओरडूं बरें ?" असें मलाच विचारायची !

अन्नाची रुचि लागेना. कोणता हि पदार्थ मनाला येत नसे "त्याला रखा सुद्धां नाहीं" "मातीची सुद्धां चव नाहीं" हें नेहमींचें असे. गोड पदार्थ मुळींच चालायचा नाहीं. चहा किती हि कडक केला तरी तिला चहाचा दर्प जाणवतच नसे. "आंत काय घातलेंत ? निगडीचा पाला कीं भोपळीचा ?" असें विचारी. (वर्मी उत्तर, व्याजोक्ति, आडून-पाडून बोलणें इत्यादीमध्यें तिचा हात धरणारा कोणीच नव्हता !) तोंडी लावण्याबाबत तिचें कधींच समाधान होत नसे. घरच्या बायकांना चांगली भाजी करतां येत नाहीं म्हणून शेजाऱ्यांकडून आणायला सांगे. ती चाखून म्हणे "लोकें हें असलेंच खातात का ? आमच्या घरच्या भाजीची सर कोणाच्याच भाजीला यायची नाहीं." तरी सुद्धां पुन्हां दुसऱ्या दिवशीं यथापूर्व सर्व गोष्टी घडायच्याच. असो.

शेवटले दोन महिने खाटेवर तिला बसली घरणें हि मुष्किलीचें झालें होतें. पुष्कळदां पडल्या स्थितींतच अन्न भरवावें लागे तसेंच एनिमा व मलपात्र हि द्यावीं लागत. हें सर्व आंथरुणांतल्या आंथरुणांत व एक थेंब हि न सांडतां करण्यासाठीं योग्य भांडीं मीं बनवून घेतलीं होतीं.

ती नेहमीं उजव्या कुशीवरच झोपलेली असे. त्यामुळें उजवी कमर आंथरुणावर घासून व उबून त्याला एकसारखी जळजळ उठे त्याचा हि तिला मनस्वी त्रास होई म्हणून तिला गादीवर निजवीत असें आणि कमरेचीं हाडें टेकत त्याजागीं गादीला भोकें ठेविलीं होतीं. एक-दोनदां बारीक क्षतें हि झालीं परंतु तीं व्हॅसेलिन, कोकम तेल, तूप, शंखजिरें इत्यादि लावून बरीं हि झालीं. रोजचें स्नान तर कधीं चुकत नसेच

पण दिवशीं दोन किंवा तीन स्नानें हि घडत. कधीं कधीं रात्रीं २ वाजतां ती स्नानाची मागणी करी. चुलीवर गरम पाणी बहुधा तयारच असे, नाहींपेक्षां नारळीच्या पात्या पेटवून चटकन तापवावें लागे; आणि खाटेलगत टब ठेवून त्यांत तिला बसती धरून स्नान घालीत असूं आणि परत खाटेवर ठेवीत असूं.

## अंत

ता० २-१-४४ मिति पौष शुद्ध ७ शके १८६५ चे आदले रात्रीं जानकीकाकू भेटण्यास आली होती इत्यादि हकीकत पूर्वीं एकदां आलीच आहे. त्या रात्रीं १ वाजेपर्यंत मी तिच्यापाशीं जागतच होतों. मध्यरात्रींच्या सुमाराला तिच्या तोंडांतून लाळ गळूं लागली व क्षण-मात्र मी चरकलों. अंत झाला कीं काय असें वाटलें परंतु थोड्या वेळानें ती परत बोलूं लागली. १ वाजण्याचे सुमारास तिला गुंगी आल्यासारखी वाटली, म्हणून मी हि आडवा झालों, तों मला हि झोप लागली तो मी ३ वाजतां जागा झालों. तीन वाजल्यापासून पुढें मी तिचेपाशीं बसून होतों. पहाटेस चि. बची हि उठून आली.

सकाळीं थंडी होती म्हणून वाया म्हणाली इतक्यांत आंघोळ नको. एनिमा दिला. नंतर तिनें थोडा चहा हि घेतला. एका जागीं चैन पडत नसे म्हणून सोप्यांत घेऊन चल म्हणाली त्याप्रमाणें नेली. सकाळीं कणेरी घेत असे ती घेतेस का विचारलें पण थोड्या वेळानंतर घेईन म्हणाली.

सोप्यांत भरपूर प्रकाश असे व माशांचा हि त्रास होई त्यासाठीं मच्छरदाणी लावली होती व उन्हाची झळ जाणवूं नये म्हणून बाहेरचे बाजूला काळी घोंगडी टांगली. कांहीं वेळ मी तिचे मांड्या-पोटऱ्यांवरून हळूहळू तेलाचा हात फिरवीत होतों. माझें सकाळचें दूध हि मच्छर-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



अनुक्रम वि: .. ...
क्रमांक नों: दि: . .

दाणीच्या आंत बसूनच मीं घेतलें. नंतर घोंगडीचे बाहेर वाचीत बसलों. १-२ पानें वाचून पुन्हां "कणेरी घेणार का ?" विचारण्यासाठीं आंत डोकावून पहातों तर तोंडांतून काळीमेळी लाळ गळते आहे. हांक मारली पण उत्तर नाहीं. नाडी पहातों तर बंद ! चि. शंकर करमरकर व ती. वैनी यांना हांक मारली. वैनीनें जिभेवर हेमगर्भ मात्रा चोळली परंतु कसलीच हालचाल किंवा शब्द नाहीं. १० मिनिटांत श्वास हि बंद झाला. त्यावेळीं ९।।। (स्टँ.टा.) वाजले होते.

चि. श्रीपत व पद्मा १५ दिवसांपूर्वीच पुण्यास चि. शरयूच्या लग्नाला गेलेलीं इतक्यांतच परत यावयाचीं होतीं परंतु त्यांना वेळ लागला. घरीं ती. वैनी, दोघे हि शंकर ( करमरकर व पटवर्धन ) व मी होतों.

मृत्यू होतांच मला तत्काळ तरी समाधानच वाटलें कीं "सुटली. मी हि हातीं घेतलेलें काम पूर्ण झालें." लोक गोळा होऊन प्रेतयात्रा निघायला वेळ होता. मध्यंतरीच्या काळांत तिच्या जवळ बसून मी आप्तेष्टांना तिच्या मृत्यूची खबर देणारीं पत्रें लिहिलीं, त्यांत कलेक्टरला हि लिहिलें कीं "जिच्या शुश्रूषेसाठीं मी परोलवर सुटका करून घेतली ती माझी भली आई वारली. अत:पर मला सशर्त सुटकेची जरूरी नाहीं, इच्छा हि नाहीं. म्हणून मला एक तर बिनशर्त मुक्त करा, नाहींपेक्षां परत तुरुंगांत दाखल करा." त्यांचा हि पांचव्या सहाव्या दिवशीं जबाब आला कीं तुरुंगांत लगेच दाखल व्हा. मी दुसऱ्या दिवशीं निघालों हि. श्रीपति इतक्यांत येणारच होता तो दिवसवार करील म्हटलें. स्मशानांत तिला अग्नि देतांना मला गहिंवरून आलें पण मी मन आवरलें.

बलवंत साप्ताहिकाला तिच्या मृत्यूचें बातमीपत्र हि लिहून पाठविलें होतें. त्यांनीं त्याला "भाग्यवान् माता निवर्तली" असा ठळक मथळा देऊन तें छापलें.

## गोदूआते

गोदूआतेची पवित्र स्मृति माझ्या हृदयांतून कधींच बुजणें शक्य नाहीं. विरह-दुःखानें मी यापूर्वीं दोनदांच रडलों आहें; अधिक वेळां रडणार नाहीं अशी आशा आहे. त्यापैकीं प्रथम १९०७ सालच्या जुलैमध्यें गोदूआते वारल्याचें समजलें तेव्हां. दुसऱ्यानें १९०८ सालीं त्याच सुमाराला लोकमान्य टिळकांना सहा वर्षें शिक्षा झाल्याची बातमी ऐकली तेव्हां.

लहानपणीं बाया लालनपालन करी, पण तिनें आम्हांला कधीं उपदेशाचा एक शब्द बोललेला मला आठवत नाहीं. तिला एकामागें एक मुलें हि पुष्कळ असल्यामुळें आणि गृहप्रपंचाचीं कामें हि भरपूर असल्यामुळें अंगावरच्या मुलाखेरीज इतर मुलांकडे लक्ष्य देण्यास तिला तरी फुरसत कोठून ? त्यामुळें आम्हां पोरांचा ताबा आजीकडे आणि गोदूआतेकडे असे. बाबा वळण लावीत, पण ते चरफडत व रागें भरत. त्यामुळें आम्ही सरळ बनण्याऐवजीं अधिक तिढेच बनत असूं. गोदूआते मात्र आमची पालक व शिक्षक दोन्ही होती. एवढेंच नव्हे तर आमची सवंगडी हि होती.

कारण आम्ही अगदीं लहान म्हणजे ६-७ वर्षांचे असतांना हि ती आम्हांला करवंदे, काजू, चिकणें, तोरणें वगैरे गोळा करण्यासाठीं सड्यावर किंवा रानांत घेऊन जात असे. आमच्या लहानपणच्या सगळ्या सफरी तिच्याच कृपेनें व सोबतीनें झाल्या; कारण नाहीं-पेक्षां आम्हांला रानांत जाऊं देतो कोण ? तेव्हांपासून माझ्या मनांत रानांत हिंडण्याची जी आवड उत्पन्न झाली ती अद्याप कायम आहे. मी अगदीं लहान वयांत झाडांवर चढायला शिकलों तो हि तिच्या-बरोबर काजूंना जाऊनच. आम्हांला पर्वणीच्या दिवशीं समुद्र-स्नानाला

घेऊन जाणारी हि तीच. मोठीं माणसें निघालीं कीं आम्हांला हि समुद्र-स्नानाला जाण्याची उत्कंठा वाटे, ती थेट समुद्र व त्याच्या लांटा दिसूं लागेपर्यंत टिकून राही. मग मात्र बहुधा पाऊलभर पाण्यांतच तांब्यांनीं आम्हांला स्नान घालण्याची तिच्यावर पाळी येत असे !

मला लहान वयांत कौरव-पांडवांच्या व राम-लक्ष्मणांच्या गोष्टी तिनेंच सांगितल्या. ८-९ वर्षांच्याच वयाला शनिमाहात्म्य, शिवलीलामृत, हरिविजय, पांडवप्रताप वगैरे पोथ्या वाचून घेतल्या. फारशा समजत नसत पण भक्तिभावानें वाचीत असूं. १०।१२ वर्षांचे असतांना आम्ही त्या पोथ्यांचे सप्ताह हि करीत असूं. रामनामाचें माहात्म्य हि गोदूआते आम्हांला समजावून देत असे. ती स्वतः खूप जप करीत असे व एक लाख जप झाला कीं देवपूजा करण्याच्या जागेजवळील भिंतीवर गंधाचा एक ठिपका लावीत असे. अशा तऱ्हेनें भिंतीचा बराच भाग तिनें ठिपक्यांनीं भरून काढला होता. अमुक कोटि जप झाला म्हणजे धनप्राप्ति होते अशी हि, दारिद्रयानें गांजलेल्या त्या बिचारीला, आशा वाटत होती.

राम हा माझा लहानपणापासूनचा आवडता देव. १०-१२ वर्षांच्या वयांत रत्नागिरीस इंग्रजी पहिल्यादुसऱ्या यत्तेंत असतांना मी सुटीच्या दिवशीं रामाच्या देवळांत जाऊन नामजप करीत प्रदक्षिणा घालीत असें. श्रावण्या सोमवारीं सायंकाळीं शाळेला सुटी असे त्यावेळीं आम्हीं विश्वेश्वराच्या दर्शनाला जात असूं. वाटेनें मी रामनामाचा जप करीत असें. गोदूआतेचें शेवटचें दुखणें चालू असतां तिला आराम पडावा म्हणून मी अनेक वेळीं रात्रौ दिवे मालवल्यानंतर आंथरुणावर बसून जप केल्याचें मला आठवतें. मात्र हा जप कांहीं शेकड्यांच्या पलीकडे जात नसे. कारण रात्रीं जागण्याच्या बाबतींत मी अगदींच

कमकुवत ! मांडी ठोकून बसलों तरी कांहीं मिनिटांतच झोपेला शरण जावें लागे.

रामविजय, हरिविजय वाचून आम्हांला हि युद्धें करण्याची स्फूर्ति होई. बांबूचें धनुष्य-बाण करून मी व ती. तात्या एकमेकांबरोबर युद्धें करीत असूं आणि अग्नि-अस्त्रावर पर्जन्यास्त्र, त्यावर वायु-अस्त्र, पर्वतास्त्र, वज्रास्त्र इत्यादि सोडीत असूं. शेवटचें ब्रह्मास्त्र ज्याच्या वाटचाला जाईल त्याचा विजय होत असे ! अर्थात् या युद्धांत बाण एकमेकांना लागूं नयेत याची खबरदारी घेतली जात असे.

एकदां बाया पायरहाटावर बसून पाणी ओढीत होती. मी आठएक वर्षांचा असेन. मी जवळच खेळत होतों. गोदूआते मला हळूच म्हणते "अरे, ती नऊ महिन्यांची गरभार पाणी ओढत्ये आहे, तिला तूं अंमळ हात लावलास तर शिणशील का ?" मी जाऊन तिच्या मदतीला बसलों. पण आमच्या एकमार्गी स्वभावानुसार त्या वयांत बाया प्रत्यक्ष बाळंत होईपर्यंत ती गरभार असल्याची आम्हांला गंधवार्ता हि नसे.

गोदूआतेचा भुतांखेतांवर फार विश्वास. भुतांखेतांच्या गोष्टी ती आम्हांला पुष्कळ सांगत असे. घरांत अधूनमधून पडशाखोकल्यानें कोणी तरी आजारी पडायचेंच. तसें झालें म्हणजे आते आदितनाथा*ला जावून "धीर" घेऊन येत असे. आमची सावत्र आजी, कीं पणजी, सवाशीण वारली, ती घराच्या वरच्या बाजूच्या आंब्यावर "बसलेली" होती. तिकडे आते आम्हांला भर दोनप्रहरी, तिनीसांजा, किंवा एकटे दुकटे जाऊं देत नसे.

धाडसाचे धडे सुद्धां आम्हांला गोदूआतेच देत असे. त्याचीं कांहीं उदाहरणें पूर्वीं दिलींच आहेत. आणखी एक मोठें धाडस.

* आदित्यनाथ हा आमचा ग्रामदेव. "एका आठवड्यांत गुण पडेल" असें जें गुरवाकडून आश्वासन मिळे त्याला "धीर" म्हणत.

आगरगुळें गांव अगदींच लहान. लोक सगळे गंभीर आणि एकी नाहीं. त्यामुळें शिमग्यासारखे उत्सव दीर्घकाळपासून बंद होते. शिमगा साजरा करण्याच्या पद्धतीची आम्हांला कल्पना हि नव्हती, ती गोदूआतेनेंच आम्हांला समजावून दिली. शिमग्यांत फाका घालायच्या असतात; फणस, नारळ इत्यादींची चोरी करायची असते वगैरे आम्ही तिच्यापासूनच शिकलों. "सूत रे सूत आणि गंगाइ गोठणकरणीच्या मानेवर बसलें भूत रे भूत" असें म्हणून पांचजन्य करायला आम्ही सुरवात केली. बीभत्स फाकांची तिनें आम्हांला संथा दिली नाहीं. त्या फाका मला कुर्ध्याचा शिमगा पाहिल्यावर कळल्या. मी व तात्यांनीं शिमग्याची चोरी हि करण्याचा ठराव एके दिवशीं सकाळीं ९ वाजतां करून त्याची तत्काळ अंमलबजावणी हि केली. शेजारच्या बाळूकाकांचा फणस आमच्या पुढल्या दारापासून १० पावलांवरच होता. त्याच्या मुळांत कमरभर उचीवर फणस लागलेले होते. घरांतून आम्ही 'लाण्या' आणला. मी फणस धरला, तात्यांनीं डेख कापलें. फणस आम्ही घराच्या मागील दारीं नेऊन ठेवला. बाळूकाका सहकुटुंब "देशावर" गेलेले होते. त्यांची वहिवाट म्हादू फडका[1] व लख्या[2] गोठणकर यांचेकडे होती. जानकी[3] गोठणकरीण हें आमचें धाडशी कृत्य दूरून आम्हांला न कळत पहात होती. ती खालीं विहिरीवर जाऊन बायाशीं आमच्या चोरीची तक्रार करू लागली. बाया म्हणत्ये "आमचे मुलगे तुझे फणस कशाला काढतील ? उगाच एकाद्यावर बालंट घ्यायचें ?" आम्ही रेजां[4] जवळून ऐकतच होतों. थोडक्याच वेळांत बाया पाण्याची

---

* १ कुर्ध्याचे एक भटजी, २ आमच्या वाडीवरील एक कुणबी, ३. लख्याची बायको, ४. घराच्या पुढल्या दाराचे लाकडी गज.

दूड[१] घेऊन वर आलीच. आम्हांला गुन्हा कबूल केल्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. पण आम्ही आमच्या गुरूचें नांव मात्र फोडलें नाहीं.

गोदूआते म्हणजे स्वतंत्र वृत्तीची साक्षात् मूर्ति. वर्णानें गोरी व बांध्यानें उंच सडपातळ होती. ती बालविधवा होती पण तिचें सासरीं कायमचें जमण्यासारखें नसावें म्हणून ती माहेरी येऊन राहिली, पण ती हि आमच्याच घरांत पण प्रत्यक्ष आई जिवंत असतां हि स्वतंत्र बिऱ्हाड करून. आमची स्वतःची गरिबी व गरिबीमुळें उद्भवणारी निष्ठुरता हें हि तिच्या स्वतंत्र बिऱ्हाडाचें कारण असेलच. सासरच्या माणसांशीं तिचें भांडण नव्हतें. ती अधूनमधून सासरीं जाऊन महिना-पंधरा दिवस रहात हि असे, पण कायम सासरीं रहाणें तिला रुचत नसावें. रानांत व सड्यावर काकी[२]च्या भाजीसाठीं किंवा काजू, करवंदें इत्यादीसाठीं किंवा पत्रावळीचीं पानें आणण्यासाठीं किंवा चार कापून आणण्यासाठीं ती एकटी सुद्धां दूरदूर व उन्हातान्हांतून फिरत असे. आंकुडी[३] हें तिचें नित्याचें आयुध. लहानमोठ्या दोनचार आंकुड्या तिच्या नेहमीं संग्रहीं असायच्याच. केशवपन करणाऱ्या विधवा बाईनें वहाणा घालून हिंडणें त्यादिवसांत व गुळ्यासारख्या खेड्यांत धाष्टर्याचें होतें. पण कांट्याकुट्यांत जायचें असे त्यासाठीं गोदूआते फाटक्या तुटक्या वहाणा दुरुस्त करवून पायांत घालून फिरत असे. तिचा सायंकाळचा आहार बहुधा वन्यफळांचाच असे. तिच्या दारिद्र्याचें अधिक वर्णन करावें लागणारच आहे, पण तिनें कधीं कोणापुढें किंचित् हि लाचारवृत्ति स्वीकारल्याचें मला आठवत नाहीं.

तिच्या संध्याकाळच्या फराळासाठीं तर मी केव्हांचा अधीर झालों आहें !—अगदीं लहानपणीं तिच्या फराळाची वाट पहातांना होत असें

* १. –दूड–कमरेवर घागर व हातांत कळशी. २. पावसाळ्याच्या प्रारंभी कातळीवर रुजणारी एक प्रकारची पालेभाजी ३. बांबूचा हूक.

प. १५७०१



तितकाच. विधवा-धर्मानुसार--आणि हायहाय ! दरिद्र-धर्मानुसार हि --ती संध्याकाळीं फराळच करीत असे आणि तो हि राजांगण्यांत तुळशीपाशीं बसून. प्रकाश तुळशीपुढच्या सांजवातीचा, नाहींपेक्षां फक्त चांदण्याचा. कारण दिवा जाळायला तेल तरी तिनें कुठून आणायचें ? ती जेमतेम देवापुढें --तिचे निराळे देव असत--सांजवात ओवाळी आणि फराळाचें घेऊन तुळशीशी येऊन बसे. आमचीं जेवणें दिवसाउजेडीं आटोपलेलीं असत. दिवे लागतांच बाया आमचीं अंथरुणें करून देई. त्यापुढें आमचा चार्ज आतेकडे असे. आम्ही तिची फराळाची वेळ कधींच चुकवीत नसूं. फराळ तुटपुंजाच असायचा आणि आम्ही चारदोन पोरें तरी समोर जमायचीं च आमच्या हातावर प्रत्येक नमुना तीळतीळ ठेवण्यांत तिचा अर्धा-अधिक फराळ सपायचा. बाकीचा स्वतः सपवून ती आम्हांला झोपाळ्या-वर घेऊन जाई. तिथें तिचीं कांहीं गाणीं चालत, किंवा आम्हांला ती पुराणांतल्या किंवा उंदरा-मांजरांच्या गोष्टी सांगत असे. कधीं कुटुंबां-तील वडील मंडळींचा इतिहास हि सांगे.

१५-१६ वर्षाची असतांनाच ती विधवा झाली. सासरहून वेगळें होतांना तिला रोकड ४००।२०० रुपये मिळाले असावे किंवा किडुक-मिडूक विकून तिनें ते उभे केले असतील. कदाचित् तिच्या बहिणींचे-बायोआते व काशीआते यांचे--पैसे तिच्याकडे ठेव म्हणून हि असतील. हे पैसे तिनें गांवांत व्याजी लाविले होते. हा सर्व व्यापार आंतबट्ट्या-चाच झाला पण कांहीं काळ व्याजाच्या उत्पन्नाची तिच्या सड्या प्रपंचाला मदत हि झाली असेल. या खेरीज ती पत्रावळी लावून विकीत असे. कांहीं काळ तिनें एक म्हैस हि पाळली होती तिचें दूध विकी. उरणारें आपण खाई. एरवीं तिला मिळणारें दुभतें म्हणजे आमच्या-कडून असेल तेव्हां ताक मिळे तेवढेच. कोकम, आंबे, गरे आमच्या-कडे तुटपुंजेच असत. अर्थात् साटें करून विकण्याचा विधवासुलभ धंदा

तिला उपलभ्य नव्हता. वस्त्राच्या बाबतींत तिला मी जुन्या पागोट्यांचे दोनदोन पट्टे एकत्र सांधून ते नेसतांना पाहिलेलें आहे. तिचें बिऱ्हाड म्हणजे घराच्या मागील बाजूच्या सोप्याच्या कोपऱ्यांत असलेली चूल, पांचचार भांडीं, दांडीवरील कांहीं वस्त्रें व एक लाकडी पेटी एवढेंच. ही पेटी मात्र सोप्यांत नव्हती तर आमच्या माजघरांत ठेवलेली असे. सोप्याच्या पडवींत आमचीं गुरें असत, माळ्यावर गवत भरलेलें असे, इतर भागांत पावसाळ्यासाठीं लाकडें, शेणी वगैरे साठविलेल्या असत. व उरल्या जागेंत आतेचें बिऱ्हाड असे. ती इतक्या गरिबींत रहात असे तरीपण इतरांकडे स्वयपाकाला, बाळंतपणाला किंवा लग्नामुंजींच्या प्रसगीं आश्रित नात्यानें मदतीला जाणें तिला बिलकुल पसंत नसे असें वाटतें, कारण गांवांत किंवा परगावीं हि तिचें बहुधा कोणाकडे जाणें-येणें नसे. तिचे स्वतंत्र दाण्याचे व्यवसायच तिला पुरेसे होते.

ती वारली तेव्हां मी सुमारें १२ वर्षांचा होतों. तिचें वय ४५ वर्षांचें असावें. तात्या १५ वर्षांचें होते. सर्वांत वडील बंधू "भाऊ" २५ वर्षांचे होते. आम्ही मिळवते झाल्यानंतर आलेली सुस्थिति पहायला व उपभोगायला ती जगली नाहीं, आम्हांला तिचे उपकार फेडण्याची संधि मिळाली नाहीं, धाकट्या भावंडांना तिचें संगोपन, शिक्षण व संगत लाभलीं नाहीं हें आमचें दुर्दैव होय. १९०७ साल फार महागाईचें गेलें. गावांत भात व तांदूळ फार महाग होते. बाजारांत स्वस्त दराची बाजरी आली होती. भाऊंना नुक्तीच पुलगांवला गिरणींत रु. ४० ची नोकरी लागली होती. ते घरीं दरमहा रु. १० पाठवीत. त्या खेरीज एकदां रु. २ त्यांनीं मुद्दाम आतेसाठी पाठविल्याचें मला स्मरतें. गोदूआतेनें बाजरी स्वस्त म्हणून तीच खायला विकत घेतली. उन्हाळ्याचे दिवस होते. जन्मांत बाजरी खाण्याची संवय नाहीं. तिला ती सोसली नाहीं. उन्हाळ्याची सुटी आटोपून आम्ही

रत्नागिरीस शाळेंत आलों. मागें तिला अतिसार झाला. अन्न पचेना, पोटांत ठरेना. दुसऱ्या दोन आते तिच्या शुश्रूषेसाठीं गुळयास गेल्या. आम्हांला बहुधा जूलैमध्यें घरून पत्र आलें कीं गोदू आते अत्यवस्थ आहे, भेटून जा. एका शनिवारीं मी व तात्या मुसळधार पावसांतून घरीं गेलों. आतेचे सर्व व्यवहार आंथरुणांतच चालले होते. दोन दिवस घरीं राहिलों. सेवाशुश्रूषा करणें आम्हांला कळत नव्हतें किंवा आमच्या वांट्याला येण्यासारखें हि नव्हतें. सोमवारीं किंवा मंगळवारीं परत येण्यास निघतांना तिला "येतों" म्हणण्यास गेलों त्यावेळीं आमच्याकडे पाहून कळवळयानें भरलेल्या व अत्यंत कष्टानें काढलेल्या ओढल्या स्वरांत तिनें आम्हांला निरोपादाखल सांगितलें "भांडूं नका हां". त्या क्षणींचें तिचें तें शेवटचें दर्शन मी कसें विसरणार ?

रत्नागिरीस आल्यानंतर चार-सहा दिवसांनीं शाळा सुटल्यानंतर मी एकटाच घरीं आलों तों खोलींत घरून आलेलें कार्ड पडलेलें मिळालें, त्यांत आतेच्या निधनाची वार्ता लिहिलेली होती.

---

## ताई

गोदूआतेनंतर ताई. ताई म्हणजे बायाची आई. ताई आडकरीण या नांवानें ती पंचक्रोशींत प्रसिद्ध आहे. तिची बुद्धि, तिचें कर्तृत्व, तिचा अनुभव आणि सर्वांत विशेष म्हणजे तिचें सर्वव्यापी प्रेम यांचे कोठवर वर्णन करावें ?

तिला तीन मुलगे व दोन मुली, बाया सर्वांत मोठी. मुलांमुलींकडून वंशवेलाचा खूप विस्तार झाला आहे. तिचीं नातवडें पंचवीस एक, कदाचित् अधिक च, असतील पणतोंडें हि तितकींच भरतील आणि कांहीं खापरपणतोंडे हि आहेत. आणि सगळींच तिला हवींशीं वाटतात.

आज तिचें वय ८५ वर्षांपलीकडे आहे. अलीकडे ती कांहींशी त्रासिक व विसराळू तर फारच बनली आहे. सारा जन्म स्वतःचें कर्तृत्व गाजविण्यांत गेला. आतां नातू व नातसून हि कर्ती झालीं. तीं आपल्या विचारानें प्रत्येक बारीकसारीक गोष्ट करणार; त्या त्या वेळीं म्हातारीला कोठें विचारीत बसतील ? पण म्हातारीचें लाकडें कुठें ठेवावीं, भाजी कसली करावी, लोणचें कोणत्या बरणींत घालावें ? वगैरे प्रत्येक बाबतींत अनुभवसिद्ध असें स्वतंत्र मत असणारच. स्वतःचें मत प्रभावी ठरलें नाहीं कीं हिला वैताग चढला ! आणि दुबळ्या वैतागाची विशेषत्र उपेक्षा होणार, आणि त्या उपेक्षेनें वैताग अधिकच होणार, अशी अलीकडे स्थिति होते.

ताईचा सारा जन्म स्वतंत्रपणांत गेला. आमचे आजोबा अगोदरच अगदीं थंड व अलिप्त वृत्तीचे. व त्यांतून हि ते घरजांवई होते. ताई मूळचीच तडफदार व चलाख वृत्तीची व त्यांतून आजन्म माहेरवाशीण. त्यामुळें घरचा सर्व प्रपंच तिच्याच विचारें चाले. आजोबा त्यांत लक्ष्य घालीत नसत. आजोबांचें– “बाबांचें”–– काम देवपूजा, वैश्वदेव, वेदपठन शिकविणें, व मधूनमधून भिक्षुकी हें असे. फावल्यावेळीं हातांत पत्रावळी द्रोण लावण्यापासून गोधडी शिवण्यापर्यंतचें कसलें तरी काम घेऊन बसत.

आमच्या घरच्यापेक्षां कुध्र्याच्या म्हणजे आजोळच्या प्रपंचाचा व्याप फार मोठा; उद्योग हि मोठा आणि उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी हि अधिक. आंबे, गरे, कोकम इत्यादि मुबलक. त्यांचीं साटें करून विकण्याची दृष्टि हि असेच. प्रतिवर्षी ४-२ मण तरी (२८ रतली) साटें करून विकीत. शेतीभाती घरींच पुष्कळशी करीत आणि मामांना तर हरतऱ्हेचा भाजीपाला; केळीं, लिंबें, पेरू इत्यादि नित्योपयोगी फळझाडें, ऊंस वगैरे लावण्याचा, तर कधीं कलिंगड, बटाटे, भुयमुग

इत्यादींच्या लागवडीचे प्रयोग करण्याचा भारी शोक. या वस्तु बऱ्याचशा वाटण्यावारीच जायच्या, तरी हि प्रत्येक वस्तूचे पैसे उभे होतील तेवढे करण्याची दृष्टि हि असे. घरीं पानवेली असत आणि विड्याच्या पानांची विक्री व खैरात हा तर अनेक ग्रामस्थांना आपल्या घराकडे आकर्षिण्याचा सर्वोत्तम उपाय. बैल व दुभत्याचीं जनावरें हि भरपूर असायचीं. दूध तूप हि विकीत. ताक मोफत किंवा चारीच्या मोबदल्यांत नेणारी मंडळी हि पुष्कळ असे. कोणी लोणच्याला तर कोणी ताकाला, कोणी कामाला तर कोणी विड्याच्या पानांना, अशा तऱ्हेनें दाराशीं कुणब्यांची वगैरे सारखी येजा असायची. पांढरपेशे हि गप्पागोष्टी मारायला किंवा भेटायला बरेच यायचे. चुलीवर चहाचें आधण आणि बाहेर चिलमीची धुमी बहुधा सतत चालू असायची. ताई व मामा अट्टल चहाबाज होतीं, व आल्यागेल्याची, कुणबीमजुरांची हि, संभावना चहानें होत असे. पहिल्या कोंबड्याला उठून मामा रहाटाला रेडा जुंपीत. गडी दुसऱ्या रहाटावर बसे. मामा, ताई वगैरे बागेचें शिपणें करीत एकंदर वातावरण उद्योगाचें, गरिबींत समृद्धीचें व आल्यागेल्याबद्दलच्या आस्थेचें असे.

आम्हांला तर लहानपणीं आजोळचा मोठाच आधार होता व अजून हि आहे. तात्यांचें व माझें चौथीचें व चि. वासू-श्रीपतींचें तिसरीचें हि, शिक्षण कुर्ध्याला झालें. त्यानंतर व तत्पूर्वी हि आम्ही वरचेवर आजोळीं रहावयास आवडीनें जात असूं. कारण तिथें आंबे, गरे, ऊस, काजू वगैरेची चंगळ असे, आणि घरीं असतांना वडिलांकडून दिवशीं चार दोन वेळां रागें भरून घेण्याचा प्रसंग येई तो हि टळे. घरच्यापेक्षां हि आजोळीं आस्था व जिव्हाळा अधिक वाटे.

आमची ताई वैद्य व सुईण हि होती. विद्वान् भिक्षुकांचें घराणें असल्यानें तिला व्यवहारोपयोगी शास्त्रार्थ हि कळत असे. कित्येक संस्कृत सुभाषितें हि तिच्या तोंडीं असत. धर्मविषयक तात्त्विक प्रश्नांची

आपल्या बायकी व गांवंढळ पद्धतीनें परंतु मार्मिक चर्चा करूं शके. कथापुराणांतून मिळणारें तोंडी शिक्षण तिनें भरपूर घेतलेलें होतेंच. तिच्या तोंडून क्वचित् प्रसंगीं अनुभवसिद्ध सुभाषितें बाहेर पडत. बायाच्या उधळ्या अन्नखर्चाविषयीं बोलतांना एकदां ती म्हणाली "माणसानें किती खाल्लें म्हणून त्याला पुरेसें का होणार आहे ? तोंड हें कुत्रें आहे." गांवांतल्या एकूणएक व आजूबाजूच्या गांवच्या बऱ्याच लोकांचीं नातींगोतीं, पूर्वेतिहास, सध्यांची स्थिति यांची तिच्या स्मृति-वहींत अचूक नोंद मिळे.

स्त्रीसुलभ लाज व भाडभीड यांचा तिच्या पाशीं संपूर्ण अभाव होता. मला कळूं लागल्यापासून तर ती उतारवयाचीच आहे. आजोबा व ती अखेरपर्यंत एका शय्येवर झोपत असतात व तीं हि उघड्या ओटीवर. तिच्या आंथरुणालगत आम्हीं मुलें व इतर मंडळी हि झोपतों. आजोबा वारले तेव्हां ताई सती जात्यें म्हणूं लागली. "तूं सती गेलीस तर सरकार तुझ्या मुलाला फासावर चढवील" अशी लोकांनीं धास्ती घातली तेव्हांच तिचा बेत रहित झाला.

आम्हांला ती अजून हि पोरेंच समजते. मला "शित्या"च म्हणते. १९१२ सालीं धाकटे मामा मुंबईस रहात. त्यांची प्रकृति बरी नव्हती म्हणून ताई मुंबईस आली होती, त्यावेळीं मी व तात्या एल्फिन्स्टन कॉलेजांत शिकत होतों व कॉलेजच्या होस्टेलमध्यें रहात असूं. तात्या प्रथम तिला मामांच्या बिऱ्हाडीं भेटायला गेले. आम्हांला खाऊ म्हणून भाजलेले काजूगर तिनें आणले होते ते तात्यांना देऊन त्यांना बजावून सांगत्ये "शित्याला दे हां; बघ हो, नाहींतर एकटा खाशील." चार दोन दिवसांनतर मी भेटायला गेलों तेव्हां मला वांटणी मिळाली कीं नाहीं याची तिनें प्रथम चौकशी केली.

त्याच वेळची एक अत्यंत पवित्र स्मृति माझ्या हृदयांत सदैव ताजी राहील. मी त्यावेळीं नुक्ताच कॉलेजांत दाखल झालों होतों. मॅट्रिकच्या परीक्षेंत माझा युनिव्हर्सिटींत पांचवा नंबर आला होता पण तेवढयानें फक्त कॉलेजची मासिक दहा रुपये स्कॉलरशिप तेवढीच मिळणार होती. खर्चाचें साधन नाहीं म्हणून मी कॉलेजें सुरू झालीं तरी घरींच राहिलों होतों. भाऊ खर्च पुरवितील — मॅट्रिकपर्यंत त्यांनींच पुरविला होता— अशी माझी समजूत होती, पण ऐनवेळीं त्यांचें पत्र आलें कीं "पुढील विद्या तूं माझ्यावर भरंवसा न ठेवतां स्वावलंबनानेंच करायला पाहिजेस. मी प्रसंगोपात्त मदत करीन हि पण ती विशेष नाहीं". माझ्या सर्व आशा ढांसळून पडल्या व मी हातपाय गाळून घरींच राहिलों. इतक्यांत तात्यांचें पत्र आलें कीं मुंबईस निघून ये. तात्या व मामा यांनीं ठरविलें कीं मी एल्फिन्स्टन कॉलेजांत जावें, प्रथम वर्षाचें शिक्षण कर्ज काढून करावें, वर्ष अखेर *प्रीव्हियसच्या परीक्षेंत अेल्फिन्स्टन कॉलेजांत पहिला येणाराला रु. २५० चें बक्षिस असतें तें मिळवावें व कर्ज फेडून टाकावें. अपेक्षेप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या व माझें कॉलेजचें शिक्षण सुरळीतपणें पुरें झालें. मला पैशांची अडचण आहे एवढें ताईला समजलें होतें. मी मामांच्या बिऱ्हाडीं तिला भेटायला गेलों त्याप्रसंगीं मी परत जायला निघालों तेव्हां रात्र झाली होती. ताई माझ्या मागोमाग जिन्यापर्यंत आली आणि आपल्या गळयांतल्या पुतळयांच्या गांठल्याला हात घालून म्हणते, "त्रिंबक तुला पैसे देत नाहीं ना ? हें माझें गांठलें घेऊन जा. तें वीकटीक आणि विद्या कर. तें माझें आहे. मी त्याचें कांहीं केलें तरी मला कोणी

*कॉलेजांतील पहिल्या वर्षाच्या युनिव्हर्सिटीपरीक्षेला प्रीव्हियस म्हणत.

विचारणारा नाहीं." मी तिला खर्चाची व्यवस्था झाली असल्याचें सांगितलें व तिच्यापासून वेगळा पडलों.

मला चित्र काढतां येतें तर मी ताईचें त्या प्रसंगींचें चित्र काढलें असतें. ताईची त्या प्रसंगींची मूर्ति माझ्या हृदयांत सदैव ह्यात राहील.

माझ्या सध्यांच्या "स्वार्थत्यागी" जीवनामध्यें मला क्वचित् वैगुण्य जाणवत असेल तर एवढ्याच गोष्टीचें कीं या वडील मंडळींच्या उपकारांची फेड करण्याचा प्रयत्न सुद्धां माझ्याकडून घडत नाहीं.

कारण ताईचा तर बाळपणापासूनच माझ्यावर विशेष लोभ, आणि अलीकडच्या माझ्या तिला दिसणाऱ्या निर्धनतेमुळें तो अधिकच वाढला आहे. आतां आम्ही तिला भेटायला गेलों कीं 'ही कदाचित् शेवटचीच भेट असेल' या किंवा अन्य भावनेनें असेल पण तात्या व वासूनाना तिला भेटायला गेले असतांना तिनें त्यांना जातांना ४/४ आणे खाऊला दिले. कांहीं दिवसांनीं मी गेलों तेव्हां मला रुपया काढून दिला. नको म्हणण्याची सोयच नाहीं, चपराक मिळायची ! गेल्यावर्षी तुरुंगांतून कलेक्टरच्या बंदीहुकमावर सुटून चारच दिवस तुरुंगाबाहेर राहिलों होतों त्यामुदतींत १४-२-३२ रोजीं तिला भेटायला गेलों तेव्हां हि तिनें मला माझ्या कामगिरीबद्दल शाबासकी दिली आणि मी निरोप घेऊन निघाल्यानंतर परत हाक मारून सक्तीनें एक रुपया दिला. साटें खोबरें वगैरे नित्याचा प्रसाद मी अगोदरच थैलींत भरून घेतला होता.

मला तिनें लग्न वगैरे करण्याचा कधींच आग्रह केलेला नाहीं; 'तुझ्यासारखे वहालेले कोणी कोणी हवेतच" असें म्हणून क्वचित् पसंती हि दाखविलेली आहे. माझें अस्पृश्यता-निवारण तिला सर्वस्वी पसंत असेल असें सांगवत नाहीं पण त्यावरून जेव्हां ग्रामण्य झालें

तेव्हां ती माझाच पक्ष घेऊन "ऐसें कैसें रे सोवळें। शिवतां होतसे ओवळें" ॥ असा युक्तिवाद करी.

पण तिच्याकडचें सर्वांत उत्तम सर्टिफिकेट मला मिळालें तें १९१२ च्या डिसेंबरांत माझ्या संग्रहणीवर तिचे उपचार करण्यासाठीं मी आजोळीं जाऊन राहिलों होतों तेव्हां. मी तेव्हां १८ वर्षांचा होतों. आमच्या आजोळघरीं कामांचा पसारा नेहमींच असायचा हें पूर्वीं नमूद केलेंच आहे. मी त्या कामांत बेताबातानेंच कां होईना पण भाग घेत असें. एकदां ताई मामांजवळ हळूंच म्हणाली पण मला तें ऐकूं आलें, "आमचा सीताराम उद्योगी हो; त्याच्या जीवाला रिकामें बसायला नको." इतर कोणत्या हि सर्टिफिकेटांपेक्षां मला याची किंमत त्यावेळीं हि अधिक वाटली व अजून हि वाटत्ये.

तिला भेटायला गेलों म्हणजे तासभरच जरी राहिलों तरी तेवढ्या अवधींत "हें चालेल का? तें खाशील का? अगो, अमुक तें दे याला आणून" असें म्हणून पंचवीस जिन्नस खाण्याबद्दल आग्रह करील. कोणी आजारी पडलें कीं एकामागून एक सुचतील तेवढीं औषधें करण्याचा सपाटा चालू असायचा

घरच्या गुरांना कुटुंबांतल्या माणसांप्रमाणें लेखण्याचा रिवाज तर आपल्यामध्यें सार्वत्रिक आहेच. वनस्पतिजीवनाबद्दल हि ताईला वाटणारा आत्मीयभाव एका प्रसंगावरून चांगला व्यक्त होईल. घराजवळच शेगटाचें झाड होतें. त्यावर वानर येऊन बसत आणि तेथून घरावर हि उड्या मारून कौलें फोडीत. म्हणून शेगट तोडून टाकण्याचा ठराव झाला. गडी कोयता घेऊन झाडावर चढला हि. परंतु "प्रवृत्ते शस्त्रसंपाते" ताईच्या मनानें कच खाल्ली. "जिवंत झाड असत्या आयुष्यीं कां तोडा?" असें म्हणून तिनें गड्याला खालीं उतरविलें. हा अस्सल हिंदु हृदयाचा नमुना. घरीं पाळलेल्या एका कुत्र्याची तरी मला आठवण

आहे. ताईच्या लाडांनीं "टिपू" इतका नेभळा बनून गेला होता कीं रात्रीं ताईच्या उशाशीं त्याच्यासाठीं गोणपाट आंथरलेलें असे त्यावर गुपचूप झोपून रात्र काढी.

---

## साळूताई व भिमी

आमच्या चार बहिणींपैकीं आका व गुणी ह्या गौरवर्ण, शरीरानें प्रमाणांत सुदृढ, कर्तबगार व धमकदार. साळूताई व भिमी वर्णानें काळचा, अंगानें कृश, नरम व सोशिक वृत्तीच्या व त्यामुळेंच कांहींशा कुढया स्वभावाच्या. दोघी हि कारुण्यमूर्ति. दोघींचा हि प्रतिकूल परिस्थिती-मुळें अकालीं अंत झाला.

साळूताई तात्यांहून २-३ वर्षांनीं मोठी. बुद्धीनें हि कमी नाहीं. तात्यांबरोबरच गांवांतल्या खासगी शाळेंत जाई. वर्गांत तिचा पहिला नंबर असे व तात्यांचा दुसरा. तें सहाजिकच होतें कारण ती तात्यां-पेक्षां वयानें २-३ वर्षांनीं मोठी होती. गांवच्या शाळेंत ती तिसरी यत्ता शिकली.

मी सात वर्षांचा असतांना दुसरी आटपून तिसरींत गेलों. बाबा रत्नागिरीस गेले होते ते माझेसाठीं तिसरीचें पुस्तक घेऊन आले. या पुस्तकाबरोबरच ते एका प्रौढ, किंबहुना उतार वयाच्या गृहस्थांना घेऊन आले होते. हातपाय धुऊन झाल्यावर बाबांनीं मला साळूताईला बाहेर बोलवायला सांगितलें, त्याप्रमाणें मी तिला बाहेर बोलावली. ती आली पण दारामागें थबकली. बाबांनीं पुन्हां पुन्हां हांका मारल्या तेव्हांच ती बाहेर आली. आलेल्या गृहस्थांनीं माझ्याकडून त्या नव्या तिसऱ्या पुस्तकांतील एक धडा वाचून घेतला होता. साळूताईकडून त्यांनीं बालबोध मासिकांतील कांहीं मजकूर वाचून घेऊन कांहीं प्रश्न विचारले व शेवटीं तिला मात्र खाऊचा पुडा दिला. मला मागाहून

त्यांतला हिस्सा मिळाला ती गोष्ट अलाहिदा, पण मला त्या गृहस्थांचें वर्तन पक्षपाती वाटलें.

दुसऱ्या दिवशीं शाळेंत मास्तरांनीं मला विचारलें, "काल रत्नागिरीहून तुमच्या साळूला पहायला मारे आले होते ? काय झालें ?" मी उत्तर काय देणार ? मलाच ही माहिती पुरविल्याबद्दल मी मनांत मास्तरांचे आभार मानले. मागाहून मला असें हि समजलें कीं आलेले गृहस्थ लग्न करूं इच्छिणारे बिजवर होते व त्यांचें स्वतःसाठींच वधू-संशोधन चाललें होतें.

त्यानंतर किती दिवसांनीं न कळे, पण एके दिवशीं संध्याकाळीं मी शाळेंतून घरीं येत असतां वाटेंत दोन गृहस्थ, उंची पोशाख केलेले, पावसच्या वाटेनें जातांना दिसले. लवकरच गोदूआतेकडून मला समजले कीं "रावजी साळूला कारटचाला देतो आहे." "कारटा" म्हणजे प्रेतसंस्काराचें पौरोहित्य करणारा भट. असल्यांना कोणी मुली देत नाहींत वगैरे खुलासा हि मिळाला. हे कारटे हि बिजवरच होते.

यानंतर थोड्याच दिवसांनीं सकाळची शाळा आटोपून घरीं येतों तों झोपाळचावर मामा व कुर्ध्याचे नाना सावकार व आणखी २-३ मंडळी येऊन बसलेली. बाबांची त्यांची कांहीं तरी बोलाचाली होऊन गेली असावी असें दिसलें. मी आल्यानंतर लौकरच "दहा का वाजले ?" असें म्हणून मंडळी निघून गेली. मामा आपल्या बरोबरच साळूताईला घेऊन गेले कीं साळूताई संध्याकाळून आजोळीं गेली तें आतां स्पष्ट स्मरत नाहीं.

या नंतरचा प्रवेश साळूताईच्या लग्नाचा. तात्या व मी लग्नासाठीं आंबेऱ्याला गेलों होतों. घरचें दुसरें कोणी गेलें नाहीं. ताई व आजोबा यांनीं पुण्याहवाचन ठेवलें व कन्यादान केलें. बाबा कारटचाला मुलगी

देतात असें समजतांच मामांनीं येऊन त्याला हरकत घेतली. बाबा त्यांच्या म्हणण्याला कबूल तर झाले पण त्या बरोबरच साळूताईच्या लग्नाची सर्व जबाबदारी त्यांनीं मामांवर ढकलली. साळूताईचें लग्न मामांनींच जुळविलें व केलें आणि मागच्या रागानें बाबा लग्नाला गेले नाहीं.

अशा तऱ्हेनें साळूताईचें लग्न झालें. सासरहून ने-आण करणें सुद्धां पुढें कांहीं वर्षेंपर्यंत आजोळमार्फतच चाले. तिच्या मंगळागौरी वगैरे हि आमच्याकडे झाल्या असतील कीं नाहीं त्याची मला शंका आहे.

आमचे मेव्हणे दत्तोपंत केळकर स्वभावानें फार चांगले. एवढेंच साळूताईला सासरीं सुख होतें. पण इतर मंडळीचा जाच तिला बराच जाणवत असे. तिचा स्वतःचा सोशिक परंतु कुढा स्वभाव त्याला कारण होताच. ती मनांतल्या मनांत कुढतझुरत असल्याचें त्या लहान वयांत हि माझ्या लक्ष्यांत येई. दत्तोपंत प्रथम मुंबईस पोलीसांत नोकरीला होते. पुढें कांहीं कारणानें ती नोकरी सुटल्यापासून खासगी कारकुनीची नोकरी करतात. मध्यंतरीं कांहीं वर्षें घरीं राहून शेतीच करीत.

लग्नानंतर ५-६ वर्षांनीं सासरीं ती एकदां अतिशय आजारी पडली. तात्या तिला भेटायला गेले होते ते तिला डोलींत घालून घरींच घेऊन आले. या दुखण्यामध्येंच श्री. दत्तोपंत प्रथम आमचे घरीं आले. कारण साळूताईच्या लग्नाबाबतचा बाबांचा राग जावयाला हि बाधतच असे. शेवटपर्यंत बाबा दत्तोपंतांशीं धड बोलले हि असतील असें मला आठवत नाहीं. या दुखण्यांतून साळूताई उठली. तिचीं ५-७ बाळंतपणें हि झालीं. मुलें हि सर्व निरोगी, देखणीं, चलाख बुद्धीचीं व सर्वांकडून कौतुक करून घेणारीं निघालीं. पहिला विठोबा झाला तेव्हां त्याच्या आजीनें बारसा थाटानें केला, त्याला मी गेलों होतों. बारसा आटपल्या-

नंतर हि एक दिवस राहिलों होतों. आणखी दोन दिवस रहाण्याबद्दल सासरच्या मंडळींचा आग्रह होता पण साळूताईनें मला आपल्या खोलींत बोलावून घेऊन लौकर जायला सांगितलें, आदरातिथ्य वरकरणी आहे असें सांगण्याचा तिचा आशय. त्याप्रमाणें मी दुसऱ्या दिवशींच परत आलों.

तिचा तिसरा मुलगा विश्वनाथ फार चलाख व हूड. ७-८ वर्षांचा असतांनाच पिसाळलेला कुत्रा चावून तो वारला. साळूताईला त्यापूर्वींच खोकला जडला होता. विसूच्या मृत्यूच्या धक्याची त्यांत भर पडली आणि तिनें अंथरूण धरलें तें सोडलेंच नाहीं. गरभार होती, बाळंतपण निर्वेधपणें होऊन मुलगा झाला. तिच्या शुश्रूषेसाठीं चि. गुणूताई मुद्दाम बडोद्याहून येऊन राहिली होती. साळूताईच्या निधनानंतर छोट्या वसंताला माझ्या प्रोत्साहनावरून व दत्तोपंतांच्या संमतीनें गुणी आपल्या-बरोबर बडोद्यास घेऊन गेली. त्याचें संगोपन करण्याचा तिनें मनोभावानें प्रयत्न केला, पण तो हि ४-२ महिन्यांतच आपल्या आईच्या मागोमाग निघून गेला.

आपल्या एकाद्या मुलाचें तरी इंग्रजी शिक्षण व्हावें अशी साळूताईची इच्छा होती. तिनें माझ्यापाशीं दामूच्या शिक्षणासंबंधीं गोष्ट काढली हि होती. माझ्याकडून हयगय झाली आणि ती हि भिडस्त त्यामुळें ती गोष्ट राहून गेली, हें माझ्या मनाला लागून राहिलेलें आहे.

तिच्या मृत्यूपूर्वी महिनाभर मी घरीं गेलों होतों. बळवंतराव जोशांच्या शिफारशीवरून ती हीमोग्लोबिन् हें विलायती औषध घेत होती. तें प्राणिजन्य पदार्थांचें बनविलेलें असतें असें मी तिला सांगितल्या-वरून तिनें तें घेण्याचें बंद केलें. पुन्हां मृत्यूचे अगोदर २-४ दिवसांपूर्वी हि मी तिला भेटलों. सासरच्या कोणा हि माणसावर रोष ठेवूं नकोस,

मुलांबाळांची काळजी करूं नकोस, वगैरे मी तिला सांगितलें. तिनें मला "आपला कोणावर हि रोष नाहीं व आपण शांत चित्तानेंच मरणार" असें सांगितलें. साहजिकपणेंच मुलांबद्दलची तिची चिंता मात्र दूर होण्यासारखी नव्हती. तिचा मृत्यू १९२८ सालच्या मार्चच्या सुमारें झाला. त्यावेळीं तिचें वय ४० च्या आसपास असावें.

ती. तात्यांपेक्षां बुद्धीनें ती कांकणभर हि कमी होती असें मला वाटत नाहीं. तथापि उभयतांच्या भवितव्यामध्यें केवढा फरक !

भिमीचा अंत मात्र २०-२२ वर्षांच्या वयालाच झाला, आणि त्याला हि कारण आमच्या त्यावेळच्या स्त्रीविषयक समजुती व रूढि. भिमी बालपणीं अतिशय रडवी होती. तिला खेळवीत रहायला आणि तिचे हट्ट पुरवायला वेळ तरी कोणाला होता ? कदाचित् या रडण्यामुळें तिचे डोळे लहानपणापासूनच अधू होते. अंगानें हि ती कृश, वर्णानें सांवळी व स्वभावानें भोळसर होती. ८-९ वर्षांची असतांना दिल्लीस भाऊंकडे दोन वर्षे होती. त्या मुदतींत तिकडे मलेरिया लागून अशक्तपणांत वाढच झाली. तिच्या लहानपणीं गांवांत शाळा नव्हती, परंतु घरगुती शिकवणीनें लिहिणें वाचणें सहजीं शिकली होती.

१९१६ सालीं बाबा वारले त्यावेळीं भिमीला बारावें वर्ष असावें. ती. भाऊ अगोदरच वारले होते. ती. तात्या नुक्तेच विलायतेहून परत आले होते. ते आय. सी. अेस. मध्यें नापास झाले पण ऑक्सफर्ड ची बी. ए. करून आले होते. त्यांना तात्पुरती नोकरी लागली होती. घरची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी माझ्यावरच होती. माझ्या व मामांच्या मागें बायाचा भिमीच्या लग्नाबद्दल लकडा सुरूं झाला. गोळपेचे वैद्य बळवंतराव जोशी हे बिजवर व २७-२८ वयाचे. त्याखेरीज आम्हांला त्यांचेमध्यें कांहीं वैगुण्य दिसत नव्हतें. त्यांतून हि आमची कांहींशी सावरलेली आर्थिक स्थिति भाऊंच्या मृत्यूमुळें पुन्हा

खालावलीच होती. तात्यांच्या कमाईनें ती परत सुधारण्यास अद्याप अवधि होता. म्हणून एकंदर परिस्थिति व बायाची घाई लक्ष्यांत घेतां स्थळ नक्की करण्यांत आलें व कन्यादान माझ्याच हस्ते झालें. भिमीच्या मथत सवतीला एक मुलगा आहे हें मला लग्नानंतरच समजलें.

बळवंतरावांचीं आई त्यांच्या बालपणींच वारली होती. घरांत पेन्शनर वडील होते आणि स्वयंपाक करण्यास कोणी वृद्ध आप्त बाई असे. परंतु भिमीच्या दुर्दैवानें लग्नानंतर वर्षभऱ्यांतच म्हातारी निवर्तली. घरांत पहाणारे श्वशुर; ते कांहींसे कडक आणि आमची भिमी चलाख नव्हेच, त्यामुळें तिला बोलणीं ऐकून घेण्याचे प्रसंग वारंवार येत. शिवाय घरच्या चुलीची जबाबदारी सर्वस्वी तिच्यावरच येऊन पडल्यानें बालवयांत हि तिला विशेष माहेरवास लाभूं शकला नाहीं. सासरीं जवळपास शेजार हि नसे. १९२१ सालीं मी साबरमतीला असतांना बळवंतराव हि ४-६ महिने तेथेंच राष्ट्रीय शाळेंत सुतारी शिक्षक म्हणून राहिले होते. त्या अवधींत तर घरीं फक्त भिमी व श्वशुर फक्त दोघेच जणें. सावत्र मुलगा आपल्या आजोळींच असे.

१९२३-२४ च्या सुमारें भिमीला वरचेवर ताप येऊं लागला व क्षीणता आली. बळवंतरावांनीं तिला विश्रांतीसाठीं माहेरीं पाठविली. प्रकृति तात्पुरती सुधारली हि. बाळंत होऊन मुलगी—कालिंदी ऊर्फ बची—झाली. पण पुढें मुलीपासून हि फार त्रास होऊं लागला. मुलीच्या रडीमुळें रात्रीं नीट झोप हि मिळेना. अधिकाधिक क्षीणता येतां येतां दुखणें विकोपाला गेलें. तात्यांकडे पुण्यास व महाबळेश्वरास हवापालटासाठीं गेली. डॉक्टरांनीं आंतरिक क्षयाचें निदान केलें. मे मध्यें परत गुळच्यास आली. मी रत्नागिरीस असें पण तिच्या शुश्रूषेसाठीं १-१॥ महिना घरीं जाऊन राहिलों होतों. जूलैमध्यें अंत झाला. अकालीं

मृत्यु येण्याचें एक कारण असें हि असावें अशी मला शंका आहे कीं ऋतुप्राप्तीपूर्वींहि विजोड विवाहामुळें यौवनक्षति झाली असावी. आम्ही सुशिक्षित असून हि भिमीच्या बाबतींत आपलें कर्तव्य पार पाडूं शकलों नाहीं याचें मला राहून राहून दुःख होतें.

## शंकर

शंकर हें बायाचें दहावें मूल. जन्म १९०७ सालचा. त्याच्या बाळंतपणांत बाया फार आजारी पडली त्यामुळें त्याला अंगावरचें दूध मिळालें नाहीं. परिणामीं अगदीं बालपणींच त्याला दमा सुरू झाला. आमच्या वडिलांना दमा होता. दमा आनुवंशिक असतो पण आम्हां भावांपैकीं फक्त शंकरांतच तो उतरला. बालपणीं तर तो दम्यानें फारच हैराण होत असे. त्याच्या शरीराची वाढ हि नीट झाली नाहीं. तीसच्या वयाला हि तो बारा वर्षांचासा दिसे. अडतीस वर्षांचा वारला हि.

बालपणीं त्याचा दिवस सुरळीत जाई पण रात्रीं झोपेंत त्याचा दमा उसळे आणि तो व्याकुळ होऊन रडत रडत जागा होऊन उठे आणि अगदीं बेचैन बने. त्यावेळीं त्याला आराम कसा द्यावा हा आमचेपुढें हि पेचाचा प्रश्न असे. जीव जातो कीं रहातो अशी स्थिति होई.

त्याची जन्मपत्रिका आम्ही एका ज्योतिषाला दाखविली. त्यानें तर सांगितलें कीं याचे ग्रह फार उच्चीचे आहेत. हा लोकोत्तर पुरुष होण्यासारखा आहे. त्यावरून आम्ही त्याला "नेपोलियन" सुद्धां म्हणत असूं. तो अगदींच कृश पण दमा नसेल तेव्हां खडखडित असे, म्हणून त्याला "बत्त्या" ही म्हणत (खलांतील बत्ता).

हा आजार, अशक्तपणा व परस्वाधीनपणा यांमुळें त्याचा स्वभाव अत्यंत नम्र, सहनशील व भिडस्त बनला होता. साऱ्या जन्मांत त्याला कधीं रागावलेला, कोणाशीं भांडतांना, कोणाची खोडी काढतांना किंवा कसला हट्ट करतांना कोणी पाहिलेलें नाहीं. लहान मुलांमध्यें तरी या सर्व गोष्टी चालतातच पण दुबळा शंकर बालपणीं सुद्धां अत्यंत सहनशील. त्याचा जन्मच जणूं सहन करण्यासाठीं होता.

हवापालटानें दमा जातो तर पहावें म्हणून ती. तात्या त्याला आपल्याकडे पुण्याला हि घेऊन गेले होते. मी साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांत असतांना तिकडे हि त्याला नेला होता. नानाप्रकारचे उपचार हि केले. "चित्रकूटच्या महंतांचें" औषध हि मागवून दिलें. स्वामी कुवलयानंदांकडे जाऊन कांहीं योगासनें, नौति, धौति इत्यादि ही शिकून आला. राजगोपालाचारींनीं हि स्वतःचें दम्यावरील पथ्यपाणी त्याचेसाठीं सविस्तर लिहून पाठविलें होतें. तो स्वतः पथ्य पाळीतच असे. पण खोकला हा त्याचा नित्याचाच होता, नेमस्त दमा हि नेहमींच असे व त्यावर तो "हिमराड्स् क्युअर" नांवाच्या औषधाच्या पुडीचा धूर हुंगीत असे. महिना दोन महिन्यांनीं मात्र ४-२ दिवस जोराचा दमा लागून आंथरूण धरीत असे.

त्याला शाळेंत घालण्याचा प्रश्नच नव्हता. पण न शिकवितांच तो लिहायला वाचायला शिकला आणि वाचनानें सामान्यज्ञान त्यानें चांगलें मिळविलें होतें. वर्तमानपत्रें हि नियमित वाचीत असे. प्रचलित राजकारणाची माहिती ठेवीत असे. तोच एकदां बायाविषयीं मला म्हणाला "बाया सोशलिस्ट आहे. कुळांच्या बाजूची आहे." ( त्यावेळीं खोती पद्धति बंद व्हावी अशी चळवळ चालू होती.)

वृद्ध, खंगलेली, आंधळी बाया आणि दमेकरी शंकर हे आमच्या घरचे कायमचे मेंबर. बायाला तो आणि त्याला बाया. दोघांना हि

एकमेकांबद्दल पराकाष्ठेचा कळवळा. शंकर झोपेंतून कण्हत उठला तरी त्याच्या तोंडून "आई आई" निघत नसे तर "बाया, बाया" च निघे. बायाच्या शेवटच्या दुखण्यांत मी बायाच्या शुश्रूषेला जाण्यापूर्वीच्या पांच सहा महिन्यांमध्यें बाया रात्रीच्या वेळीं बेचैन होई त्या प्रसंगीं इतर माणसें बहुधा घोरत पडलेलीं असत पण शंकर उठून बायाकडे जाई. असें मला आमच्याकडे पाव्हणी म्हणून कांहीं दिवस रहायला आलेल्या एका आप्त बाईकडून समजलें.

प्रकृति सामान्य असतांना घरची देवपूजा शंकरच करी—आवडीनें व भक्तिभावानें करी. संध्या, ध्यान इत्यादि सुद्धां अगदीं गंभीरपणें करतांना मी त्याला अनेकदां पाहिलें आहे. तो शुभ्र खादीच वापरी.

त्याचा अंत मात्र अगदींच चटका लावणाऱ्या पद्धतीनें झाला. ४-१-४४ ला बायाचा अंत झाला. बाया गेल्यानें त्याचा मुख्य जीवनाधार तुटल्यासारखाच झाला. बाया वारली त्याच्या सहाव्या सातव्या दिवशींच परोल रद्द करून घेऊन मी परत हिंडलगा (बेळगांवनजीक) तुरुंगांत गेलों. तिकडे त्यानें मला बायाच्या तेराव्याचें, आजूबाजूचे लोक तिच्या 'प्रसादाला' मोठ्या संख्येनें व आस्थेनें आले इत्यादीचें सविस्तर वर्णन लिहून पाठविलें. मला तें इतकें हुबेहुब व हृद्य वाटलें कीं मी तेंच पत्र ती. तात्यांना वाचायला पाठविलें. त्यांना हि तें फार आवडलें. मी तुरुंगांतून सुटून आल्यानंतर हि त्यानें माझ्यापाशीं उद्गार काढले कीं "बायाच्या निःस्वार्थ जीवनाची राहून राहून आठवण होते."

बाया गेल्यापासून त्याच्या प्रकृतीलासुद्धां उतरती कळा लागली. रत्नागिरीला नेऊन डॉक्टरांना प्रकृति दाखविली. त्यांनीं सांगितलें "काळीज ताणून मोठें झालेलें आहे. जातील दिवस तेवढे जातील. संभाळून रहावें."

१९४५ सालची अखेर होती. तुरुंगांतून बाहेर आल्यापासून मी माझ्या सार्वजनिक कामांत दंग होतों. इतक्यांत चि. शंकरचें कणकवलीला मला पत्र मिळालें कीं "आपल्याला फार अशक्तपणा वाटतो. सवडीनें भेटायला या." रत्नागिरीला कांहीं कामानें जायचेंच होतें तेव्हां रत्नागिरीला पोचतांच तसाच तरीपलीकडे पावसेची संध्याकाळची मोटर पकडायला गेलों. मोटार सुटण्याच्या बेतांत होती व तुडुंब भरलेली होती. मोटरवाला मला घ्यायला तयार होईना. पण मोटारींत चि. पांडू (शंकरहून धाकटा भाऊ) होता. तो घरींच चालला होता. तो उतरला आणि त्याची जागा मी घेतली. घरीं पोचायला रात्र झाली. शंकर मला म्हणाला "बायाच्या शुश्रूषेसाठीं तुम्ही राहिलेत तसे माझ्या शुश्रूषेसाठीं तुम्ही महिनादोनमहिने येथें येऊन रहातां का"? त्याला रोज एनिमा घ्यावा लागे. त्याचा हि त्याला त्रास वाटे. म्हणून झोपून एनिमा घेतां यावा व शौचाला हि पडल्या पडल्या व्हावें अशी खोके व तस्त यांची व्यवस्था मी त्याला करून दिली होती. पण तस्त नेऊन टाकणार कोण ? घरीं दोन भावजयी होत्या त्या शकराचें सर्व करीत व आणखी हि पडेल तें करत्या. पण हा कमालीचा भिडस्त. मी त्याला म्हटलें "वैनी तुझें सर्व करतील. तुला भीड वाटायला नको. मी राहिलों असतों, पण बाहेर निकडीचीं कामें आहेत. (१९४६ च्या निवडणुका जवळ आल्या होत्या. त्यांत कॉंग्रेसला यश मिळवून देण्यासाठीं मी सर्वतोपरी झटलों व यशस्वी हि झालों.) इत्यादि" माझ्या उत्तरानें त्याची घोर निराशा झाली असावी. पण ती बोलून दाखविण्याचा त्याचा स्वभावच नव्हता. झोपण्याची वेळ झाली होती. आम्हीं एकत्र बसून प्रार्थना केली. तो झोपला आणि मी शौचाला जाऊन आलों. मी परत येतों तों त्याला झोप लागलेली दिसली.

रात्रीं खोकला चाळवून तो बहुधा उठायचा. पण तसा उठल्याचें मला जाणवलें नाहीं. मी पहाटे पांच वाजतां उठलों तरी हा झोपलेला-च. थोड्या वेळानें वैनी त्याला तोंड धुवायला गरम पाण्याचा तांब्या घेऊन आली, तिला मी म्हटलें ''आज शंकराला गाढ झोप लागली आहे. ती पाणी खाटेपाशीं ठेवून गेली. सहा वाजले तरी शंकर जागा होत नाहीं, कीं हालचाल ही नाहीं. मी हांका मारल्या. ओ नाहीं म्हणून त्याला हालवून पाहिलें तरी हू कीं चूं नाहीं, पांघरूण काढून पहातों तर प्राण नाहीं. रात्रीं झोपेंतच केव्हां अंत झाला न कळे !

अंतकाळीं मला त्याच्याजवळ रहायला मिळालें हा केवढा योगा-योग. पण मी त्याची केलेली निराशा च तर त्याची हृदय-क्रिया बंद पडण्याला कारणीभूत झाली नसेल ?

---

## गणपतिमामा

आमचे मामा दोन. थोरले गणपतराव ऊर्फ दादा, धाकटे वामनराव. दोघे हि बुद्धिमान्. पण गणपतराव हे सन १८९० चे सुमारें मॅट्रिक, कीं स्कूलफायनल नांवाची परीक्षा असे ती, पास झाले पण घरींच राहिलें. वामनराव एम्. ए., एल एल बी झाले, प्रथम ओरिअेंटल ट्रन्स्लेटरकडे व नंतर पोलीस खात्यामध्यें नोकरी करून मोठ्या हुद्याला पोचले. त्यांना रावबहादूर पदवी हि मिळाली. ते १९५९ सालीं पुण्यांत वारले. तेथें त्यांच्या स्वतःचा बंगला आहे.

दोन्ही मामांचे माझ्यावर परोपरींनीं उपकार झालेले आहेत, पण येथें मला गणपतिमामांविषयींच लिहायचें आहे.

गणपतिमामांनीं इंग्रजी शिक्षण घेतलें पण त्यांचा ओढा खेड्यां-तील जीवनाकडे असल्यानें ते घरींच शेतीसाठीं राहिले. मध्यंतरीं

आर्थिक चणचणीपायीं रत्नागिरीला शाळाखात्यांत त्यांनीं नोकरी धरली होती, पण ती तात्पुरती असावी किंवा त्यांना मानवली नसावी.

त्यांना शेतीची आवड होती. कोबी नवलकोलसारख्या भाज्या त्या दिवसांत विशेष कोणी करीत नसे पण ते करीत. ऊस, विड्याचीं पानें इत्यादि करीत. भातशेती, कुळीथ, नाचणा इत्यादि सर्वसामान्य शेती तर कसून करीत असत. घरीं कामासाठीं गडी असे पण ते स्वतः गड्यापेक्षां हि अधिक कामें करीत.

पण त्याखेरीज त्यांना वाचनाचा हि नाद होता. ते कीर्तनें हि करीत, कविता व पदें रचीत आणि नाटकें करण्याची तर त्यांना विशेषच हौस. गांवांत कृष्णाष्टमीच्या व शिवरात्रीच्या उत्सवांचे प्रसंगानें ग्रामस्थ नाटकें करीत त्यांत मुख्य पुढाकार यांचा. नायकाची भूमिका यांच्याकडेच असे. त्यांना गाण्याचा हि चांगला सराव होता आणि नाटकें संगीतच असत. शारदा नाटकांत कोदंडाची, शाकुंतलांत दुष्यंताची, सत्यविजय नाटकांत सत्यविजयाची, मृच्छकटिकांत चारुदत्ताची, राणा भीमदेवाची, संशयकल्लोळ नाटकांत हि नायकाची भूमिका त्यांनीं केलेली मी पाहिली आहे. रंगभूमीवरील नाटक हि मला पहायला मिळे पण तत्पूर्वींच्या "तालमी" सुद्धां मला पहायला मिळत. सबंध नाटक जागून पहाणें मला फारसें जुळत नसे तथापि मामांमुळें वरील व आणखीहि कांहीं नाटकांशीं लहान वयांत माझा ओझरता परिचय झाला.

या सर्व उठाठेवी करीत असून हि त्यांचा स्वभाव थंड, सोशीक निराग्रही व अलिप्तसाच होता व त्याचा माझ्या मनावर खोल परिणाम झालेला आहे. माझ्याबद्दल त्यांना प्रेम, किंबहुना आदर हि वाटत असे. माझ्या ब्रह्मचर्याला उद्देशून ते एकदां मला म्हणाले "तुमच्या मनोनिग्रहाबद्दल आम्हांला अत्यंत आदरभाव वाटतो.

(नेहमीं ते मला तूंच म्हणत. येथील 'तुम्ही' व 'आम्ही' हे शब्द वर्ग-वाचक समजावे.) मनोजय हा मोठा पुरुषार्थ आहे. नाहीं तर आम्ही विषय-लंपट माणसें ?" मी येईन तेव्हां मला उपयोगी पडावा म्हणून ते एकादा खादीचा पंचा किंवा जोडी संग्रही ठेवीत

तरुणपणीच त्यांची पहिली पत्नी वारली व त्यांनीं दुसरें लग्न केलें. तरुण वयांत त्यांच्याकडून कांहीं प्रमाद घडल्याचे प्रवाद हि माझ्या कानीं आलेले आहेत. वर जें त्यांनीं स्वत:ला 'विषय-लंपट' म्हटलें तें त्या दृष्टीनें आत्मनिवेदनपर हि असेल.

तें कसें हि असलें तरी त्यांचें प्रौढ जीवन तरी सात्त्विक, संयमी, परोपकारी, निरलस, समाधानी इत्यादि अनेक बाबतींत नमुनेदारच होतें.

१९०६-७ सालची गोष्ट. ताई (त्यांची आई) यात्रा करायला गेली होती. नाशिक मुक्कामीं तिला कॉलरा कीं अतिसार झाला.. तशाच स्थितींत तिला वामनमामांनीं कशीबशी कुर्ध्याला आणून पोचविली. तेथें कांहीं दिवसांनीं तिला गुण पडला, पण तिची प्रकृति चिंताजनक असतांना तिच्या मृत्यूच्या विचारानें मी गणपतिमामांना रडतांना पाहिलें. इतके ते हळव्या मनाचे हि होते. मला म्हणतात, "आई मुलाला कळूं लागण्यापूर्वीच मेलेली बरी नाहीं का ?"

मी अल्पवयांतच स्वदेशीचळवळींत भाग घेत असें आणि त्या-विषयावर व्याख्यानें सुद्धां देत असें. मामा माझें कौतुक करीत. एकदां त्यांचें नाटक सुरू होण्यापूर्वी व एकदां कुर्धें गांवीं १९०६–७ सालीं शिवजयंत्युत्सव झाला त्यांत त्यांनीं मला भाषण करायला सांगितलें आणि मी नि:शंक मनानें व्याख्यानें झोडलीं हि. एकदां कुर्ध्याचे ग्रामस्थ लग्नानिमित्त जमले होते. त्याच वेळीं खुदीराम बोसनें बॉंब मारून इंग्रजांचा खून केला त्याची हकीकत केसरीमध्यें आलेली मामांनीं

मला वाचून दाखवायला सांगितलें आणि मी पण उभे राहून खड्या सुरांत वाचून दाखविली.

वृद्ध वयांत त्यांची प्रकृति खालावली व त्यांना अधून मधून नर्व्हस् अटॅक्स येत. त्यावेळीं ते घाबरत. "मी चाललों" असें म्हणून सर्वांना जवळ बोलावीत. शिवाय त्यांना मृत्यूचें भलतेंच भय वाटूं लागलें होतें. तो मनाचा एक प्रकारचा कमकुवतपणाच होता. भेटेल त्याला विचारीत "मी मरेन कीं जगेन? तुम्हांला नाडी समजते का? माझी नाडी पहाना" आणखी पुढें आपणच म्हणायचे "अरे, मी तर मूळचा वेदांती. मृत्यु म्हणजे देहांतर हें मीच लोकांना शिकवीत आलों. आणि आतां मलाच मृत्यूचें असें भय वाटूं लागलें आहे कीं भेटेल त्याला 'मी जगेन कीं मरेन' असे मी विचारतों आणि जो 'तुम्ही जगाल' म्हणेल तो मला बरा वाटतो." माझे धाकटे मामा हि खंबीर मनाचे पण तेहि त्यांच्या शेवटच्या दुखण्यामध्यें मृत्यूच्या भयानें रडूं लागत. हें पाहून मी परमेश्वराची मनोमय प्रार्थना करीत असतों कीं "परमेश्वरा माझ्यामध्यें असली दुर्बलता निर्माण करण्या-पूर्वींच मला मरण दे."

बायाच्या शेवटच्या दुखण्यामध्यें सन १९४३ भर मी तिच्या शुश्रूषेला राहिलों होतों त्या मुदतींत गणपतिमामा दर आठवड्यांतून एकदां बायाला भेटायला येत. "मला तरी गणपति म्हणणारें आणखी कोण आहे?" म्हणत. त्या मुदतींत मी एकदां बायाला कुर्ड्यास हि घेऊन गेलों होतों. तिथें बायाला पहायला आलेल्या मंडळीला मामांनीं मुद्दाम सांगितलें "हे आईची शुश्रूषा करतांना तुम्हांला दिसताहेत, पण हे एम्. ए. आहेत हो."

बायाच्या मागून अवघ्या दीडच वर्षानें त्यांचा हि अंत एक दोन दिवसांच्या दुखण्याअंतीं आकस्मिक तऱ्हेनेंच झाला. मी त्यांच्या अंत्य-

दर्शनाला जाऊं शकलों नाहीं. त्यांच्या वर्षश्राद्धाला मात्र मुद्दाम गेलों होतों.

त्यांच्या सहिष्णुवृत्तीचा एक प्रसंग नमूद करून हें स्मरण संपवितों. १९४३ सालच्या उन्हाळ्यांतील गोष्ट. पुण्याहून श्री......आले होते ते परत पुण्याला जायचे होते. मामांची एक मुलगी पुण्याला असते तिला कांहीं भेट पाठवायची होती 'ती न्याल का ?' असें मामांनीं विचारलें त्यावर त्या गृहस्थांनीं नेईन पण पावसेच्या मोटार स्टँडवर उद्या सकाळीं आठ वाजेपर्यंत पोंचेलसें करा असें सांगितलें. मामा परत गेल्यानंतर त्या गृहस्थांनीं अशी शक्कल योजली कीं लौकर मोटार-स्टँडवर जाऊन आधींच्या बसनेंच निघून जावें म्हणजे मामांकडील सामान तोंपर्यंत येणार नाहीं व नेण्याची तसदी चुकवितां येईल. त्याप्रमाणें ते मामांना सांगितल्या वेळेपेक्षां अगोदर मोटार स्टँडवर गेले. परंतु मामांकडील गडी हि लौकरच सामान घेऊन पोचला. आणि मग समक्ष भेट झाली तरीसुद्धां त्या गृहस्थांनीं कांहीं तरी सबब सांगून तें सामान नेण्याचें नाकारलें. अर्थात् मामांचा गडी तें सामान परत घेऊन गेला. मला तर त्या गृहस्थांचें तें करणें अगदींच अक्षम्य व कृतघ्नपणाचें वाटलें. पण मामा पुन्हां आमचेकडे आले तेव्हां ते एवढेंच बोलले "त्यानें सामान नेण्याचें नाकारलें त्याबद्दल माझें कांहीं म्हणणें नाहीं. दरेकजण आपापल्या स्वभावानुसार वागणार. पण त्यानें प्रथमच 'मी सामान नेणार नाहीं' असें स्पष्ट सांगायला हवें होतें, म्हणजे माझी फसगत झाली नसती."

---

.................. वि: ..........
.................. नों. दि: ..........

REFBK-0012412